# मिरा भाईंदर महानगरपालिका

## वार्षिक जमा खर्च २०१२-१३

## संक्षिप्त गोषवारा

## जमा बाजू (Income)

(आकडे कोटीत)

| लेखा शिर्षे | अर्थसंकल्पीय तरतुद | प्रत्यक्ष जमा | उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|
| एकूण 'अ' जमा | 45010.28 | 39535.01 | 5475.27 |
| शिक्षण विभाग | 500.00 | 327.87 | 172.13 |
| एकुण 'क' जमा | 5019.00 | 4391.26 | 627.74 |
| वृक्षप्राधिकरण | 251.00 | 180.95 | 70.05 |
| अग्निशमन | 2048.05 | 1050.15 | 997.90 |
| "JNNURM" अंदाजपत्रक | 8142.79 | 7745.94 | 396.85 |
| "P" अंदाजपत्रक | 2641.00 | **173.24** | 2467.76 |
| **एकुण जमा** | **63612.12** | **53404.42** | **10207.70** |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | 14110.57 | 14110.57 | 21909.93 |
| एकुण जमा | 77722.69 | 67514.99 | 32117.63 |

# खर्च (Expenditure)

(आकडे कोटीत)

| लेखा शिर्षे | अर्थसंकल्पीय तरतुद | प्रत्यक्ष खर्च | उर्वरित रक्कम |
|---|---|---|---|
| एकूण 'अ' खर्च | 39119.78 | 28123.70 | 10996.08 |
| शिक्षण विभाग | 1146.60 | 917.60 | 229.00 |
| एकुण 'क' खर्च | 6529.86 | 5595.63 | 934.23 |
| वृक्षप्राधिकरण | 1070.47 | 729.35 | 341.12 |
| अग्निशमन | 2048.05 | 569.34 | 1478.71 |
| महिला बाल कल्याण | 168.88 | 132.10 | 36.78 |
| अपंग व अंध कल्याण | 96.00 | 8.21 | 87.79 |
| "JNNURM" अंदाजपत्रक | 12086.21 | 8612.13 | 3474.08 |
| "P" अंदाजपत्रक | 7182.00 | 917.00 | 6265.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| एकुण खर्च | 69447.85 | 45605.06 | 23842.79 |
| अखरेची शिल्लक | 8274.84 | 21909.93 | 8274.84 |
| एकुण खर्च | 77722.69 | 67514.99 | 32117.63 |

# मालमत्ता कर विभाग

**आक्षेप क्र.१.१ :- लेखापरिक्षणास अभिलेख व माहिती उपलब्ध करुन न देणेबाबत...**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील मालमत्ता कर विभागाचे लेखापरिक्षणासाठी वारंवार मागणी करुन देखील विभागाकडुन खालील अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत.

१. विहीत नमुन्यातील कर आकारणी पुस्तके व सदर पुस्तकांच्या नमुन्यास मा. स्थायी समितीची मान्यता घेतलेबाबतचा तपशिल.

२. विहीत नमुन्यातील मागणी नोंदवहया.

३. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात नवीन कर आकारणी केल्याबाबतची सर्व प्रकरणे.

४. कर आकारणी आक्षेप/सुनावणी व बदल बाबतचे अभिलेख.

५. जप्तीची नोटीस/जप्तीचा तपशील/अधिपत्रद्वारे केलेली वसुली याबाबतची आकडेवारी व अभिलेख.

६. अटकावून ठेवलेल्या/जप्त केलेल्या वस्तुंची सुची, लिलाव किंवा विक्री केली असल्यास त्याबाबतची माहिती. महानगरपालिकेने वृत्तपत्रांत प्रसिध्द केलेल्या अटकावून ठेवलेल्या मालमत्तांची यादी.

७. ज्या इमारतींना करातुन सुट देण्यात आलेली आहे उदा. गुरुद्वार, मस्जीद, मंदिर, शाळा, हॉस्पिटल व विशेष विकास प्रकल्प यांच्या नस्त्या.

८. मालकी हक्क हस्तांतरणाबाबत भरण्यात आलेल्या फी चा तपशिल, हस्तांतरणाकरिता आकारण्यात येणाऱ्या फी बाबत मा. स्थायी समितीने दिलेली मान्यता.(स्थायी समिती ठराव सादर करावा)

९. कर आकरणीबाबत तडजोड केली असल्यास त्याबाबतचा अभिलेख.

१०. मालमत्ता कर विभागात कर व्यवस्थापन सुधारणे करिता (प्रॉपर्टी टॅक्स मॅनेजमेंट) जी.आय.एस. यंत्रणेचा करण्यात येत असलेल्या वापराचा तपशिल.

११. जी.आय.एस. यंत्रणेद्वारे सर्वेक्षण करण्यात आलेल्या मालमत्तांची संख्या.

१२. जी.आय.एस. सर्वेक्षणानुसार मालमत्तांचे फेर मुल्यांकन करण्यात आले असल्यास त्याचा तपशिल.

१३. महानगरपालिकेने भोगवटादारांच्या अनुषंगाने "मालमत्ता कर प्रमाणीकरण यंत्रणा" (Property Tax Certification system) अंमलात आणली आहे काय?

उपरोक्त अभिलेख व माहिती कर विभागाने लेखापरिक्षणा करिता उपलब्ध करुन दिलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र.१.२ :- कर निर्धारणा / आकारणी पुस्तकाबाबत अनियमितता...**

मालमत्ता कराची आकारणी करण्यापुर्वी प्रत्येक मिळकतीचे मुल्य व कर निर्धारण निश्चित करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ अनुसूचि "ड" नियम-१० व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिता १९७१ चे नियम ७४ अन्वये प्रभाग निहाय कर आकारणी पुस्तक नमुना क्र. ४३ मध्ये ठेवुन ते महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ७५ मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीस अनुसरुन अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ८ नियम-२१ अन्वये दर पाच वर्षांनी आकारणी पुस्तक (नमुना नं. ४३) तयार करणे गरजेचे असते. करनिर्धारणा/आकारणी पुस्तक आयुक्तांनी स्वाक्षांकित करुन अधिप्रमाणीत केले पाहिजे. तसेच कर विभागाने कर आकारणी पुस्तके करदात्यास निरिक्षणासाठी खुली ठेवणे आवश्यक आहे. विभागाने आकारणी पुस्तके लेखापरिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

कर आकारणी पुस्तकाअभावी लेखापरिक्षणास खालिल बाबतीत निष्कर्ष काढता आले नाहीत.

१. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींचा व जमिनींचा तपशिल.
२. त्यांचे करयोग्य मुल्य.
३. मालमत्ता कर देण्यास प्रथम जबाबदार व्यक्ती.
४. मालमत्ता करात देण्यात आलेली सूट व सूट दिले बाबतची कारणे.
५. करयोग्य मुल्याच्या रकमेविरुध्द (मुल्यनिर्धारणे विरुध्द) स्विकारण्यात आलेल्या तक्रारी, तक्रारींची सुनावणी, तक्रार निकालात काढल्यानंतर आकारणी पुस्तकात करण्यात आलेल्या सुधारणा.

विभागाने आकारणी पुस्तके अद्यावत करून लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र.१.३ :- मागणी नोंदवहीबाबत अनियमितता...**

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम ७६(१) व नमुना नं. ४७ अन्वये मागणी नोंदवहीचा नमुना निश्चित करण्यात आलेला आहे. करनिर्धारणाच्या यादीचे आयुक्तांकडुन अधिप्रमाणिकीकरण झाल्यानंतर मागणी नोंदवही तयार करण्यात येते. प्रत्येक वसुलीक्षेत्रासाठी एक मागणी नोंदवही तयार केली जाते. या मागणी नोंदवहया प्रमाणीत व साक्षांकित असणे आवश्यक आहे व त्यातील सर्व नोंदी आकारणी नोंदवहीप्रमाणे अनुक्रमाने लावलेल्या असतात.

सन २०१२-१३ लेखापरिक्षण समयी निदर्शनास आले की कर विभागाने उपरोक्त तरतुदीप्रमाणे मागणी नोंदवहया ठेवलेल्या नाहीत. सदर बाब गंभीर असून याबाबत विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला नाही.

**आक्षेप क्र.१.४ :- मालमत्ता कराची आकरणी व वसुलीबाबत अनियमितता.......**

सन २०१०-११ ते सन २०१२-१३ मधील मागणी वसुली व थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**सन २०१०-११ मधील मागणी, वसुली, थकबाकीचा तपशिल**

**(रक्कम रुपयात)**

| मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | | वसुलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | |
| ३१५६९५१४९ | ८१७०४७०८२.४ | ११३२७४२२३१.४ | ८४०१५०२९.२ | ६२३७२०९६०.८ | ७०७७३५९९० | २३१६८०१२० | १९३३२६१२२ | ४२५००६२४१ | ६२.४८% |

**सन २०११-१२ मधील मागणी, वसुली, थकबाकीचा तपशिल**

**(रक्कम रुपयात)**

| मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | | वसुलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | |
| ३४५०३९१३८ | ८०२००८९३९.२ | ११४७०४८०७७ | २०९८८२३७३.७ | ५६०८११११७९ | ७७०६९३५५२ | १३५१५६७६४ | २४११९७७६० | ३७६३५४५२४ | ६७.१८% |

## सन २०१२-१३ मधील मागणी, वसुली, थकबाकीचा तपशिल

(रक्कम रूपयात)

| मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | | वसुलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | |
| ३०३४२५९८० | ८६६४२२७६५ | ११६९८४८७४५ | १२२७०४६०९ | ६६८८५६९६० | ७९१५६१५६९ | १८०७२१३७१ | १९७५६४८०५ | ३७८२८७१७६ | ६७.६६ |

वरील तक्त्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते की, सन २०१०-११ मधील थकबाकी रु. ४२,५०,०६,२४१/- होती सदर रक्कम सन २०११-१२ मध्ये मागील थकबाकी म्हणून अंतर्भुत करणे अभिप्रेत असतांना सन २०११-१२ मध्ये मागील थकबाकी रु.३४,५०,३९,१३८/- दर्शविण्यात आली आहे. सन २०१०-११ ची प्रत्यक्ष थकबाकी व सन २०११-१२ मध्ये दर्शविण्यात आलेली मागील थकबाकी यात रु. ७,९९,६७,१०३/- ची तफावत आहे. सदर तफावतीमुळे मागणी रु.७,९९,६७,१०३/- ने कमी झाली. सदर तफावतीबाबत मालमत्ता कर विभगाने खुलासा केलेला नाही.

सन २०११-१२ मधील थकबाकी रू.३७,६३,५४,५२४/- होती. सदर रक्कम सन २०१२-१३ मध्ये मागील थकबाकी रू.३०,३४,२५,९८०/- दर्शविण्यात आली म्हणजेच थकबाकी रक्कमेतुन रू.७,२९,२८,५४४/- कमी करण्यात आली. कमी करण्यात आलेली रक्कम कोणत्या प्रयोजनार्थ कमी करण्यात आली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. विभागाकडे आकारणी व मागणी पुस्तके अद्यावत नसल्यामुळे मागणी, वसुली व थकबाकीच्या रक्कमांचा मेळ घेता येत नाही. तसेच लेखा परिक्षणास सादर केलेली आकडेवारी वस्तुनिष्ठ नसल्याने निदर्शनास येते.

सबब सन २०११-१२ मधील रू. ७,९९,६७,१०३/- व सन २०१२-१३ मधील रू.७,२९,२८,५४४/- असे एकूण रू. १५,२८,९५,६४७/- मागील थकबाकीतुन कोणत्या प्रयोजनासाठी कमी करण्यात आले याबाबत विभागाने खुलासा होणे आवश्यक आहे.

तसेच सन २०१२-१३ मधील कर वसुलीचा तक्ता पाहता मागणीच्या प्रमाणात मालमत्ता कराची वसुली ६७.६६% इतकी टक्के झाली व थकबाकी रु. ३७,८२,८७,१७६/- दिसुन येते. JNNURM norms प्रमाणे वसुलीचा इष्टांक ८५% असणे आवश्यक आहे. सबब सन २०१२-१३ मधे मालमत्ता कर वसुलीत इष्टांकपुर्ती झालेली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस मालमत्ता करापासुन मिळणाऱ्या उत्पन्नात थकबाकीचे प्रमाण जास्त असल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले आहे. विभागाने थकबाकीबाबत ताळमेळ घेवुन

थकबाकी वसुली प्रधान्याने करणे आवश्यक आहे. थकबाकी वसुलीसाठी विभागाने कशा पध्दतीने प्रयत्न केले याबाबत लेखापरिक्षणास निश्चित बोध होत नाही किंवा याबाबतचे अभिलेख लेखापरिक्षण वेळी सादर केलेले नाहीत.

थकबाकीची रक्कम रू. ३७,८२,८७,१७६/- व थकबाकीतील वगळण्यात आलेली रक्कम रू. १५,२८,९५,६४७/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. १.५ :- कर प्रणाली सुधारणेबाबत अनियमितता....**

जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान योजने अंतर्गत (JNNURM) सुधारणांमध्ये कर प्रणाली व्यवस्थापन सुधारणेचा (Property Tax Management) समावेश Mandaory Refroms मधे करण्यात आला आहे.

JNNURM योजनेतील सुधारणांना अनुसरून कर व्यवस्थापन प्रणाली मध्ये GIS Data Base चा वापर करून कर प्रणाली मध्ये सुधारणा करणे अपेक्षित आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने GIS सर्व्हेक्षण पुर्ण केलेले आहे. परंतु, त्याचा वापर कर प्रणाली सुधारणांकरिता केलेला नाही. याचे परिणामस्वरूपतः मालमत्ता कर मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नात अपेक्षीत वाढ होउ शकलेली नाही.

सबब महानगरपालिकेने JNNURM योजनेतील Mandaory Refroms च्या अनुषंगाने कर व्यवस्थापन प्रणालीत सुधारणा करणेकरिता GIS Data Base चा वापर करणे व मालमत्तांचे पुनःरिक्षण (Rivision) करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. १.६ :- मोकळ्या जागेवरील कराच्या थकबाकीबाबत.....**

मोकळ्या जागेवरील कराच्या मागणी, वसुली व थकबाकीचा सन २०११-१२ व सन २०१२-१३ चा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

# मोकळया जागेवरील कर आकारणी
# मागणी, वसुली, थकबाकी
# सन २०११-१२

(रक्कम रूपयात)

| कराचे नांव | मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण |
| घरपट्टी | १३४५७६४६३ | ९५८४०२७९ | **२३०४१६७४२** | ५२६५०८८६ | ३५९१०५५५ | **८८५६१४४१** | ८१९२५५७७ | ५९९२९७२४ | **१४१८५५३०१** |
| वृक्षकर | ४८९२५६५ | ३३५१७८५ | **८२४४३५०** | १७६४७५३ | १२६९४७० | **३०३४२२३** | ३१२७८१२ | २०८२३१५ | **५२१०१२७** |
| मनपा शिक्षण | ५२९३३१२ | ३८९९०४३ | **९१९२३५५** | १७९६१०५ | १३३८८२३ | **३१३४९२८** | ३४९७२०७ | २५६०२२० | **६०५७४२७** |
| मनपा अग्निशमन | ४८९२५६४ | ३३५१७५५ | **८२४४३१९** | १७६४२५० | १२६९३२८ | **३०३३६३२** | ३१२८३१४ | २०८२३७३ | **५२१०६८७** |
| नोटीस फी | ४६०३०० | | **४६०३००** | २२११३ | | **२२११३** | ४३८१८७ | ० | **४३८१८७** |
| व्याज | ५८८५३३९ | १२७३९७५६ | **१८६२५०९५** | २६८०११ | ५६१२४ | **३२४१३५** | ५६१७३२८ | १२६८३६३२ | **१८३००९६०** |
| इतर | | | | | ४५० | **४५०** | ० | -४५० | **-४५०** |
| एकूण | **१५६०००५४३** | **११९१८२६१८** | **२७५१८३१६१** | **५८२६६११८** | **३९८४४८०४** | **९८११०९२२** | **९७७३४४२५** | **७९३३७८१४** | **१७७०७२२३९** |

# मोकळया जागेवरील कर आकारणी
# मागणी, वसुली, थकबाकी
# सन २०१२-१३

(रक्कम रूपयात)

| कराचे नांव | मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण | मागील मागणी | चालु | एकुण |
| घरपट्टी | १८३५५८७८७ | १०७६८५२७९ | **२९१२४४०६६** | ४६१७२०३० | २७३११५४९ | **७३४८३५७९** | १३७३८६७५७ | ८०३७३७३० | **२१७७६०४८७** |
| वृक्षकर | ६५५११५३ | ३८७१९५१ | **१०४२३१०४** | १६५०२३९ | ९९६१३९ | **२६४६३७८** | ४९००९१४ | २७८५८१२ | **७७७६७२६** |
| मनपा शिक्षण | ७३४४४३४ | ४३६८४२८ | **११७१२८६२** | १६८३१०४ | १०१४९८८ | **२६९८०९२** | ५६६१३३० | ३३५३४४० | **९०१४७७०** |
| मनपा अग्निशमन | ६५५११५३ | ३८७१९५१ | **१०४२३१०४** | १६५०२३९ | ९९६१३९ | **२६४६३७८** | ४९००९१४ | २८७५८१२ | **७७७६७२६** |
| नोटीस फी | ३८७३२२ | १२०९१०५ | **१५९६४२७** | ६३२१ | १३९१९ | **२०२४०** | ३८१००१ | ११९५१८६ | **१५७६१८७** |
| व्याज | १४४५५२८६ | १६७३२००० | **३११८७२८६** | २०३२६३ | ८१६० | **२११४२३** | १४२५२०२३ | १६७२३८४० | **३०९७५८६३** |
| इतर | | | | | ११२ | **११२** | ० | -११२ | **-११२** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण** | २१८८४८१३५ | १३७७३८७१४ | ३५६५८६८४९ | ५१३६५१९६ | ३०३४१००६ | ८१७०६२०२ | १६७४८२९३९ | १०७३९७७०८ | २७४८८०६४७ |

वरील तक्त्यानुसार निदर्शनास येते की सन २०११-१२ मधील मार्च अखेर थकबाकी रू.१७,७०,७२,२३९/- होती व सन २०१२-१३ मधे मागील थकबाकी रू. २१,८८,४८,९३५/- दर्शविण्यात आली आहे. म्हणजेच थकबाकीच्या आकडेवारीत तफावत आहे. दोन्ही आकड्यापैकी वस्तुनिष्ठ आकडेवारी कोणती याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

सन २०१२-१३ अखेर मोकळ्या जागेवरील कराची थकबाकी रू. २७,४८,८०,६४७/- होती. थकबाकी रक्कम विभागामार्फत वसुल करण्यात आलेली नसल्याचे व वसुली करिता विभागामार्फत प्रयत्न केले नसल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले. थकबाकीची रक्कम वसुल न झाल्याने रक्कम रू. २७,४८,८०,६४७/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. १.७ :- मोकळ्या जागेवरील कर आकारणी व वसुलीबाबत अनियमितता....**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १२९ व १३२ नुसार शहरातील मोकळया जागांवर कर लावण्याची तरतुद आहे. मिरा भाईंदर माहानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ८, दि. १०/०४/२००८ अन्वये दि. ०१/०४/२००८ पासुन महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागांवर कर आकारणी खालील निकषावर सुरु करण्यात आली आहे.

१. ज्या जागेत बांधकाम प्रारंभपत्र महानगरपालिकेने दिले आहे. त्या दिनांकापासून त्या मोकळया जागा म्हणुन कर आकारणीस पात्र राहतील जागेतील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र हे कर आकारणीसाठी बांधकाम क्षेत्र म्हणुन गृहीत धरण्यांत येइल.
२. मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागा, जमिनी खरेदी विक्री याची नोंदणी सहा. दुय्यम निर्बंधक ठाणे क्र. ४ व ७ येथे होत असते. सदरहु खरेदी विक्रींचे दस्तऐवज नोंदणी करताना शासनाने मुद्रांक शुल्कासाठी सर्वेनिहाय जमिनीचा दर निश्चित केले आहेत ते दर जमिनीची किंमत ठरविण्यासाठी लागू करावेत.
३. जागेची किंमत शासनाने दिलेल्या दरानुसार निश्चित झाले नंतर त्या जागेच्या किमतीच्या ५% इतक्या रक्कमेनुसार वार्षिक भाडे ठरविण्यांत यावे.
४. जमिनीचे वार्षिक भाडे विचारात घेवून त्यातून १०% वैधानिक कपात वजा जाता जी रक्कम येईल ती रक्कम करपात्र मूल्य ठरविण्यांत यावे.

वरील ठरावाच्या अनुषंगाने आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांचेकडील आदेश जा.क्र. मनपा/आयुक्त/१५३/२००८-०९, दि. २२/१२/२००८ अन्वये मोकळ्या जागेवरील कर वसुलीबाबत कार्यवाही निश्चित केली. त्यानुसार मोकळ्या जागेवरील कर आकारणी व वसुली नगररचना विभागाने करावयाची आहे. कर विभागाने कर आकारणी करणे, देयक तयार करणे, नोटीसा बजावणे इत्यादी कामे करावयाची होती. लेखापरिक्षणास उपलब्ध झालेल्या अभिलेख्यानुसार कर आकारणी व वसुलीबाबत नगररचना व कर विभागात समन्वय नसल्याचे निदर्शनास आले. सदर विभागातील समन्वयाच्या अभावामुळे मोकळ्या जागेवरील कर आकारणी व वसुलीमध्ये त्रुटी निर्माण झाल्या आहेत.

तसेच जमीन मालकाने मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय जमीन मालकास जोत्याचा दाखला, सुधारीत आराखडा, वापर परवाना व इतर परवाने देण्यात येवू नये असे आदेश असताना देखील नगररचना विभागामार्फत जमीन मालकास विविध दाखले व परवाने देण्यात आले आहेत. याचसोबत मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय वा कर विभागाकडून मोकळ्या जागेवरील कराची थकबाकी नसल्याचा दाखला घेतल्या शिवाय पाणी पुरवठा विभागाने नळ जोडणी मंजूर करु नये असे विहित केलेले असताना पाणी पुरवठा विभागाने वरील दाखल्या शिवाय नळ जोडणी मंजूर केल्याचे निदर्शनास आले. याचसोबत खालील बाबी लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आल्या.

१. महानगरपालिकेने केलेला ठराव व आयुक्तांनी दिलेल्या आदेशांचे अनुपालन संबंधित विभागांनी केले नसल्यामुळे मोकळ्या जागेवरील कर आकरणीत अनियमितता झाल्याचे निष्पन्न होते.
२. मोकळ्या जागेवरील कर आकारणीबाबत नगररचना व कर विभागाने आकारणी प्रस्तावांचा व वसुलीचा मेळ घेणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ ताळमेळ न घेतल्याने दुबार कर आकारणी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.
३. कर आकारणी व वसुलीबाबत नगररचना व कर विभागाकडे आवश्यक अभिलेख उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.
४. बांधकाम प्रारंभपत्र देण्यापासून ते नविन कर आकारणी होईपर्यंत आकारण्यात येणाऱ्या मोकळ्या जागेवरील कराचा भरणा करण्याबाबत नगररचना व कर विभागाने संयुक्त प्रयत्न केलेले नाहीत. आकारणी वसुली व थकबाकी यांचा वेळोवेळी ताळमेळ घेतलेला नाही.

सबब मोकळ्या जागेवरील कर आकारणी बाबत निष्पन्न झालेल्या अनियमितता दूर करण्याबाबत संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीबाबत लेखा परिक्षणास अनुपालन सादर करण्यात यावे.

**आक्षेप क्र. १.८ :- नविन मालमत्तांची कर आकारणी व नविन मालमत्तांचे सर्व्हेक्षण न झाल्याने मालमत्ता करात येणारी तुट...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" चे प्रकरण ८ मधील नियम ५ अन्वये भोगवटादारावर अशा प्रकारे कर्तव्य लादण्यात आले आहे की, जेव्हा एखादी इमारत बांधून पूर्ण झाली असेल किंवा इमारतीतील वाढीव बांधकाम पूर्ण झाले असेल तर भोगवटादाराने करनिर्धारणाकरिता आयुक्तांना "आवश्यक त्या सर्व महितीसह" नोटिस दिली पाहिजे. आयुक्तांना अशी नोटीस प्राप्त झाल्यावर त्यांच्याकडून पाहणी केली जाते. व कर आकारणीबाबत कार्यवाही करण्यात येते. मालमत्ता कर विभागाने भोगवटादाराकडील अशा नोटिशीची वाट न पाहता महानगरपालिकेकडून वापर परवाना दिल्याबरोबर लगेच मालमत्तांकराची विशेष नोटिस देऊन मागणी केली जावी. महानगरपालिकेचे संभाव्य नुकसान टाळण्याच्या दृष्टीने सदरची बाब रास्त आहे. भोगवटादाराकडून माहितीची अपेक्षा न ठेवता महानगरपालिकेकडून स्वतः अशी कारवाई केल्यास त्यात गैर अथवा बेकायदेशीर काहीच नाही. अशा प्रकारची कार्यवाही विभागाकडून केल्याचे दिसून येत नाही.

महानगरपालिका क्षेत्रांतील नवीन मालमत्तांचे सर्व्हेक्षण झाले नसल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले. नवीन किती इमारतींना/मालमत्तेला कर आकारणी करावयाच्या आहेत त्याबाबत विभागात नोंदवही ठेवलेली नाही. नवीन कर आकारणीसाठी विभागांकडे किती अर्ज आले व त्यावर केलेल्या कारवाई बाबत नोंदी विभागाने ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे नवीन सर्व मालमत्तांना कराची आकारणी झालेली नसावी व परिणामस्वरुपतः कर आकारणी अभावी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे अशी लेखापरिक्षणाची धारणा आहे.

याबाबत विभागास खुलास सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१.९ :- मालमत्ता हस्तांतरण व वापरात बदलाबाबत...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ८ नियम १ अन्वये मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र असणाऱ्या व्यक्तीने मालमत्तेचे प्रत्येक हस्तांतरण हे आयुक्तांना कळविले पाहिजे जेंव्हा मालमत्तेचे हस्तांतरण नोंदणीकृत कागदपत्रांद्वारे होते तेंव्हा हस्तांतरणाची माहिती तीन महिन्यात आयुक्तांना लेखी नोटीशीद्वारे द्यावी लागते तसेच नियम ४ अन्वये आयुक्तांनी लेखी विनंती केल्यावर भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ च्या प्रयोजनांसाठी रचना करण्यात आलेल्या ज्या जिल्हात किंवा उपजिल्हात ते शहर असेल त्या जिल्हात किंवा उपजिल्हात निबंधकाने किंवा उपनिबंधकाने त्या शहरातील स्थावर मालमत्तांवरील मालकी हक्कांच्या हस्तांतरण लेखांच्या नोंदणीसंबंधी जो तपशिल आयुक्त वेळोवेळी विर्निदिष्ट करतील असा तपशिल पुरवला पाहिजे. कर विभागाने मालमत्ता हस्तांतरणा बाबतचे अभिलेख तसेच निबंधक/उपनिबंधक कडून मागविलेला तपशिल लेखापरिक्षास उपलब्ध करुन दिलेला नाही.

महानगरपालिका क्षेत्रात ज्या मालमत्तांच्या वापरात बदल झाला आहे अशा मालमत्तांचा किंवा व्यवसायिक मालमत्तांबाबत सर्वेक्षण करुन त्याप्रमाणे सुधारित मालमत्ता कर आकारणी करणे अपेक्षित आहे. तथापि त्याबाबत योग्य ते सर्वेक्षण नसल्यामुळे वापरातील बदलामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये अभिप्रेत वाढ झालेली दिसुन येत नाही. महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता वापरात झालेल्या बदलांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१.१० :- करमणुक कर वसुली बाबत...**

मार्च २०१३ अखेर करमणुक कर वसुलीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**(रक्कम रुपयांत)**

| **मागणी** | | | **वसुली** | | | **थकबाकी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मागील** | **चालू** | **एकूण** | **मागील** | **चालू** | **एकूण** | **मागील** | **चालू** | **एकूण** |
| ५७३०० | ४१२९८० | ४७०२८० | ५७३०० | ३४१०८५ | ३९८३८५ | ० | ७१८९५ | ७१८९५ |

उपलब्ध माहितीनुसार सन २०१२-१३ मध्ये करमणुक कराची मागणी रु. ४,७०,२८०/- होती. त्यापैकी वसुल रक्कम रु. ३,९८,३८५/- व थकबाकी रु. ७१,८९५/- इतकी दिसुन येते.

सदर थकबाकी वसुलीबाबत थकबाकी वसुली झाली किंवा कसे? विभागाने थकबाकी वसुलीबाबत केलेले प्रयत्न याबाबत लेखापरिक्षणास खुलासा करण्यात आलेला नाही.

सबब थकबाकी रक्कम रू. ७१,८९५/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र.१.११ :- मालमत्ता कर देयकांमध्ये वाढ/घट बाबत...**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम ७५ (७) अन्वये नमुना क्र. ४६ मधे वाढ /घट नोंदवही ठेवण्यात येते. मालमत्ता देयक बजावल्यानंतर किती मालमत्ताधारकांचे मालमत्ता कर/व्याज कमी केलेला आहे किंवा त्यात वाढ केलेली आहे अशा प्रकरणांची सविस्तर यादी व मंजुरीच्या मूळ संचिका विभागाने लेखापरिक्षणास सादर केलेल्या नाहीत. कर आकारणीचे रक्कमेबाबत वाढ/घट केली असल्यास त्या बाबतची नोंदवही नमुना क्र. ४६ विभागात ठेवलेली नाही.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१.१२ :- बँकेतून परत आलेल्या धनादेशाबाबत...**

| सन २०१२-१३ | मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील | चालू | एकूण | मागील | चालू | एकूण | मागील | चालू | एकूण |
| चेक रिर्टन | -- | १७१००२२ | १७१००२२ | २१९३८४ | ६४७८९ | २८४१७३ | -२१९३८४ | १६४५२३३ | १४२५८४९ |

कर विभागाकडून बँकेतुन परत आलेल्या धनादेशांच्या रक्कमेची वसुली बाबत आवश्यक ती कार्यवाही झालेली दिसून येत नाही. सन २०१२-१३ या वित्तिय वर्षात किती रक्कमेचे धनादेश न वटल्याने मालमत्ता कराची वसूली कमी झाल्याचे निदर्शनास आले. न वटलेल्या रक्कम रू. १४,२५,८४९/- धनादेशाबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत समाधानकारक खुलासा केलेला नाही. परिणामस्वरुपतः महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान दिसुन येते अशी लेखापरिक्षणांची धारणा आहे.

सदर बाब गंभीर असुन याबाबत विभागाने लेखापरिक्षण विभागास तपासणी करिता न वटलेल्या धनादेश बाबत अभिलेख सादर केले नसल्याने रू. १४,२५,८४९/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र.१.१३ :- मोठ्या इमारतीवरील कर आकारणी...**

महाराष्ट्र मोठया इमारती अधिनियम १९७० खोलीचे क्षेत्रफळ १५० चौ.मी. पेक्षा जास्त व ज्यावर कर लावता येईल अशी किंमत रु. १५०० पेक्षा जास्त त्यावर कर लावण्यात येईल अशा कराच्या किंमतीवर १० टक्के दराने शासनास कर अदा करावयाचा आहे. अशा मोठया इमारतीची यादी व कर आकारणी केलेली प्रकरणे लेखापरिक्षणासाठी संबंधित विभागाकडुन उपलब्ध करुन देण्यांत आलेली नाहीत. त्यामुळे अशा किती मालमत्ता आहेत व किती किंमतीवर १० टक्के दराने शासनास रक्कम भरणा करावयाची आहे याबाबत निश्चिती करता आली नाही.

**आक्षेप क्र.१.१४ :- मालमत्ता कराच्या पावतीबाबत...**

महाराष्ट्र नगरपारिषद लेखा संहीता १९७१ मधील नियम क्र. ७८ (१), ८३ (४), ८५,८६ (४) व ९४ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कराची देयके मालमत्ताधारकांना बजावल्यानंतर त्याची पोचपावती नमुना क्र. ४९ मधे कराची पावती देण्यात येते. देयकांची दुसरी प्रत व त्याची नोंदवही विभागात ठेवणे आवश्यक आहे. सदर नोद वही विभागांकडून ठेवण्यात आले नसल्याचे लेखापरिक्षण समयी निदर्शनास आले आहे.

**आक्षेप क्र.१.१५ :- शास्ती आकारणीबाबत...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ (अ) अन्वये ज्या मालमत्तांना शास्तीची रक्कम आकारणी झाली आहे. अशा मालमत्तांना भोगवटा दाखला मिळाल्यास किंवा वास्तुविशारदाने मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम झाले असल्याचे प्रमाणीत केल्यास शास्ती रद्द करण्यात येते. विभागाने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात शास्ती कमी केलेल्या प्रकरणांची यादी व शास्तीच्या रक्कमा कमी केल्याबाबत सविस्तर तपशिल लेखापरिक्षणास सादर केला नाही. शास्ती रद्द केल्यामुळे महानगरपालिकेच्या कर उत्पन्नात किती घट झाली याबाबत विवेचन करता येत नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

**आक्षेप क्र.१.१६ :- मालमत्ता कर निर्लेखित प्रकरणाबाबत...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ अन्वये आयुक्तांना स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी रक्कम त्यांच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

कर विभागाकडे सन २०१२-१३ या वर्षामध्ये मालमत्ता निर्लेखित प्रकरणाबाबत माहिती निरंक आहे. कर विभागाकडे किती प्रकरणे निर्लेखनासाठी प्रलंबीत आहेत याचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. सबब निर्लेखना अभावी महानगरपालिकेच्या थकबाकी मधुन किती रक्कम कमी होईल याबाबत निष्कर्ष काढता आले नाहीत. विभागाने योग्य ते सर्व्हेक्षण करून सुधारित निर्लेखन प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. जेणेकरून मागणी, वसुली व थकबाकी मध्ये रक्कमेबाबत व उत्पन्नाबाबत निश्चिती करता येईल.

ज्या मालमत्ता निष्काषीत करण्यात आल्या आहेत त्यांच्या मोकळया जागेवर बांधकाम परवानगी देण्यांत आली आहे काय? किंवा त्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या नवीन इमारतीस भोगवटा दाखला देण्यात आला आहे काय? याचे सर्वेक्षण कर विभागाने करणे अपेक्षित आहे जेणेकरुन निर्लेखनाबाबत, मोकळया जागांवरील कर आकारणी व नवीन कर आकारणी बाबत योग्य निर्णय घेणे सुलभ होईल.

**आक्षेप क्र.१.१७ :- मालमत्ता लिलाव वसुलीबाबत खर्च...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" प्रकरण ८ मधील नियम ४२, ४३ व ४६ चे तरतुदीनुसार अटकावून ठेवलेल्या व जप्त केलेल्या वस्तूची वसुली सुची, लिलाव किंवा विक्री थकबाकी धारकांची जंगम व स्थावर मालमत्ता अटकावून तिची विक्री करणे याबाबत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

कर विभागाने अंदाजपत्रकात सन २०१२-१३ या वर्षात मालमत्ता लिलाव वसुली खर्च रु.५.०० लाख इतकी तरतुद केलेली होती. कर विभागाने किती मालमत्ता लिलाव केला व त्यापासून कर विभागाने किती रक्कम वसुली केली व विक्रीची थकबाकी किती याबाबत सविस्तर माहिती सादर केलेली नाही.

**आक्षेप क्र.१.१८ :- मोबाईल टॉवरवरील कर आकारणी बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात लेखापरिक्षण समयी शास्तीसह रक्कम आकारणी केलेल्या मोबाईल टॉवर्सची संख्या १४० होती. सदर मोबाईल टॉवर्सवरील शास्तीची रक्कम रू. ३ कोटी आहे. मा. उच्च न्यायालयाने शास्तीची रक्कम वसुल करूनये असे आदेश पारित केले आहेत. याचे परिणामस्वरूपतः संबंधित मोबाईल कंपन्या शास्ती व त्यावरील व्याजाची रक्कम वगळून निव्वळ रक्कम भरत आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वसुल न करावयाच्या शास्ती विभागाने मागणीतुन कमी केली नसल्याचे निदर्शनास आले. मालमत्ता कर विभागाने आक्षेपीत कार्यवाही न केल्याने संगणकीय अज्ञावलीत शास्ती रक्कमेवर प्रती दिन ०.०२% प्रमाणे व्याज आकारणी केली जात आहे. सदर रक्कम वगळण्याबाबत विभागाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे. याबाबत विभागाने कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

**आक्षेप क्र.१.१९ :- मालमत्ता करामध्ये सुट दिलेले प्रकरणांबाबत...**

ज्या इमारतींना मालमत्ता कर आकारणी मध्ये सुट देण्यात आलेली आहे. उदा. गुरुद्वार, मस्जीद, मंदिर, शाळा, हॉस्पिटल व विशेष विकास प्रकल्प अशा प्रकरणांची यादी व मुळ नस्त्या विभागाने लेखापरिक्षणास सादर केलेल्या नाहीत. ज्या इमारतींना मालमत्ता करामध्ये सुट देण्यांत आलेली आहे याबाबतची स्वतंत्र नोंदवही विभागात ठेवण्यांत आलेली नाही.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१.२० :- भुईभाडे वसुलीबाबत...**

सन २०१२-१३ अखेर भुईभाडे वसुलीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम रुपयात)

| मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागणी | चालू | एकूण | मागील | चालू | एकूण | मागील | चालू | एकूण |
| ५९२७०२ | १६४३७७ | ७५७०७९ | १५११३४ | ४८८५९ | १९९९९३ | ४४१५६८ | ११५५१८ | ५५७०८६ |

सन २०१२-१३ या वर्षात भुईभाडे पोटी मागणी मागील थकबाकीसह रु.७,५७,०७९/- इतकी होती. त्यापैकी रु.१,९९,९९३/- ऐवढी रक्कम वसुली झाली व थकबाकी रु.५,५७,०८६/- होती म्हणजेच एकूण मागणीच्या २६.४२ % वसुली झाली आहे.

भुईभाडे वसुलीकरिता मागणी बिले, नोटीसा बजावण्यात आल्याचे दिसून येत नाही त्यामुळे वसुलीवर परिणाम झालेला दिसून येतो. जागा वापरत असलेले भाडेकरु यांचेवर कोणतीही कार्यवाही किंवा नोटीसा दिल्याचे दिसून येत नाही. तसेच विभागाने केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख लेखापरिक्षणास तपासणी करता उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

माहिती अप्राप्त असल्याने रक्कम रू.५,५७,०८६/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र.१.२१ :- मालमत्ता कराबाबत...**

**प्रभाग क्र. १ (भाईंदर (प.) विभाग) बाबत....**

१. भाईंदर (प.) कर विभागामधील वॉर्ड क्र. अे/बी/सी/डी मध्ये सन २०१२-१३ चा आर्थिक वर्षामध्ये नविन कर आकारणी केलेली प्रकरणे (नस्ती) तपासणी साठी उपलब्ध करून न दिल्यामुळे माहिती उपलब्ध होउ शकली नाही.

२. दैनिक वसुली नोंदवही हस्तांतरण प्रकरणे पोस्टींगचा तपशिल, झोन निहाय मागणी व वसुलीचा तपशिल, मालमत्ता कर वाढ – घट रजिस्टर अनादर झालेल्या धनादेशांबाबत, समायोजीत रक्कम तसेच एकुण मागणीतुन झालेली चालु वर्षातील वसुली वर्ष अखेर शिल्लक थकबाकी याबाबतची माहिती वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडून लेखी – तोंडी मागवून देखील माहिती लेखापरिक्षण करणे करिता (तपासणी) उपलब्ध करून दिली नाहीत.

३. प्रभाग कार्यालय क्र. १ भाईंदर (प) वॉर्ड क्र. बी मालमत्ता क्र. बी/०४००३६३८००३५ खातेदाराचे नाव एम.टी.एन.एल. मोबाईल टॉवर पावती क्र. ४६०१८८ दि. २५/०३/२०१३ (पुस्तक क्र. ४६०२) रोजी चेकने भरणा केलेला असता चेक क्र. १३४८२५ दि.०७/०१/२०१३ युनियन बँक रक्कम रू. १,२३,१२०/- चेक रिर्टन असल्याकारणाने आर्थिक वर्षात दंडासह वसुली होणे आवश्यक आहे. परंतु, दंडासह वसुली केल्याची नोंद उपलब्ध अभिलेखावरून केल्याच्या निर्दशनास आले नाही. त्यामुळे १०ऽ दंड रक्कम रू.१२,३१२/- कमी वसुली केली आहे.

४. प्रभाग कार्यालय क्र. १ भाईंदर (प.) वॉर्ड क्र. बी मलमत्ता क्र. बी/०६००४०८९९००० नविन कर आकारणी झाल्याचे दिसुन येते पुस्तक क्र. ४३६४ पावती क्र. ४३६३३९ दि.०८/०१/२०१३ रोजी रक्कमे बाबतचे चलन तपासणी करीता उपलब्ध झाले नाही. तसेच नविन कर आकारणी केल्याचे प्रकरण तपासनीस उपलब्ध करून दिले नाही.

५. जा.क्र. मनपा/कर/४९६९/७२१/२०१२-१३ दि.२१/१२/२०१२ राजकुमार ओ. वर्मा धावगी पाडा पुस्तक क्र. ४४८९ पावती क्र. ४४८८११ नुसार नविन कर आकारणी केली आहे. परंतु, प्रकरण तपासणी करिता उपलब्ध करून दिले नाही.

६. डोंगरी कर विभागातील बहुतांश कॅश पावती (दुय्यम) पुस्तकावर लिपिकांच्या सह्या नाहीत.

७. पुस्तक क्र. ४४८९ पावती क्र. ४४८८११ पावतीवर नविन कर आकारणी झालेली दिसुन येत. जा.क्र. मनपा/कर/४९६९/७२१/२०१२-१३, दि.२१/१२/२०१२ राजकूमार ओ. वर्मा, धावगी पाडा

८. पुस्तक क्र. ४४८८ पावती क्र. ४४८७४८ जा.क्र. मनपा/३६७/२०१२-१३, दि.२०/०७/२०१२ अब्दुल वारी इकराम शेख रा. मोठागाव नविन कर आकारणी.

९. पुस्तक क्र. ४४९३ पावती क्र. ४४९२०३ जा.क्र. मनपा/कर/१००७/२९४/२०१२-१३, दि.२१/०६/२०१२ नविन कर आकारणी.

१०. पुस्तक क्र. ४४८८ पावती क्र. ४४८७८२ जा.क्र. मनपा/कर/४९७२/७२२/२०१२-१३, दि.२१/१२/२०१२ रमजान समशेर शाह नविन कर आकारणी.

११. पुस्तक क्र. ४४९३ पावती क्र. ४४९२६१ ते ४४९२७० पर्यंत कर आकारणी झालेली दिसुन येते. जा.क्र. मनपा/कर/१३४८/७८९/२०१२-१३, दि.११/०१/२०१२

१२. पुस्तक क्र. ४५५८ पावती क्र.४५५७१७ ते ४५५७१८ जा.क्र. मनपा/प्र.क्र.१/कर/१३१/२३०/ २०१२-१३, दि.१७/०६/२०१२ जिलानी दिरसाब शेख रा. धावगी रोड लाल मो. उल्लउद्दीन शेख नविन कर आकारणी

१३. पुस्तक क्र. ४५५९ तपासणी करणेस उपलब्ध करून दिले नाही. (कॅश किंवा चेक)

१४. दि. २३/०३/२०१३, रू. ३०,०००/- चलन उपलब्ध असुन चलनामध्ये एकूण कर घरपट्टी, शिक्षण, वृक्ष इ. रक्कम नमुद केलेली दिसुन येत नाही. तसेच पोटकीर्दमध्ये नोंद उपलब्ध दिसुन येत नाही.

१५. दि.३१/०३/२०१३ चे ६ नंबर चे चलन उपलब्ध नाहीत.

१६. बहुतांश पावती पुस्तकावर लिपिकाचा सह्या दिसुन येत नाही. (डोंगरी कर विभाग)

**प्रभाग क्र. ३ बाबत.....**

१. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे डिमांड रजिस्टर, नविन कर आकारणी, वाढ - घट रजिस्टर, कॉम्प्युटर पावत्यांची पोटकिर्द उपलब्ध करून देण्यात आली नाही. झोन निहाय मागणी व वसुलीचा तपशिल देण्यात आलेला नाही.

२. एफ/जे वॉर्ड दि.३१/०३/२०१३ पावती पुस्तक क्र. ४१८४ पावती क्र. ४१८३४२ चलनावर सही व तारीख नाही.

३. हस्तांतरणाची प्रकरणे तसेच मोबाईल टॉवर, नविन कर आकारणीची प्रकरणे व त्यांची स्टेटमेंट सादर केलेली नाहीत.

४. समायोजन जे वॉर्ड, पावती पुस्तक क्र. ४४३१, पावती क्र. ४४३००५ रू. ३४१/- ऐवजी अक्षरी चलन रू. १८४/- चुकीचे लिहलेले आहे.

५. जे वॉर्ड रू. ८११६९/- चेक दि. २३/०८/२०१२ च्या चलनावर लिपिकाची सही नाही.

६. पुस्तक क्र. ४२९५ पावती क्र. ४२९४२३ चेकचे पुस्तकामध्ये रू. १४४५८/- ची कॅशची पावती फाडलेली आहे.

७. श्री. अशिष रमाकांत कदम दि.०५/१०/२०१२ नविन मालमत्तेची पावती फाडलेली आहे. चलन डुप्लीकेट वाटते सविस्तर काही लिहिलेले नाही.

८. आय वॉर्ड पावती पुस्तक क्र. ४१६१ पावती क्र. ४१६००१ श्री. विनोद एम. दर्जी रू.२२२४/- दि.१०/०४/२०१२ देना बँक चेक क्र. ६७६८९३ चेकचे चलन नाही.

९. पावती पुस्तक क्र. ४१६५ (नविन) पावती क्र. ४१६४०७ ने रू. ४,१६,४१३/- चेकचे चलन नाही.

१०. चेक पावती क्र. ४१६१०८ ने १० पावती पुस्तक क्र. ४१६२ रू. ९४,४७०/- दि.०९/११/२०१२ चलन नाही.

११. कॅश पावती क्र. ४१६ ३०४ ते ०५ पावती पुस्तक क्र. ४१६४ रू. २६,०१७/- दि. ०९/११/२०१२ चलन नाही.

१२. दि. २७/११/२०१२ चे चलन पावती क्र. ६४०३ व ६४०४ रू. १२,४६०/- चलनावर लिपिकाची सही नाही.

१३. दि. १४/१२/२०१२ पावती पुस्तक क्र. ६४४५ पावती क्र. ६४४४७२ रू. १५००/- ऐवजी रू.१,०००/- घेतले पावती मध्ये खाडाखोड दिसुन येत आहे.

१४. दि.३१/१२/२०१२ रू. ८१३०/- चलनावर लिपीकाची सही नाही.

१५. दि.०९/०१/२०१३ पावती पुस्तक क्र. ६३०० पावती क्र. ६२९९२१ रू. १५००/- ऐवजी रू.१००/- घेतले पावती मध्ये खाडाखोड दिसुन येत आहे.

१६. दि.१५/०१/२०१३ पावती पुस्तक क्र. ६४७८ पावती क्र. ६४७७३९ रू. १०००/- ऐवजी रू.१००/- घेतले पावती मध्ये खाडाखोड दिसुन येत आहे.

१७. दि.१९/०१/२०१३ पावती पुस्तक क्र. ६४८० पावती क्र. ६४७३५० रू. १०००/- ऐवजी रू.१००/- घेतले पावती मध्ये खाडाखोड दिसुन येत आहे.

१८. पावती पुस्तक क्र. ४१६४ पावती क्र. ४१६३०९ दि.१५/०३/२०१३ मोबाईल टॉवर स्टेटमेंट नाही.

१९. पावती पुस्तक क्र. ४१६४ पावती क्र. ४१६३१२ ते ४१६३१३ रू. ५,४०,६७५/- मोबाईल टॉवर स्टेटमेंट नाही.

२०. पावती क्र. ४२९४०१ ते ४२९४२३ तसेच ४२९४६५ ते ४२९४६६ (नविन) स्टेटमेंट दिलेली नाहीत.

२१. किरकोळ पोटकिर्द – पावती पुस्तक क्र. ५९०५ पावती क्र. ५९०४९७ दि. १३/०४/२०१२ पोटकिर्द मध्ये रू. १० दाखविले असुन पावती रू. २०/- ची फाडलेली आहे.

२२. पावती पुस्तक क्र. ५९०६ पावती क्र. ५९०५३२ दि.१६/०४/२०१२ पोटकिर्द मध्ये फॉर्म फी रू. १०/- दाखविले असुन पावती रू. २०/- ची फाडलेली आहे.

२३. पावती पुस्तक क्र. ५९२० पावती क्र. ५९१९१८ ते ५९१९६१ दि. २०/०४/२०१२ रू.१५,८००/- चे चलन नाही.

२४. पावती पुस्तक क्र. ६३१९ पावती क. ६३१८३३ दि.०४/०९/२०१२ फॉर्म फी पोटकिर्द मध्ये रू. १०/- जास्त दाखविली असुन चलन रू. १०/- चे कमी भरणा केलेला आहे.

२५. एच वॉर्ड पावती पुस्तक क्र. ६३३१ पावती क्र. ६३३०७५ मालमत्ता हस्तांतरण पावती रू.१००/- च्या पावतीच्या रक्कमेवर खाडाखोड केलेली आहे. तसेच पुस्तकातील काही पावत्यांवर लिपिकाच्या सह्या केलेल्या नाहीत.

**प्रभाग क्र. ३ एच/जे वॉर्ड बाबत....**

१. पावती पुस्तक क्र. ६३४८ पावती क्र. ६३४७६३ वर लिपिकाची स्वाक्षरी नाही.
२. पावती पुस्तक क्र. ६३२१ पावती क्र. ६३२००३ ते ६३००५३ चलन फाईलमध्ये आढळून आले नाही.
३. पावती पुस्तक क्र. ६४०१ पावती क्र. ६४००४२, ६४००४३, ६४००५५, ६४००५९ यावर लिपिकाची स्वाक्षरी नाही.
४. पावती पुस्तक क्र. ६३०४ दि.२८/०८/२०१२ पावती क्र. ६३०३१२ सन २०१३ च्या पावतीचे रू.५००/- च चलन रजिस्टर मध्ये नाही.
५. पावती पुस्तक क्र. ४१६२ पावती क्र. ४१६१०१ पावती क्र. ०२,०३ मध्ये पोटकिर्द मध्ये नोंद नाही.
६. पावती पुस्तक क्र. ६०५८ पावती क्र. ८०५७२० ते ६०५७३० या पावत्या फाडण्यात आलेल्या नाहीत.
७. पावती पुस्तक क्र. ६४४१ पावती क्र. ६४४०६६ पावती क्र. ३० फाडण्यात आलेली नाही परंतु पोटकिर्द मध्ये रू.१०/- ची नोंद आहे.
८. पावती पुस्तक क्र. ६५२१ दि.२५/०२/२०१३ पावती क्र. ६५२०८८ ते ६५२१०० वर लिपिकाची स्वाक्षरी नाही.

**प्रभाग क्र. ५ (वॉर्ड एफ ४,५,६) बाबत......**

दि.०१/०४/२०१२ ते ३१/०३/२०१३ चे कालावधीतील किरकोळ पोटकिर्द पावतीपुस्तक तपासण्यात आले.

१. पावती पुस्तक क्र. ५९०० पावती क्र. ५८९९५६ दि. २७/०४/२०१२ मे. ऐ. जे. इंजिनिअर्स रक्कम रू. १०/- पोटकिर्द मध्ये नोंद केल्याचे दिसुन येत नाही.
२. पावती पुस्तक क्र. ६११३ पावती क्र. ६११३०० श्रीम. स्नेहा दुबे, फॉर्म फी रू.२०/- वसुल करणे आवश्यक होते परंतु रक्कम रू. १०/- ची कमी रक्कमेची पावती फाडण्यात आली.

**आक्षेप क्र.१.२२ :- बाजार लिलावाबाबत...**

| **विभागाचे नाव** | **मागणी** | | | **वसुली** | | | **थकबाकी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मागील** | **चालू** | **एकूण** | **मागील** | **चालू** | **एकूण** | **मागील** | **चालू** | **एकूण** |
| एकूण | १८५०७८९४ | ५३१८३६२६ | ७१६९१५२० | १७३८६०३९ | २८२४०२२५ | ४५६२६२६४ | ११२१८५५ | २४९४३४०१ | २६०६५२५६ |

बाजार लिलावाची सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाची थकबाकी रक्कम रू.२,६०,६५,२५६/- विभागाने वसुल केलेले नाही. सबब रक्कम रू. २,६०,६५,२५६/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

# पाणी पुरवठा विभाग

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १८९ नुसार महानगरपालिका क्षेत्रात पाणीपुरवठा करणे व त्या बाबतच्या उपाययोजना करणे हे महानगरपालिकेचे आद्य कर्तव्य आहे.

**आक्षेप क्र.२.१ :- पाणीपुरवठा व त्यावर झालेल्या खर्चातील तुट...**

सन २०१२-१३ मध्ये पाणीपुरवठा व मलनिःस्सारण विभागाच्या जमा व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | जमा | |
|---|---|---|
| | **तपशिल** | **रक्कम** |
| | **महसुली जमा** | |
| १. | पाणीपट्टी | २९९४.३८ |
| २. | जलउपकर | ७.८८ |
| ३. | पाणीपुरवठा सुविधा लाभ कर | ३६.२९ |
| ४. | नवीन नळ जोडणी शुल्क | ४.३५ |
| ५. | अनधिकृत नळजोडणी नियमित करणेचे दंडशुल्क | ७.७० |
| ६. | अनधिकृत नळजोडणी पाणी वापर देय | ७.१३ |
| ७. | बोरिंग शुल्क | ०.४९ |
| ८. | खड्डा दुरुस्ती/रस्ता क्रॉसींग शुल्क | २.५६ |
| ९. | नळजोडणी स्थानांतरण/दुरुस्ती शुल्क | १०.२२ |
| १०. | नळ पुर्नजोडणी | १.४१ |
| ११. | नळ जोडणी नावात बदल | ०.४२ |
| १२. | पर्यवेक्षण शुल्क/छाननी शुल्क | १२.९४ |
| १३. | न वटलेले धनादेश, विलंब व इतर | १४.२४ |
| १४. | नळ जोडणी निविदा प्रपत्र शुल्क, | ०.०३ |
| १५. | टँकरद्वारे पाणी पुरवठा | ११९.५५ |
| १६. | इतर | ०.१६ |
| | **मलनिःसारण** | |
| १. | सेप्टीक टँक शुल्क | ३.६३ |
| २. | विशेष स्वच्छता कर | ६.२७ |
| ३. | मलप्रवाह सुविधा लाभ कर | ११५८.७९ |
| | **असाधारण** | |
| १. | पाणी अनामत | २.८२ |
| | **एकूण** | **४३९१.२६** |

(रु.लाखात)

| अ.क्र | खर्च | |
|---|---|---|
| | तपशिल | रक्कम |
| | **महसुली खर्च** | |
| १. | पाणी देयक | २६७७.९७ |
| २. | स्थायी आस्थापना | २४३.४२ |
| ३. | अस्थायी आस्था./सुरक्षा रक्षक | ९९.३० |
| ४. | प्रवास भत्ता | ०.१४ |
| ५. | प्रशिक्षण शुल्क | ०.०६ |
| ६. | टिसीएल पावडर व क्लोरील गॅस | १.६३ |
| ७. | वितरण व्यवस्था/किरकोळ खरेदी/दुरुस्ती | ३२०.४९ |
| ८. | मालमत्ता निगा दुरुस्ती | ३०.९५ |
| ९. | पंपिग स्टेशन किरकोळ खरेदी/दुरुस्ती | ८.७४ |
| १०. | पंपिग व संपग्रह वीज देयक | ३५२.६५ |
| ११. | टँकर भाडे | ९६.०६ |
| १२. | सुचना प्रसिध्दी करणे | १.२४ |
| १३. | प्रदुषण मंडळ नियंत्रण शुल्क | ४.८६ |
| १४. | शहरातील जलवाहिन्यांचे सर्वेक्षण | १.२० |
| १५. | फ्लो मिटर/व्हॉल्व बसविणे/दुरूस्ती करणे | २२.५८ |
| १६. | आकस्मिक खर्च / वाहन इंधन | १.२१ |
| | **मलनिःसारण महसुली खर्च** | |
| १. | देखभाल दुरुस्ती | ११८.९३ |
| २. | वीज देयक | ५६.५८ |
| | **भांडवली खर्च** | |
| १. | साहित्य खरेदी | १०४.५४ |
| २. | नवीन जलवाहिनी टाकणे | ३१०.३५ |
| ३. | कुपनलिका/विंधन विहीर बांधणे | ३.०५ |
| ४. | ५० द.ल.लि.पाणी योजना कर्ज परतफेड | ७४९.८० |
| ५. | पाण्याची टाकी /इमारती बांधकाम | २५.६४ |
| ६. | ५० द.ल.लि.पाणी योजना पूर्ण करणे | ३०८.१५ |
| ७. | नवीन पाणी पुरवठा योजना | ५२.६९ |
| ८. | रेन वॉटर हार्वेस्टींग योजना | ३.४० |
| | **एकुण** | **५५९५.६३** |

(रु.लाखात)

| अ.क्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | एकुण खर्च | ५५९५.६३ |
| २. | एकुण जमा | ४३९१.२६ |

| | **एकुण तुट** | **१२०४.३७** |
|---|---|---|

पाणीपुरवठा विभागाकडील जमा व खर्चाचे अवलोकन केले असता त्यात रु.१२०४.३७ लाखाची तुट असल्याचे निदर्शनास येते. मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत पाणीपुरवठा “ना नफा ना तोटा” या तत्वानुसार लोकसेवेकरिता करण्यात येतो. या तत्वास अनुसरुन जमा व खर्चात येणारी रु.१२०४.३७ लाखाची तुट भरुन काढणे क्रमप्राप्त आहे. सदर तुट भरुन काढण्याच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या प्रयत्नांचा तपशील लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. सबब महानगरपालिकेस पाणीपुरवठयापोटी रु.१२०४.३७ लाख इतका अतिरिक्त खर्च सहन करावा लागला अशी लेखापरिक्षणाची धारणा आहे.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.२.२ :- थकबाकी बाबत...**

मार्च-२०१३ अखेर मागणी-वसुली थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम रुपयात)**

| | **मागील** | | | **चालु** | | | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **पाणीपट्टी** | **उपकर** | **एकूण** | **पाणीपट्टी** | **उपकर** | **एकूण** | |
| **मागणी** | २७२७५१५९ | ४०८६९४ | २७६८३८५३ | २९६५३१४८२ | ११३२२३० | २९७६६३७१२ | ३२५३४७५६५ |
| **वसुली** | १५६१४६७२ | ८०९६६ | १५६९५६३८ | २८३८२२९०१ | ७०७७८९ | २८४५३०६९० | ३००२२६३२८ |
| **चेक रिटर्न** | ० | ० | ० | ३२३६८६६ | ११७२० | ३२४८५८६ | ३२४८५८६ |
| **थकबाकी** | ११६६०४८७ | ३२७७२८ | ११९८८२१५ | १५९४५४४७ | ४३६१६१ | १६३८१६०८ | २८३६९८२३ |

मार्च २०१३ अखेर पाणीपट्टीपोटी रु. २,८३,६९,८२३/- इतकी थकबाकी होती. प्रलंबीत थकबाकी वसुलीबाबत आवश्यक अभिलेख पडताळणीसाठी लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

अनुपालन अप्राप्त असल्याने रक्कम रू.२,८३,६९,८२३/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. २.३ :- आवश्यक माहिती सादर करण्याबाबत...**

पाणी पुरवठा विभागाकडील सन २०१२-१३ या आर्थिक लेखापरिक्षणा करिता खालील माहिती विहीत नमुन्यात उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

१. मीटर वाचन नोंदवही

२. नवीन नळ जोडणी प्रकरणे/नोंदवही

३. करारनामा नोंदवही

४. तेरिज नोंदवही

५. मागणी वसूलीचा/प्रभाग निहाय तक्ता

६. खंडीत करण्यात आलेल्या नळ संयोजन बाबतची नोंदवही व प्रकरणे

७. वाचन नोंदवही (सर्व प्रभाग)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

**आक्षेप क्र. २.४ :- अनधिकृत जलजोडण्या थकबाकीबाबत व खंडीत करण्याबाबत....**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत जलजोडण्या खंडीत करण्याबाबत व थकबाकीबाबत अनियमितता झाल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा विभागाच्या निदर्शनास आलेल्या अनधिकृत नळजोडण्या तोडण्याबाबत विभागाकडून अनेक प्रकरणी कार्यवाही न झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच थकाबाकीवरील विलंब दंड माफ करण्याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

महानगरपालिका क्षेत्रात पाणीपट्टी थकबाकीवर कार्यकारी अभियंता यांचे अधिकारात विविध प्रकरणात विलंब दंड माफ करण्यात आला आहे. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांना विलंब दंड माफ करण्याचे अधिकार नसल्याची लेखापरिक्षणाची धारणा आहे. सक्षम प्राधिका-याच्या मान्यते अभावी थकबाकीवरील विलंब दंड माफ केल्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात तुट आली आहे व त्याचे परिणाम स्वरूपतः महानगरपालिकेचा महसुल बुडाला आहे.

## आक्षेप क्र. २.५ :- मागणी नोंदवहीबाबत....

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम ९०(१) नुसार पाणीपट्टीचा आकार वसुलीसाठी प्रत्येक प्रभागासाठी मागणी नोंदवही ठेवून नियम ७६ मध्ये विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरुन ती अद्यायावत ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक प्रभागाच्या मागण्या, संकलन, थकबाकी इत्यादींचा गोषवारा ठेवणे आवश्यक आहे. तसेच मागणी नोंदवही मध्ये नोंदविलेली थकबाकी मागील मागणी पुस्तकावरुन अग्रेषित केल्याचे व मागणी नोंदवही मध्ये नोंदविलेल्या एकुण संकलनाचे त्या वर्षाचे संकलन पुस्तकाचे गोषवाऱ्याबरोबर पडताळणी केल्याचे विभाग प्रमुखांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभागाचे सन २०१२-१३ चे अभिलेख्यांचे लेखापरिक्षण करताना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मागणी नोंदवहयांमधील रक्कमांचा वार्षिक गोषवारा/ तेरिज (चाळ/इमारत) व घरगुती/वाणिज्य वापर गोषवारा तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे मागील थकबाकी चालु, मागणी व त्यापैकी वसुली झालेल्या रक्कमांचा मागणी पुस्तकावरील नोंदीचा मेळ, भरणा नोंदवही वरील एकुण वसुलीच्या रक्कमांशी घेता आलेला नाही. मागील वर्षाच्या मागणी पुस्तकावरील थकबाकीच्या रक्कमा बिनचुकपणे या वर्षाच्या मागणी नोंदवही मध्ये अग्रेषित आहेत. याबाबत खात्री करता आलेली नाही.

## आक्षेप २.६ :- न वटलेल्या धनादेशाबाबत...

मार्च २०१३ अखेर पाणी देयकातील न वटलेल्या धनादेशांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम रुपयात)**

| अ.क्र | विभाग | पाणीपट्टी | उपकर | न वटलेल्या धनादेशाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | भाईंदर(प.) | ३०६५१५ | १११८ | ३०७६३३ |
| २. | भाईंदर(पु.) | ८२२३७२ | २९११ | ८२५२८३ |
| ३. | मिरारोड | १२७४७६३ | ४८५३ | १२७९६१६ |
| ४. | मिरा | २८३२८७ | ८९६ | २८४१८३ |
| ५. | काशी | १७३०८२ | ५८६ | १७३६६८ |
| ६. | घोडबंदर | ३४८८१२ | १२५० | ३५०१४२ |
| ७. | चेणा-वर्सोवा | ८४१ | ४ | ८४५ |
| ८. | राई-मुर्धा | ७७८४ | २२ | ७८०६ |
| ९. | डोंगरी | - | - | - |
| १०. | उत्तन | १९३३० | ८० | १९४१० |
| | **एकुण** | **३२३६८६६** | **११७२०** | **३२४८५८६** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता मार्च २०१३ अखेर रु.३२,४८,५८६/- चे धनादेश न वटल्याचे निदर्शनास येते. विभगाने रिटर्न केलेली दंडासहित वसुली करून अभिलेख लेखापरिक्षणास अनुपालन अहवाल सादर करावा.

सबब न वटलेल्या धनादेशापोटी अप्राप्त रक्कम रू. ३२,४८,५८६/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र.२.७ :- पाणीपुरवठा गळती व हानी बाबत...**

पाणीपुरवठा विभागाने स्टेम प्राधिकरण व एमआयडीसी यांचेकडुन उचल केलेल्या पाण्याची आकडेवारी व गळतीची टक्केवारी लेखापरिक्षाणस सादर केली आहे. परंतु प्राप्त पाण्याची महानगरपालिका क्षेत्रात झालेली प्रत्यक्ष वाटप व त्या वाटपाबाबत प्रत्येक जोडणी धारकांला दिलेली देयकाची रक्कम याचा सविस्तर तपशिल लेखापरिक्षणाकरिता सादर केलेला नाही. या माहिती अभावी महानगरपालिकेस प्रत्यक्ष प्राप्त पाणी, पाणी वाटपाची आवर्तने, वाटप पाण्याच्या बदली देण्यात आलेली देयके व पाणी गळती याचा तौलनीक अभ्यास करता आला नाही.

पाणीपुरवठा विभागाने सादर केलेली गळतीची टक्केवारी काल्पनिक असल्याची लेखापरिक्षणाची धारणा आहे. सदर गळती १५ % चे विहीत मर्यादेपेक्षा जास्त असल्यास त्याचे परिणामस्वरुपतः महानगरपालिकेचे आर्थिक हानी झालेली आहे. सबब महानगरपालिकेने विकत घेतलेले पाणी व वितरीत केलेले प्रत्यक्ष पाणी यांचा तौलनिक अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे.

**आक्षेप क्र. २.८ :- पाणी व उर्जा लेखापरिक्षणाबाबत (Water Audit)...**

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र.पापुस्व १०००/सीआर ४१९/पापु-२२ दि.२७/०९/२००० अन्वये पाणी व उर्जा लेखापरिक्षणाकरिता कालबध्द कार्यक्रम हाती घेण्याबाबत सर्व महानगरपालिकांना सुचित करण्यात आले होते. शासनाने शासन निर्णय क्र.पापुस्व २००४/सीआर ७५/पापु-२२ दि.०८/०८/२००५ अन्वये सदर लेखापरिक्षणाची मर्यादा मार्च २००८ पर्यंत वाढविली होती.

त्यास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिकेने पाणी व उर्जा लेखापरिक्षणाकरिता कार्यादेश जा.क्र.निभान/पापु/२५६७/२००५-०६ दि.२२/०९/२००५ अन्वये मे. दिनेश राठी ॲड असोशिएट, नागपुर यांची नेमणूक केली. मे. दिनेश राठी यांनी सादर केलेल्या पाणी व उर्जा लेखापरिक्षण

अहवाल व त्यानुसार संबंधित विभागाने केलेल्या उपाययोजना यांचा तपशिल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही. परिणामस्वरुपतः पाणीपुरवठयात विविध बाबींमुळे उद्‌भवणारी तुट व त्यामुळे महानगरपालिकेचे होणारे नुकसान याबाबत भाष्य करता येत नाही.

सन २०११-१२ च्या लेखपरिक्षणात देखील सदर आक्षेप घेण्यात आला होता. आक्षेपाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. २.९ :- जमा पावती नोंदवहीबाबत....**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखसंहिता १९७१ चे नियम-९ नुसार जमा पावती पुस्तकाचे हिशेबासाठी विहीत नमुन्यात साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभागाचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करताना उक्त नियमाप्रमाणे ठेवलेली साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे सदर विभागास मिळालेला एकुण पावती पुस्तकाचे व वापरलेल्या पावती पुस्तकांचा मेळ घालता आलेला नाही.

**आक्षेप क्र. २.१० :- नविन नळ जोडणीबाबत अनियमितता....**

पाणी पुरवठा विभागाचे सन २०१२-१३ चे लेखापरिक्षणाकरिता नविन नळ जोडणी नस्त्यां तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यानुसार पाणी पुरवठा विभागाअंतर्गत असलेल्या उप विभागाचे मागणी नोंदवहीत जी नवीन खाती उतरविण्यात आलेली आहेत. त्याची तपासणी करता आलेली नाही. विभागाने याबाबत माहिती/अभिलेख लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त सोा. यांचेकडील आदेशान्वये दि. ०४ ऑक्टोबर २०११ पासुन नवीन नळजोडणी देणे बंद करण्यात आले. लेखापरिक्षणास उपलब्ध झालेल्या माहितीनुसार जानेवारी २०१२ ते डिसेंबर २०१२ या कालावधीत ७०७ प्रकरणांमध्ये नवीन देयके निर्गमीत करण्यात आली आहे. ज्याअर्थी वरील कालावधीत नवीन देयके निर्गमीत करण्यात आली त्याअर्थी या कालावधीत नवीन नळ जोडण्या देण्यात आल्याची दाट शक्यता आहे. नीवन नळ जोडणीबाबत विभागाने लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध करून दिलेले नाहीत. त्यामुळे नवीन नळजोडणीबाबत लेखापरिक्षण करता आली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

**आक्षेप क्र. २.११ :- बंद संयोजने थकीत बाकी बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मीटर धारकांनी पाणी पुरवठयाची देयके भरलेली नाहीत. अगर इतर कारणामुळे त्याची नळ संयोजने बंद करण्यांत आलेली आहेत. अशा मीटर धारकांकडे असलेली बिलांची थकीत बाकी त्वरित वसुल होणे आवश्यक आहे.

बंद संयोजनापोटी धारकांकडे किती बाकी शिल्लक आहे याचा तपशिल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही. बंद संयोजनापोटी थकित असलेली बाकी वर्षानुवर्षे थकित असुनही बाकी वसुल करण्याबाबत पाणी पुरवठा विभागाकडुन कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा निधी मोठया प्रमाणात अडकुन राहिलेला आहे. सदर रक्कम वसुल करण्याबाबत विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही व याकामी विभाग प्रमुख यांचेकडून संपुर्णपणे दुर्लक्ष झालेले असल्याचे आढळून येते. याबाबत खात्री करुन सदरच्या रक्कम वसुल करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. २.१२ :- धनादेश नोंदवहीबाबत...**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता पाणी पुरवठा विभागाने ठेवलेल्या धनादेश नोंदवहीत घेतलेल्या नोंदी समक्ष अधिका-याने अधिप्रमाणीत केलेल्या नाहीत.

परत आलेल्या धनादेशाची रक्कम रोखीने घेतलेली आहे किंवा नाही याची नोंद धनादेश नोंदवही मध्ये घेणे आवश्यक आहे. तथापि परत आलेल्या धनादेशाबाबत अशी कार्यवाही झालेली नसल्याचे आढळून आले. सदरच्या धनादेशाची वसूली झालेली आहे याची शहानिशा विभाग प्रमुखांनी करावी. तसेच धनादेश नोंदवहीमध्ये प्रत्येक दिवसाच्या धनादेशाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत या नोंदी दररोज का घेण्यात येत नाहीत.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.२.१३ :- जल उपकरावरील वटाव (Rebate) बाबत...**

Water (Prevention and Control of pollution) Cess Act 1977 मधील Section-7 मधील तरतुदीनुसार ज्या महानगरपालिकांनी Sewage Treatment Plant उभारले आहेत त्यांना जलउपकरातुन २५ % वटाव (Rebate) देण्याबाबत तरतुद आहे. अभिलेख्याच्या पडताळणी अंती महानगरपालिका क्षेत्रात सन २०१२-१३ मधे चार Sewage Treatment Plan कार्यान्वित असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे महानगरपालिकेने शासनाकडे जमा केलेल्या जल उपकरावर २५ % वटावाची (Rebate) मागणी करणे क्रमप्राप्त होते. पाणीपुरवठा विभागाने अशा वटावाची (Rebate) मागणी शासनाकडे केली नसल्याचे निदर्शनास आले.

महानगरपालिकेने सदर वटावाबाबत शासनाकडे मागणी सादर करणे अभिप्रेत आहे. याबाबत विभागाकडुन दुर्लक्ष झालेले असुन शासनाकडुन अशा वटावापोटी महानगरपालिकेस किती रक्कम येणे आहे याचा खुलासा होत नाही.

सन २०११-१२ च्या लेखा परिक्षणात सदर आक्षेप घेण्यात आला होता आक्षेपाचे अनुपालन अद्यापपर्यंत प्रलंबीत आहे.

**आक्षेप क्र.२.१४ :- स्वामित्व धनाचा (Royalty) भरणा शासन करणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागामार्फत भुयारी गटार योजना, नवीन जलवाहिन्या टाकणे, मल निस्सारण केंद्र उभारणे इ. यासारखे प्रकल्प राबविण्यात येतात. सदर प्रकल्पांच्या अंदाजपत्रकात गौण खनिजांच्या उत्खननाबाबत कंत्राटदाराने राज्य शासनास प्रदान करावयाच्या स्वामित्व धनाचा (Royalty) चा अंतर्भाव असतो. महसुल व वन विभागाकडील परिपत्रक क्र.गौणखनिज-१०/२००६/प्र.क्र.३७/ख (१) दि.१५/१२/२००६ अन्वये गौण खनिजांचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

सन २०१२-१३ मधे पाणी पुरवठा विभागामार्फत राबविण्यात योणाऱ्या विविध प्रकल्पांमध्ये गौण खनिजांच्या स्वामित्व धनापोटी कंत्राटदाराने शासनास भरणा करण्यात आलेल्या रकमांचा तपशिल व त्याचे पृष्ठ्यर्थ त्याने सादर केलेले अभिलेख यांचा तपशिल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही. गौण खनिजांच्या स्वामित्व धनापोटी कंत्राटदाराकडे शासनाचे लाखो रूपये थकल्याची लेखापरिक्षणाची धारणा आहे. सदर धारणा पक्की करण्यासाठी विभागाने आवश्यक अभिलेख व चलने लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. २.१५ :- रु. १० लाखावरील करारनाम्याबाबत...**

Bombay Stamp Act १९५८ मधील Article ६३ व ५४(ii) read with Article (b) of schedule नुसार रु. १० लाखापर्यंत करारनाम्याकरिता रु. १००/- व रु.१०,००,०००/- वरील प्रत्येक लाख रुपयापर्यंतच्या करारनाम्याकरिता प्रत्येकी १००/- या प्रमाणे जास्तीत जास्त ५ लाख रुपये मुद्रांक शुल्क आकारणी करणे क्रमप्राप्त आहे. महानगरपालिकेतील पाणी पुरवठा विभागमार्फत सन २०१२-१३ मधे कंत्राटदारांशी व पुरवठादाराशी करण्यात आलेले रू. १० लाखावरील करारनामे लेखापरिक्षणास सादर केले नाहीत. यामुळे मुद्रांक शुल्कापोटी कंत्राटदाराकडे गुंतलेल्या शासनाच्या रक्कमेबाबत निष्कर्ष काढता आले नाहीत.

सबब रू. १० लाखावरील करारनामे लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

# लेखा विभाग

**आक्षेप क्र. ३.१ :- थकित अग्रीम वसुलीबाबत...**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाच्या अखेरीस रक्कम रु.५२,९८,४३४/- एवढया रक्कमेचे अग्रीम समायोजन होणे बाकी आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(रक्कम रुपयात)

| अ.क्र | कर्मचारी/अधिकायाचे नांव | अग्रीमाचा तपशिल | प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. चारूदत्त नाईक | सर्वेक्षण अग्रिम | | १.४.१९९३ | १०००० |
| २. | श्री. सुरेश सोनसळे | बांधकाम अग्रिम | | ११.१.१९९५ | २००० |
| ३. | श्री. सचिन जुवेकर | पाणीपुरवठा | ४०९ | १०.६.१९९४ | १०००० |
| ४. | श्री. सुरेश सोनसळे | नगररचना अग्रिम | | १०.७.१९९५ | २५००० |
| ५. | श्री. सुरेश सोनसळे | नगररचना अग्रिम | | १८.८.१९९५ | १५००० |
| ६. | कै . सुधाकर राणे | पाणीपुरवठा | २१८ | २१.५.१९९६ | १०००० |
| ७. | कै. सुधाकर राणे | पाणीपुरवठा | ७०५ | ६.८.१९९६ | १०००० |
| ८. | श्री. शंकर कुलकर्णी | क्रिडास्पर्धा | ८८१ | १४.१२.१९९९ | १४७७३ |
| ९. | श्री. यशवंत भालेराव | निवडणूक अग्रिम | २६० | १५.७.२००२ | १०००० |
| १०. | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १२४५ | २६.१०.२००७ | ३४९८७५ |
| ११. | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १२६६ | १.११.२००७ | २८७७३५ |
| १२. | डॉ. नंदकिशोर लहाने | जागतिक क्षयरोग दिनानिमित्त | २३२२ | २५.३.२००८ | १५००० |
| १३. | श्री. बाळू विंगीयन | वैद्यकिय अग्रिम | ५२ | | |
| १४. | श्री. सुनिल काळे | स्टॅम खरेदी | ६३ | १२.५.२०१० | १८०११ |
| १५. | श्री. हंसराज मेश्राम | अभ्यास दौरा | ३०५ | ६.८.२०१० | २५००० |
| १६. | डॉ. बी. डी. चकोर | पल्स पोलिओ | ३९७ | २३.८.२०१० | १५७८३० |
| १७. | डॉ. बी. डी. चकोर | रूग्णालय किरकोळ खरेदी | ६५८ | २६.१०.२०१० | ५०००० |
| १८. | डॉ. बी. डी. चकोर | पल्स पोलिओ | ९३८ | २४.११.२०१० | १५८७९० |
| १९. | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | १११२ | २४.१२.२०१० | ३०००० |
| २०. | डॉ. नंदकिशोर लहाने | आरोग्यविषयक कार्यक्रम | १३०७ | ३१.१.२०११ | ५००० |
| २१. | डॉ. नंदकिशोर लहाने | कुष्ठरोग सप्ताह | १३६१ | १५.२.२०११ | १६३८६० |
| २२. | डॉ. नंदकिशोर लहाने | पल्स पोलिओ | १४१५ | २३.२.२०११ | ९००० |
| २३. | डॉ. प्रिया सुजीत फडके | पल्स पोलिओ | १९४७ | ३१.३.२०११ | १६३८६० |
| २४. | श्री. नागेश इरकर | जागतिक पर्यावरण | १६७ | २४.५.२०११ | २५००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिन | | | |
| २५. | श्री. हंसराज मेश्राम | जागतिक पर्यावरण दिन | १६८ | २४.५.२०११ | २५००० |
| २६. | डॉ. प्रिया सुजीत फडके | पल्स पोलिओ | २१७ | २७.५.२०११ | १६२९६० |
| २७. | श्री. राजकुमार घरत | प्रवास खर्च | ५०४ | २१.७.२०११ | २०००० |
| २८. | श्री. कांतीलाल बांगर | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२१ | २९.१२.२०११ | ३०००० |
| २९. | श्री. प्रकाश पवार | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२२ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३०. | श्री. अभय सोनावणे | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२३ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३१. | श्री. निलकंठ उदावंत | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२४ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३२. | श्री. रविंद्र पाटील | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२५ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३३. | श्री. विजय पाटील | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२६ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३४. | श्री. अरविंद साळके | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२७ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३५. | श्री. नितीन खैरे | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२८ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३६. | श्री. रमेश घरत | डास निर्मुलन कार्यक्रम | १६२९ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३७. | श्री. श्याम चौगुले | डास निर्मुलन कार्यक्रम | १६३० | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३८. | श्री. श्रीकांत पराडकर | डास निर्मुलन कार्यक्रम | १६३१ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ३९. | श्री. मोहन पेडवी | डास निर्मुलन कार्यक्रम | १६३२ | २९.१२.२०११ | ३०००० |
| ४०. | श्रीम. विश्वभारती चहांदे | ग्रंथ खरेदी | १७८१ | २०.१.२०१२ | १५००० |
| ४१. | डॉ. प्रमोद पडवळ | शववाहिनी/रूग्ण वाहिका दुरूस्ती | १९४२ | १०.२.२०१२ | ७५००० |
| ४२. | श्रीम. दिपाली पोवार | गणेशोत्सव सजावट स्पर्धा | २०४४ | २८.२.२०१२ | ३२४०० |
| ४३. | श्री. हंसराज मेश्राम | फळे फुले प्रदर्शन | २०६५ | १.३.२०१२ | ५०००० |
| ४४. | श्री. हंसराज मेश्राम | अभ्यास दौरा | २०६६ | १.३.२०१२ | २०००० |
| ४५. | श्री. वासुदेव शिरवळकर | सार्वत्रिक निवडणूक | २१४८ | २०.३.२०१२ | ५०००० |
| ४६. | डॉ. प्रमोद पडवळ | रूग्णालय कपडे धुलाई | २२७२ | २७.३.२०१२ | २०००० |
| ४७. | डॉ. प्रमोद पडवळ | आरोग्य विषयक कार्यक्रम | २२७३ | २७.३.२०१२ | १०००० |
| ४८. | श्री. चिंतामण शिंदे | कुरियर खर्च | २४४४ | ३१.३.२०१२ | ५०००० |
| ४९. | श्री. हंसराज मेश्राम | निसर्ग उद्यान प्रदर्शन | २४७९ | ३१.३.२०१२ | ५०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५०. | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | ३० | २१.४.१२ | १७९७०० |
| ५१. | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | ३६ | २१.४.१२ | २०९७८० |
| ५२. | श्री. अविनाश जाधव | आपत्कालीन अग्रिम | १४८ | २१.५.१२ | ५०००० |
| ५३. | श्री. दादासाहेब खेत्रे | --/-- | १४९ | २१.५.१२ | ५०००० |
| ५४. | श्री. चंद्रकांत बोरसे | --/-- | १५० | २१.५.१२ | ५०००० |
| ५५. | श्री. हंसराज मेश्राम | जागतिक पर्या. दिन | १७५ | २९.५.१२ | १०००० |
| ५६. | श्री. आनंद के. दाभाडे | अपंग कर्म. साहित्य पुरवठा | १९६ | ३१.५.१२ | ५०००० |
| ५७. | श्री. सय्यद अ. मोहिनउद्दीन | वैद्यकिय खर्च अग्रिम | २३९ | ८.६.१२ | १५०००० |
| ५८. | श्री. प्रशांत के. पाटील | निवडणूक अग्रिम | २५३ | १९.६.१२ | ५००० |
| ५९. | श्री. हंसराज मेश्राम | उद्यान विभाग खर्च | २७८ | २१.६.१२ | ५०००० |
| ६०. | श्री. वसंत राणे | मनपा सार्व. निव. २०१२ | ४३५ | १७.७.१२ | ५०००० |
| ६१. | श्री. जनार्दन भासे | मनपा सार्व. निव. २०१२ | ४३६ | १७.७.१२ | ५०००० |
| ६२. | श्री. नरेंद्र चव्हाण | मनपा सार्व. निव. २०१२ | ४३७ | १७.७.१२ | ५०००० |
| ६३. | श्रीम. दिपाली पोवार | मनपा सार्व. निव. २०१२ | ४३८ | १७.७.१२ | ५०००० |
| ६४. | श्री. हेमंत पाटील | मनपा सार्व. निव. २०१२ | ४३९ | १७.७.१२ | ५०००० |
| ६५. | श्री. चिंतामण शिंदे | मनपा सार्व. निव. २०१२ | ४४० | १७.७.१२ | ५०००० |
| ६६. | श्री. दिलीप जगदाळे | मनपा सार्व. निव. २०१२ | ४४१ | १७.७.१२ | ५०००० |
| ६७. | श्री. रामचंद्र असोदेकर | मनपा सार्व. निव. २०१२ | ४४२ | १७.७.१२ | ५०००० |
| ६८. | श्री. माणिक जाधव | मनपा सार्व. निव. २०१२ | ४४३ | १७.७.१२ | ५०००० |
| ६९. | श्री. सुदाम गोडसे | मनपा सार्व. निव. २०१२ | ४४४ | १७.७.१२ | ५०००० |
| ७०. | श्री. प्रशांत पाटील | मनपा सार्व. निव. २०१२ | ४४५ | १७.७.१२ | २५००० |
| ७१. | श्री. किरण राठोड | निवडणूक अग्रिम | ६०३ | ७.८.१२ | १०००० |
| ७२. | श्री. दिपक सावंत | निवडणूक अग्रिम | ६१२ | १३.८.१२ | ५२५००० |
| ७३. | श्री. अनिल राठोड | एकात्मिक डास नियंत्रण | ७२३ | १०.९.१२ | ४०००० |
| ७४. | डॉ. प्रमोद पडवळ | रूग्णालय फर्निचर | ७५१ | १७.९.१२ | २००००० |
| ७५. | श्री. प्रशांत पाटील | जेष्ठ नागरिक सत्कार | ९१२ | १८.१०.१२ | २५००० |
| ७६. | श्रीम. चित्रा कडू | पोस्टाचे स्टँप खरेदी | ९६१ | ३०.१०.१२ | ५००० |
| ७७. | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १०४१ | ९.११.१२ | २११२८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७८. | डॉ. प्रमोद पडवळ | पल्स पोलिओ | १०४२ | ९.११.१२ | २११२८० |
| ७९. | श्रीम. विश्वभारती चहांदे | वाचनालय परतावा | १२१७ | १२.१२.१२ | ४८०० |
| ८०. | श्री. वसंत राणे | आस्था वि. माहिती अधि. | १२८७ | १७.१२.१२ | २५००० |
| ८१. | श्री. प्रकाश पाटील | वाहन दुरूस्ती | १२९१ | २१.१२.१२ | १५००० |
| ८२. | श्री. रामचंद्र असोदेकर | स्थानिक संस्था कर नोटीस | १२४४ | ५.१.१३ | ९०००० |
| ८३. | श्री. रामचंद्र असोदेकर | स्थानिक संस्था कर नोटीस | १४६२ | ३०.१.१३ | २५००० |
| ८४. | श्रीम. विश्वभारती चहांदे | ग्रंथ खरेदी | १५२१ | २२.२.१३ | ५०००० |
| ८५. | श्रीम. दिपाली पोवार | जागतिक महिला दिन | १५६६ | ७.३.१२ | २५५०० |
| | **एकूण** | | | | **५२,९८,४३४** |

महानगरपालिकेतील विविध विभागप्रमुख, कर्मचारी व प्रतिनियुक्तीच्या अधिकारी यांना अग्रीम दिल्याचे दिसुन येते. तसेच महानगरपालिकेचे कर्मचाऱ्यांनी एकदा घेतलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन झालेले नसतानाही पुन्हा पुन्हा अग्रीम घेतलेले आहे. ज्या कामासाठी अग्रीम दिला आहे त्या रक्कमांचे खर्च होताच समायोजन करणे क्रमप्राप्त आहे. सन १९९३-९४ पासुन आहरित केलेल्या अग्रीमाचे समायोजन प्रलंबीत आहे. लेखा विभागाने संबंधित कर्मचाऱ्यांना समायोजनाबाबत विभागाने नोटीशी बजावल्या आहेत. परंतु अद्यापही आक्षेपाधीन रक्कमाचे समायोजन झाल्याबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध झालेला नाही. अग्रीमापोटी प्रदान करण्यात आलेल्या रक्कमांचे महानगरपालिका निधीत तात्काळ समायोजन होणे आवश्यक आहे. प्रलंबित रक्कमा अधिकाऱ्यांच्या वेतनातुन व सव्याज वसुल कराव्यात अशी लेखापरिक्षणाची शिफारस आहे.

सबब अग्रीम समायोजनापोटी प्रलंबित रक्कम रू. ५२,९८,४३४/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आपेक्ष क्र. ३.२ :- सर्वसाधारण रोखवहीतील शिल्लक रक्कमांबाबत...**

मार्च २०१३ अखेर सर्वसाधारण रोखवहीतील शिल्लक रक्कमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे

(रक्कम रुपयात)

| अ.क्र | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक लि., | रु. ३१७३१२१३.३१ |
| २. | भारतीय स्टेट बँक | रु. ९३०७३६२४.३६ |
| ३. | इंडियन बँक | रु. १३४६६७२८४.२५ |
| ४. | ओ.बी.सी.बँक | रु. १७८६५१०७.२६ |
| ५. | एफ.डी.आर | रु. १३५२७०९.८१ |
| ६. | आय.सी.आय.सी.आय | रू. ५४३८७९.०० |
| ७. | भारतीय स्टेट बँक(कर) | रु. १३३७७४३६५.७२ |
| ८. | भारतीय स्टेट बँक(पा.पु) | रु. ३८९२५२१७.०० |
| | **एकूण** | **रु. ४५१९३३४००.७१** |
| हातातील रोख शिल्लक | | रु. ६८०७.१७ |
| **अखेरची शिल्लक** | | **रु. ४५१९४०२०५.८८** |

सर्वसाधारण रोखवहीत शिल्लक रक्कमाचे अवलोकन केले असता निदर्शनास येते की महानगरपालिकेच्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मधील खात्यामधे रु.३,१७,३१,२१३.३१ एवढी रक्कम शिल्लक होती. सन २०११-१२ अखेर सदर रक्कम रू. २,३६,२५,४३६/- म्हणजेच शिल्लक रक्कमेत सन २०१२-१३ अखेर वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील बहुतांश सहकारी बँका दिवाळखोरीने ग्रस्त आहेत. तसेच सदर बँकेद्वारे महानगरपालिकेस Auto Swip Facility उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सबब ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील खात्यावर जास्त शिल्लक रक्कम ठेवणे कितपत योग्य आहे याचा विचार महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे.

याबाबत सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणात सम स्वरूपाचा आक्षेप घेण्यात आला होता. परंतु, याबाबत विभागाने कार्यवाही करून अनुपालन सादर केलेले नाही.

**आक्षेप क्र. ३.३ :- कर्जाच्या दायित्वाबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकने विविध प्रकल्पांकरिता घेतलेल्या कर्जाच्या मार्च-२०१३ अखेरीस दायित्वाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम रुपयात)**

| **अनु.क्र** | **कामाचे नाव** | **रक्कम** |
|---|---|---|
| १. | श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्ग | ८७६४०५००.०० |
| २. | 50 mld पाणीपुरवठा योजना | २३८९८६१८५.०० |
| ३. | 50 mld पाणीपुरवठा योजना | १४८२५००५.०० |
| ४. | डि.पी.रोड | १८९४४११३.०० |
| ५. | डि.पी.रोड | ३७४७४०५१.०० |
| ६. | डि.पी.रोड | २८१४१६७७.०० |
| ७. | डि.पी.रोड | २२३४९६५९.०० |
| ८. | डि.पी.रोड | ११९४६७९२.०० |
| ९. | डि.पी.रोड | ३०४६९१७९.०० |
| १०. | डि.पी.रोड | ३४३६९९५६.०० |
| ११. | डि.पी.रोड | १७२७१६१७.०० |
| १२. | डि.पी.रोड/SEWERAGE | १५४४९५२२४.०० |
| १३. | डि.पी.रोड/SEWERAGE | ९९१५५२४९.०० |
| १४. | डि.पी.रोड/SEWERAGE | ४८२१८७३४.०० |
| | **एकूण** | **८४,४२,८७,९४१.००** |

महानगरपालिकेच्या कर्जाच्या दायित्वाची नोंद नोंदवही नमुना क्र.१४३ मधे घेण्यात येते. सदर नोंदवहीचे लेखापरिक्षण केले असता महानगरपालिका कर्जाच्या दायित्वाची परतफेड नियमितपणे करत असल्याचे निदर्शनास आले. सदर बाब स्तुत्य आहे.

महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या बँकांमधे अधिक्याच्या (Surplus) रक्कमांची गुंतवणुक केली जाते त्यावर महानगरपालिकेस विशिष्ट दराने व्याज मिळते. महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जावरील व्याजाचे दर व अधिक्याच्या रकमांच्या गुंतवणुकीवरील व्याजाचे दर यांची तुलना केली असता

कर्जावरील व्याजाचे दर जास्त आहेत. सबब महानगरपालिकेने अधिक्याच्या रक्कमांची गुंतवणुक करण्याऐवजी अशा रक्कमातुन कर्ज परत फेडीस प्राधान्य दिल्यास महानगरपालिकेवरील कर्जाचे दायित्व व व्याजाचा बोजा कमी होण्यास मदत होईल. याबाबत महानगरपालिकेने धोरण निश्चित करणे अत्यावश्यक आहे.

**आक्षेप क्र. ३.४ :- येणी असलेल्या अनुदानांबाबत...**

मार्च-२०१३ अखेरीस येणी असलेल्या अनुदानांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र | विभागाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १. | दलित वस्ती अनुदान | १९.०० |
| २. | संत गाडगेबाबा अनुदान | ५.०० |
| ३. | ॲनिमल वेल्फेअर | १०.०० |
| ४. | मुलभूत सुविधा अनुदान | ५.०० |
| ५. | पशुगणना मानधन अनुदान | १.०० |
| ६. | ग्रंथालय अनुदान | ०.६४ |
| | **एकुण** | **४०.६४** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन केले असता रु.४०.६४ लाखाचे अनुदान महानगरपालिकेस येणे प्रलंबीत आहे. प्रलंबित अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे किंवा कसे याबाबत विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे.

येणी असलेल्या अनुदानाची रक्कम रू. ४०.६४ लाख आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. ३.५ :- अखर्चित अनुदानाबाबत...**

मार्च-२०१३ अखेर अखर्चित अनुदानांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम रुपयात)**

| अ.क्र | बाब | रक्कम |
|---|---|---|
| १. | दहावा वित्त आयोग | ३०२.५६ |
| २. | दलित वस्ती सुधारणा | ६६.८७ |
| ३. | आमदार/खासदार फंड | २८६.०९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **एकूण** | **६५५.५२** |

महानगरपालिकेस प्राप्त उपरोक्त अनुदानांचा विनियोग ज्या बाबींकरिता ते मंजुर झाले आहेत त्याच्या प्रयोजनासाठी खर्च होणे अपेक्षित आहे. सदर निधी अखर्चित राहण्याबाबतच्या कारणांचा खुलासा ज्या विभागासाठी ते प्राप्त झाले आहे त्या विभागाकडुन घेवुन त्याचे अनुपालन लेखापरिक्षणास सादर करण्यात यावे.

प्राप्त अनुदानाचा विनियोग सत्वर झाल्यास व त्याचे विनियोग प्रमाणपत्र संबंधित विभागास सादर केल्यास पुढील अनुदाने महानगरपालिकेस वेळीच वितरीत होण्याचा मार्ग सुकर होतो. सबब शासनाकडून जास्तीत जास्त अनुदाने प्राप्त करण्याच्या अनुषंगाने प्राप्त अनुदाने संबंधीत बाबींवर त्वरित खर्च करणे व जास्तीत जास्त अनुदानासाठी प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे. याबाबत सर्व संबंधीत विभागाने दक्षता घेवुन त्याअनुषंगाने कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

# स्थानिक संस्था कर विभाग

**आक्षेप क्र. ४.१ :- स्थानिक संस्था कर वसुलीबाबत.....**

सन २०१२-१३ या वर्षातील स्थानिक संस्था कर वसुलीच्या माहिती बाबतचा तक्ता

(रु.कोटीत)

| सन | जकाती प्रमाणे उद्दिष्ट | स्थानिक संस्था कर वसुली | तफावत |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | १३०.०० | १०३.९७ | २६.०३ |

मिरा भाईंदर महानगरपालिका मुद्रांक शुल्क १% (अधिभार) उत्पन्नाचा तक्ता

(रु.कोटीत)

| सन | मागणी/अनुज्ञेय | प्राप्त | अप्राप्त |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ३५.०० | ३०.१० | ४.९० |

स्थानिक संस्था करापासुन मिळालेले एकूण उत्पन्न

(रु.कोटीत)

| सन | स्थानिक संस्था कर वसुली | १% मुद्रांक शुल्क (अधिभार) | एकूण उत्पन्न | १% मुद्रांक शुल्कपैकी अप्राप्त रक्कम |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | १०३.९७ | ३०.१० | १३४.०७ | ४.९० |

सन २०१२-१३ या वर्षामधील स्थानिक संस्था कर वसुलीचा मासिक अहवाल

| **महिना** | **२०१२-१३ (वार्षिक उदिद्ष्ट)** | **२०१२-१३** |
|---|---|---|
| एप्रिल | | **८,३८,५९,४७१** |
| मे | | **७,६१,२०,७०६** |
| जुन | | **७,४३,२८,६७०** |
| जुलै | | **७,६१,८३,३५४** |
| ऑगस्ट | | **६,८२,९६,३५४** |
| सप्टेंबर | | **७,५४,८९,४११** |
| ऑक्टोबर | **१३०.००** | **९,३४,८२,८३३** |
| नोव्हेंबर | | **८,०८,०७,२८१** |
| डिसेंबर | | **१०,०२,९९,०८६** |
| जानेवारी | | **१०,४२,१६,७५४** |
| फेब्रुवारी | | **९,४३,३४,३१२** |
| मार्च | | **११,२३,०८,३३३** |
| **एकुण** | | **१,०३,९७,२६,५६५** |

सन २०१२-१३ मध्ये स्थानिक संस्था कराचे वसुलीचे उद्दीष्ट रू. १३०.०० कोटी इतके असतांना विभागाने दिलेले उद्दीष्ट पुर्ण केल्याचे दिसुन येत नाही. स्थानिक संस्था कराची वसुली रू.१०३.९७ कोटी इतकी केलेली आहे. उर्वरित थकबाकी वसुली बाबत विभागाने अनुपालन सादर करावे.

**आक्षेप क्र. ४.२ :- सन २०१२-१३ या वर्षाचे लेखापरिक्षणास अभिलेख व माहिती उपलब्ध करून न देणेबाबत......**

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणास विभागामार्फत खालील माहिती उपलब्ध करण्यात आली नाही.

१. बँक ताळमेळ पत्रके
२. थकबाकी वसुली बाबत
३. RTO वाहन खरेदीसाठी वाहन धारकांना दिलेल्या नोटीसा व रक्कम भरणा केल्याचा तपशिल
४. नोंदणीकृत व अनोंदणीकृत व्यापाऱ्यांची संख्या
५. अनोंदणीकृत व्यापारी नोंदणीकृत करण्यासाठी केलेले प्रयत्न
६. नोंदणीकृत व अनोंदणीकृत व्यापाऱ्यांसाठी विवरणपत्र दाखल केलेल्या व्यवसायीकांची संख्या / न दाखल केलेले पोटकिर्द व पावती पुस्तके यांचा ताळमेळ
७. व्यापाऱ्यांचे केलेले निर्धारण व त्याबाबतच्या नस्त्या सादर करणे.
8. पावती पुस्तक व साठा नोंदवही ताळमेळ

उपरोक्त अभिलेख व माहिती स्थानिक संस्था कर विभागाने लेखापरिक्षणा करिता उपलब्ध करुन दिलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. ४.३ :- ठोक रक्कम स्विकारण्याबाबत.**

ज्या व्यापाऱ्यांची १ ते ५ लाखापर्यंतचे आत वार्षिक उलाढाल आहे. अशा व्यापा-यांकडून ठोक रक्कम स्विकारणेत येत असते. ठोक रक्कम कराचा भरणा केलेल्या गटनिहाय तक्ता परिशिष्ट 'अ' मध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे.

सन २०१२-१३ मध्ये एकरकमी/वार्षिक ठोक रक्कम कराचा भरणा केलेले व्यापारी

**(रक्कम रुपयात)**

| अ.क्र. | गट क्र. | संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | १ ते २१ | ३१६३ | ९६.४७ (लाख) |

सदर व्यापाऱ्यांकडून नमुना ''द'' फॉर्म सोबत वार्षिक उलाढाली बाबत वार्षिक विवरण पत्र व्यापाऱ्याकडुन भरुन घेणे आवश्यक आहे. प्राप्त अभिलेख्यांचे अवलोकन केले साधारणतः १५% व्यापाऱ्याकडून ''द'' फॉर्म घेण्यात आलेले नाहीत. त्याप्रमाणे कार्यवाही संबंधित विभागाकडुन झालेचे दिसून येत नाही.

**आक्षेप क्र. ४.४ :- सहामाही विवरण पत्राबाबत...**

सन २०१२-१३ मधील गट क्र.१ ते २१ ची एकत्रित माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | | एकूण |
|---|---|---|---|
| १. | व्यापाऱ्यांची नोंदणी संख्या | | २११०० |
| २. | १० लाखावरील व्यापाऱ्यांची संख्या | | २६५ |
| ३. | स्थानिक संस्था कराची वसुली साठी नमुना नोटीस वाटप संख्या | ज | १६०१२ |
| | | छ | १६०१२ |
| | | त्र | ७२७ |
| ४. | वार्षिक विवरणपत्र जमा | | ९९१ |
| ५. | निर्धारण केलेली फाईल संख्या | | ६३२ |
| ६. | निर्धारण केलेली वाढीव रक्कम | | ५३.८६ (लाख) |
| ७. | ठोक रक्कम भरणा करणाऱ्या व्यापाऱ्यांची संख्या | | ३१६३ |
| ८. | ठोक रक्क वसुली | | ९६.४७ (लाख) |

वरील जोडपत्रात सहामाही विवरण पत्र जमा संख्या दिलेली नाही. सहामाही विवरण पत्र किती जमा झाली याबाबत निश्चित बोध होत नाही.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. ४.५ :- " पी " रजिस्टरला नोंद घेण्याबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि.०१/०४/२०१० पासुन जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू झाला आहे. महानगरपालिका क्षेत्राचे निवडणूक प्रभागनिहाय २१ गट पाडण्यात आलेले असुन प्रत्येक २ गटासाठी एक स्थानिक संस्था कर अधिकारी, २ लिपीक, २ शिपाई, असा कर्मचारी वर्ग नेमण्यात आला आहे.. स्थानिक संस्थाकर नोंदणीकृत व्यापारी संख्या १८८०४ असुन त्या व्यापाऱ्याची नोंदणी प्रमाण पत्रानुसार पी. रजिस्टरला नोंद घेणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे नोंदणी

घेण्याबाबत सन २०१२-१३ मधे कार्यवाही करण्यात आलेली नाही. दुय्यम निबंधक कार्यालयाकडून किती मालमत्तेचे/सदनिकेचे नोंदणी करण्यांत आली याबाबत मासिक माहिती घेण्यांत आलेली दिसून येत नाही. त्याकारणाने मुद्रांक शुल्क अधिभाराची १**%** प्रमाणे मागणी निश्चित करता आलेली नाही. याबाबत विभागाने अनुपालन अप्राप्त आहे.

### आक्षेप क्र. ४.६ :- मुद्रांक शुल्क अधिभाराच्या वसुलीबाबत...

स्थानिक संस्था कर व १% अधिभारबाबत वसुली तक्ता

(आकडेवारी कोटीत)

| वर्ष | नोंदणीकृत व्यापारी | जकाती प्रमाणे उदिद्ष्ट | स्था.सं.कर वसुली | १% अधिभार बाबत वसुली व प्राप्त थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १% अधिभार वसुली | मनपास १% अधिभार रक्कम प्राप्त | १% अधिभार प्राप्त होणे बाकी |
| २०११-१२ | १८८०४ | १४०.०० | १०२.९९ | ४८.०८ | ३८.८२ | ९.१९ |
| २०१२-१३ | २११०० | १३०.०० | १०३.९७ | ५०.२६ | ३१.१० | २०.१६ |
| | | | | | एकुण | २९.३५ |

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी १% मुद्रांक शुल्क अधिभारा पोटी रु.५०.२६ कोटी इतका महसुल महानगरपालिकेस प्राप्त होणे अपेक्षित होते. त्यापैकी रु. ३१.१० कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झाली. मागील वर्षाच्या थकबाकीसह रु. २९.९५ कोटी इतके रक्कम शासनाकडे पाठपुरावा करून वसुली करणे आवश्यक होते. मुद्रांक शुल्क अधिभार वसुलीबाबत खुलासा करण्यात यावा.

### आक्षेप क्र. ४.७ :- कराची वसुली करणेबाबत...

स्थानिक संस्था कराचा भरणा न केलेल्या व्यापाऱ्याकडून कराची वसुली करणेबाबत कसोशिने प्रयत्न करणे आवश्यक आहे. “पी” नोंदवहीत नोंदणीकृत व्यापा-यांची नोंद घेण्यात आली आहे. तथापि शेरा रकाण्यामध्ये अधिकाऱ्यांची स्वाक्षरी केलेली नाही. “पी” नोंदवही पाहता बऱ्याच व्यापा-यांनी स्थानिक संस्था कराचा भरणा केलेला नसल्याचे व त्या व्यापाऱ्यांचा स्थानिक

संस्था कराचा भरणा “शुन्य प्रदान” केल्याचे दिसुन येत आहे. तरी सर्व व्यापाऱ्यांकडून स्थानिक संस्था कर वसुल करणे आवश्यक आहे.

# परवाना विभाग

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३, ३७६ व ३८६ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील विविध व्यवसाय/उद्योगधंदे, आस्थापना यांना महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे.

**आक्षेप क्र. ५.१ :- परवाना नोंदवही /मागणी नोंदवही न ठेवणेबाबत.**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १०२ (२) नुसार नमुना ७६ प्रमाणे परवाना नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परवाना विभागाकडील अनुज्ञप्ती फी, दुकाने, कारखाने नोंदणी फी याकरिता उक्त नियमानुसार नमुना क्र. ७६ प्रमाणे परवाना नोंदवही ठेवलेले नाही. यात मागणी संकलन, थकबाकी इत्यादींचा गोषवारा ठेवणे आवश्यक आहे. तसेच मागणी नोंदवही मध्ये नोंदलेली थकबाकी, मागील मागणी पुस्तकावरुन अग्रेषित केल्याचे व मागणी नोंदवही मध्ये नोंदलेल्या एकूण संकलनाचे त्यावर्षी संकलन पुस्तकाचे गोषवाऱ्या बरोबर पडताळणी केल्याचे विभाग प्रमुखांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे.

सन २०१२-१३ या वर्षात अनुज्ञप्ती फी, दुकाने, कारखाने नोंदणी फी इत्यादी साठी मागणी नोंदवही ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे मागील थकबाकी, चालू मागणी व त्यापैकी वसुल झालेल्या रकमांच्या मागणी पुस्तकावरील नोंदीचा मेळ भरणा नोंदवही वरील एकूण वसुलीच्या रकमांशी मेळ घेता आलेला नाही. मागील वर्षाच्या मागणी पुस्तका वरील थकबाकीच्या रकमा बिनचुकपणे चालू वर्षाच्या मागणी नोंदवही मधे अग्रेषित केलेल्या आहेत. याचीही खात्री करता आलेली नाही.

**आक्षेप क्र. ५.२ :- परवाना शुल्कातील रक्कम वसुलीतील अनियमितता....**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे परवाना विभागाचे लेखापरिक्षण करतेवेळी अंदाजपत्रकीय येणे व प्रत्यक्ष जमा याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम लाखात)

| अ.क्र | लेखाशिर्ष | मागणी | वसुली | थकबाकी | वसुलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | कारखाने, दुकाने परवाने फी | १६०.०० | २२.९९ | १३७.०१ | 7.21 % |
| एकूण | | १६०.०० | २२.९९ | १३७.०१ | |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता कारखाने, दुकाने परवाने फी या लेखाशिर्षाखाली अपेक्षित अंदाजांपेक्षा अत्यंत कमी वसुली (७.२१%) झाल्याचे निदर्शनास येते. सन २०१२-१३ मधे परवाना विभागाकडील अधिकृत परवाना धारकांची संख्या ३७६३ होती. परवाना धारकांची संख्या पाहता वसुली कमी झाली असल्याचे निदर्शनास येते.

याबाबत अनुपालन अप्राप्त असल्याने रक्कम रू. १३७.०१/- लाख आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. ५.३ :- विना परवाना व्यवसाय/उद्योग कसुरदार आस्थापनांवरील कारवाई बाबत...**

मा. महासभा ठराव क्र.१५ दि.१९/०६/२००८ अन्वये परवाना शुल्कात सुधारणा करणे विलंब शुल्क लागु करणे व विना परवाना आस्थापनांवर कारवाई करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार विना परवाना व्यवसाय/उद्योग आस्थापनांवर, कसुरदार आस्थापनांवर खालील कारवाई करण्याचे निश्चित करण्यात आले.

१. आस्थापनांचा पाणीपुरवठा खंडीत करणे.
२. विद्युतपुरवठा खंडीत करण्यासाठी मे.रिलायन्स एनर्जी या विद्युत पुरवठा कंपनीस कळविणे.
३. आस्थापनेबाबत पोलीस स्टेशनला तक्रार नोंदविणे.
४. महानगरपालिके व्यतिरिक्त अन्य कार्यालय/विभाग यांचा परवाना असल्यास तो रद्द करण्याकरिता संबंधित कार्यालय/विभाग यांना कळविणे.

मा. महासभा ठरावास अनुसरुन परवाना विभागाने विना परवाना फी उद्योग/आस्थापना व कसुरदार आस्थापनांवर केलेल्या कारवाई तपशिल व त्यामुळे परवाना फी उत्पन्नात झालेली वाढ याचा तपशिल लेखापरिक्षाणस सादर केला नाही.

यावरुन असे आढळून येते की, प्रत्येक वर्षाची नुतनीकरण फी मुदतीत भरल्याचे दिसुन येत नसल्याने नुतनीकरण न केलेल्या परवाना धारकाकडून दंड रक्कम वसुल केल्याचे दिसुन येत नाही. दंड आकारणी बाबत संबंधित विभागाने प्रशासकीय मंजूरी घेऊन आवश्यक ती कार्यवाही करुन

परवानाचे नुतनीकरण वेळच्या वेळी होऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे होते. सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणात देखील सदर आक्षेप घेण्यात आला होता. सदर आक्षेपाचे विभागाने अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. ५.४ :- विभागीय कामकाजाबाबत...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३१३, ३७६ व ३८६ नुसार व्यवसायधारकांना परवाना फी आकारुन परवाना देण्यात येतो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३८६(१) अन्वये द्यावयाच्या परवान्यांवर स्वाक्षरीचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांचे आहेत. नवीन परवाना/नुतनीकरण परवाना अर्ज करणे, त्याकरिता परवाना फी स्विकारणे, नवीन/नुतनीकरण परवाना देणे याबाबी प्रभाग क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. अधिनियमातील तरतुदीनुसार प्रभाग क्षेत्रीय स्तरावर येणारी कार्यवाही व वसुलीबाबतचे आवश्यक अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. प्रभाग क्षेत्रीय स्तरावर कार्यपध्दतीत समानता व समन्वयाचा अभाव असल्याचे दिसुन येते. याचे परिणामस्वरुपतः महानगरपालिकेस परवाना शुल्कापोटी मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आलेले आहे.

**आक्षेप क्र. ५.५ :- साठा परवाना दंड वसुली न केलेबाबत.**

परवाना विभागाकडून विविध संस्थांना विविध मालाचा साठा करण्यासाठी एक वर्षाचे कालावधीसाठी परवाना दिला जातो. परवाना देताना परवान्याबाबत ठराविक फी आकारली जाते व परवान्याची मुदत संपल्यानंतर परवाना विभागाकडून आवश्यकतेनुसार कधीही परवाना नुतनीकरण करुन देण्यात येतो. उशीरा झालेल्या नुतनीकरण बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही.

वास्तविक परवान्याचे नुतनीकरण करण्यासाठी ठराविक कालावधीत परवान्याचे नुतनीकरण करुन घेणेबाबत परवाना धारकास बंधनकारक आहे.

**आक्षेप क्र. ५.६ :- नवीन परवान्यांबाबत...**

मिरा-भाईंदर शहराची मागील काही वर्षात औद्योगिक दृष्ट्या मोठ्या प्रमाणावर प्रगती झाल्याचे दिसून येते याच कालावधीत मोठमोठे मॉल, डिपार्टमेंटल स्टोअर्स शहरात उभी राहिली आहेत त्यांना अद्यापपर्यंत परवाने दिलेले नाहीत असे निदर्शनास आले. त्यामुळे दुकाने व कारखाने

परवाना धारकांची संख्या फार मोठया प्रमाणात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक संस्थाकर विभाग व मालमत्ता कर विभागाकडील वाणिज्य आस्थापनाची आकडेवाडी सुमारे अनुक्रमे २२९०४ व ४८००० इतकी आहे. त्यानुसार परवाना आस्थापनांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यामुळे संपूर्ण शहरातील अशा प्रकारच्या आस्थापानांचा सर्व्हे करुन परवानाधारकांकडून परवाना फी वसुल केल्यास उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी अनधिकृत परवाना धारक राहणार नाहीत.

# जाहिरात विभाग

## आक्षेप क्र. ६.१ :- थकबाकीबाबत.....

मार्च-२०१३ अखेर जाहिरात विभागाकडील मागणी, वसुली व थकबाकी खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम रुपयांत)

| अ.क्र | लेखाशिर्ष | मागणी | वसुली | थकबाकी |
|---|---|---|---|---|
| १. | **जाहिरात कर**<br>जाहिरात कर/इतर कर/कमानी | १,२९,०८,१३० | ९८,६३,१६९ | ३०,४४,९६१ |
| २. | **होर्डीग्ज**<br>(ठेका होर्डिग्ज/खाजगी होर्डीग्ज/कॅन्टीलिव्हर फी/किऑस्क/प्रदुषण व वातावरण नियंत्रक फलक) | २,१९,५३,३४१ | २,११,०५,६०० | ८,४७,७४१ |
| ३. | **पे ॲण्ड पार्क** | २१,५६,७१४ | २१,५६,७१४ | -- |
| | **एकुण** | **३,७०,१८,१८५** | **३,३१,२५,४८३** | **३८,९२,७०२** |

जाहिरात विभागाकडील सन २०१२-१३ मधील मागणी वसुली व थकबाकी तक्त्याचे अवलोकन केले असता निदर्शनास येते की, एकूण मागणी रु.३,७०,१८,१८५/- होती त्यापैकी रु.३,३१,२५,४८३/- रक्कमेची वसुली झालेली आहे व थकबाकी रु.३८,९२,७०२/- आहे. मार्च २०१३ अखेर असलेली रक्कम रु.३८,९२,७०२/- वसुल करण्याबाबत विभागाने काय कार्यवाही केली याचा तपशिल लेखापरिक्षणास सादर केलेला नाही.

तपशिल अप्राप्त असल्याने रक्कम रू. ३८,९२,७०२/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

## आक्षेप क्र. ६.१ :- विना परवाना बोर्ड/बॅनर बाबत केलेली कारवाई.

भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांतील राजकीय पक्षाचा कार्यक्रमांचे वाढदिवसाचे इतर बोर्ड/बॅनर्स परवानगी देण्याचे अधिकारी संबंधित प्रभाग अधिकारी यांना प्रदान करण्यात आले होते. मुदतबाहय व विनापरवानगी लावण्यात आलेले बोर्ड/बॅनर्स/कटआउट हे काढण्याचे काम सोपविले होते. संबधित प्रभाग अधिकारी यांची मुदतबाहय व विनापरवानगी काढलेले बोर्ड/बॅनर्स व अनधिकृत बॅनर बाबत केलेली कारवाई बाबत नोंदवही आढळून आलेली नाही. संबधित प्रभाग क्र.१, २, ३ व ४ प्रभाग अधिकारी यांनी खुलासा करण्यात यावा.

# अतिक्रमण विभाग

**आक्षेप क्र. ७.१ :- लेखापरिक्षणास अभिलेख व माहिती उपलब्ध करणेबाबत.....**

१. फेरीवाल्यांचे जप्त केलेल्या साहित्याबाबतची माहिती
२. दंड वसुली केल्याबाबतची व साहित्य लिलाव केले बाबातची माहिती.
३. अनधिकृत बांधकाम नियंत्रणाच्या प्रभाग निहाय नोंदवह्या व अभिलेख
४. निष्कासित केलेल्या प्रकरणांचा खर्च
५. मागणी देयकाचा तपशिल
६. नोटीस नोंद वही
७. निष्कासीत साठी वापरलेली मशिनरी व मनुष्यबळ ईत्यादी यंत्रणा यांचा कालवधी / दर
८. MRTP कायद्यानुसार गुन्हे नोंद वही
९. बीट नोंदवह्या
१०. कारवाई नोंद वही
११. निष्कासित खर्च व वसुली नोंदवही

उपरोक्त अभिलेख व माहिती अतिक्रमण विभागाने लेखापरिक्षणा करिता उपलब्ध करुन दिलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. ७.२ :- अनधिकृत बांधकामे पाडल्यावर झालेला खर्च...**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५७ नुसार अनधिकृत बांधकामे काढून टाकण्याच्या प्रयोजनार्थ या अधिनियमातील कलम ५३,५४,५५ व ५६ नुसार केलेल्या खर्चाची रक्कम कसूर करणाऱ्या इसमाकडुन किंवा भुमिखंडाच्या मालकाकडुन वसुल करण्याची तरतुद आहे.

मार्च-२०१३ अखेर अनधिकृत बांधकाम विभागाने दिलेल्या नोटिसी, केलेली कार्यवाही, न्यायप्रविष्ट प्रकरणे व वसुलीबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**२०१२-१३ या वित्तिय वर्षात अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी महानगरपालिकेस आलेल्या खर्चाचा तपशिल**

**(रक्कम रुपयात)**

| आर्थिक वर्ष | बांधकामे तोडण्यासाठी झालेला खर्च | खर्च वसुल तपशिल | थकबाकी |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ५,२४,४२७/- | ५२,५५३/- | ४,७१,८७४/- |

अतिक्रमण विभागाने अनाधिकृत बांधकामे तोडण्यासाठी झालेल्या एकूण खर्च रु. ५,२४,४२७/- पैकी रु. ५२,५५३/- ची वसुली केली असुन रु. ४,७१,८७४/- वसुल करणे बाकी आहे. तसेच सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील वसुलीतील थकबाकीबाबत अभिलेख लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेले नाहीत. विभागाने प्रलंबीत खर्च वसुलीचा ताळमेळ घेवुन रक्कम वसुल करण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

विभागाचे अनुपालन अप्राप्त असल्याने रक्कम रू. ४,७१,८७४/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. ७.३ :- खर्च वसुलीबाबत...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६० (२) व २६४ (४) अन्वये नियमांच्या किंवा उपविधींच्या विरुद्ध सुरु असलेली/केलेली/ मोडकळीस आलेली/पडण्याचा संभव असलेली बांधकामे तोडण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा तोडण्यात आलेल्या बांधकामाचा खर्च बांधकामाचे मालक किंवा भोगवटादार यांचे कडुन वसुल करता येईल अशी तरतुद आहे.

उक्त तरतुदी नुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत/ अतिक्रमण/ मोडकळीस आलेली बांधकाम हटविणेची कार्यवाही करताना याकामी खर्च संबधितांकडुन मा. महासभेच्या ठरावानुसार ठरवुन दिलेल्या दराने वसुल केला किंवा कसे याबाबतची तपासणी करणेसाठी अभिलेख उपलब्ध करुन देणेत आलेले नाही. त्यामुळे निष्कासीत केलेल्या बांधकामाच्या वसुलीचा खर्च अधिनियमातील तरतुदीनुसार सदर विभागाने वसुली केलेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे अशी लेखापरिक्षणाची धारणा आहे.

**आक्षेप क्र. ७.४ :- विभागीय कामकाजाबाबत....**

अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील विभाग प्रमुख त्यांचे अधिनिष्ट प्रभाग अधिकारी, कनिष्ठ अभियंते व कर्मचारी यांच्या नेमणुका सतत एकाच विभागात होत असुन सदर विभागात एकसुत्रता नसल्याकारणामुळे व विभाग प्रमुखाचे दैनंदिन कामकाजावर नियंत्रण नसल्यामुळे अनधिकृत/अतिक्रमण बांधकाम तोडण्याचे खर्च वसुल करता आलेले नाहीत. सदर बाब गंभीर स्वरुपाची असुन याबाबतचे गांर्भीय लक्षात घेऊन कायदेशीर तरतुदी व सक्षम प्राधिकरण्याचे नियमाची तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. ७.५ :- जप्त साहित्याबाबत....**

विभागाने जप्त केलेल्या सामानाच्या साहित्याची नोंद व वसुल झालेला रक्कमेचा रोखपालाकडे भरणा करणेपुर्वी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. ७८(३) ७९ नुसार भरणा नोंदवही ठेवणे व नोंदी घेणे आवश्यक असते. परंतु सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात विभागाने कोणतेही लेखे ठेवलेले नाहीत.

त्यामुळे अतिक्रमण जप्ती व दंड वसुली व वसुल झालेल्या रक्कमेची रोखपालाकडे भरणा झाला आहे किंवा नाही हे तपासता आलेले नाही. उक्त नियमाप्रमाणे विभागाने कार्यवाही का केली नाही. याबाबत विभागाचा खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. ७.६ :- जप्त मालमत्ता सोडवतांना....**

अतिक्रमण विभागाचे सन २०१२-१३ चे लेखापरिक्षणाअंती पावती पुस्तकावरुन भरणा नोंदवही तपासताना भरणा नोंदवहीवरील नोंदीप्रमाणे बऱ्याच बांधकाम धारकाकडुन विक्रेत्याकडुन डिमॉलिशन किंवा रिमूव्हल चार्जेसची वसुली करण्यात आलेले विविध प्रकाराचे साहित्य हातगाडी इ.ची सोडवणूक करताना वसुल केलेली रक्कम सक्षम प्राधिकरणाने मंजूर केलेल्या दराप्रमाणे वसुल करण्यात आलेली आहे किंवा कसे व जप्त केलेल्या मालाची सोडवणूक करणेपुर्वी त्यात सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतली आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करणेसाठी कोणतेही दप्तर उपलब्ध न झाल्याने या विभागाने पत्रान्वये अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. तथापी या संदर्भात कोणतेही अभिलेख सन २०११२-१३ या वर्षीचे उपलब्ध करुन देण्यात आलेले

नाही. वास्तविक जप्त केलेल्या साहित्याचे वर्णन वजन परिमाण इत्यादि बाबतच्या तपशिलाचे अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. मा. महासभेस ठरावान्वये निश्चित केलेल्या दराप्रमाणे वसुली करावयाची आहे. या संदर्भात मा. महासभेच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाहीसाठी ठेवावयाचे दप्तर व ठेवलेले दप्तर तसेच लेखापरिक्षणास उपलब्ध होत नसलेले दप्तर या बाबत विभाग प्रमुख अतिक्रमण यांना लेखीपत्रान्वये कळविण्यात येवून देखील दप्तर उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

तरी या बाबीचे गांभिर्य लक्षात घेऊन याबाबत कायदेशीर तरतुदी व सक्षम प्राधिकरणाचे निर्णयाची तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

१. विविध चार्जेस-मंजुर दराप्रमाणे वसुली?
२. जप्त मालमत्ता सोडवतांना सक्षम प्राधिकारी मान्यता? तपशील.
३. जप्त साहित्याचे वजन व परिमाण यांचा तपशिल.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. ७.७ :- जंगम मालमत्ताबाबत...**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र. १४४ (१) अन्वये नमुना क्र. १४४ प्रमाणे विहीत नमुन्यात प्रत्येक विभागाने जंगम मालमत्ता नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अतिक्रमण विभागाने प्रभाग क्र. १,२,३ व ४ च्या प्रभागामधे उक्त नियमाप्रमाणे जंगम मालमत्ता नोंदवहया ठेवण्यात आलेल्या नाहीत.

**आक्षेप क्र. ७.८ :- अनाधिकृत बांधकामांना आळा घालण्याबाबत....**

शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्र. ठामपा/२००८/प्र.क्र.५/२००८ नवि२-३/दि. २८ जानेवारी २००८ अन्वये ठाणे जिल्हयातील सर्व महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामांना आळा घालणेसाठी उपाययोजना निश्चित करण्यात आली आहे. सदर उपायोजनेस अनुसरुन विभागाकडील खालील अभिलेख सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणाकरिता मागविण्यात आले.

१. प्रभाग क्षेत्रात नव्याने आढळुन आलेली अनधिकृत बांधकामे व ती निष्कासीत केल्याबाबतचा दैनंदिन अहवाल.
२. प्रभाग क्षेत्रांत अनधिकृत बांधकामा संदर्भातील तक्रारीसाठी ठेवण्यांत आलेली नोंदवही.

३. प्रभाग कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकामे होत असल्याबाबत/वा नसल्याबाबत दरमहा मा. आयुक्त सो यांना सादर केलेले प्रमाणपत्र.

४. प्रभाग क्षेत्रांत सर्व जुनी व नविन बांधकामे निष्कासीत करणेसाठी धडक मोहिम हाती घेतली असल्यास अशा मोहिमेत केलेल्या कार्यवाहीचा तपशील.

या सर्व बाबी विभागाने लेखापरिक्षणास सादर केलेल्या नाहीत.

अनधिकृत बांधकामाना आळा घालण्याचे अनुषंगाने उक्त अभिलेख अद्यावत असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर अभिलेख विभागाने अद्यावत ठेवले नसल्यास सदर बाब गंभीर आहे.

# बांधकाम विभाग

**आक्षेप क्र ८.१:- खर्चाचे अंदाज व अखर्चित रक्कमांबाबत....**

मार्च-२०१३ अखेर बांधकाम विभागाकडील अखर्चित रक्कमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम लाखात)

| अ.क्र | बाब | तरतुद | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १. | नवीन रस्ते बांधकाम | १०५०.०० | ७४७.३७ | ३०२.६३ |
| २. | नवीन गटारे/नाले बांधकाम | १२००.०० | १०३१.३६ | १६८.६४ |
| ३. | भुयारी मार्ग/कलव्हर्ट बांधकाम | १५०.०० | ११३.१८ | ३६.८२ |
| ४. | धोबीघाट बांधणे | ३५.०० | - | ३५.०० |
| ५. | शाळा इमारत बांधणी/शाळा पुर्नबांधणी | १४२.०० | ७४.०२ | ९७.९८ |
| ६. | तांत्रिक सल्लागार फी | २५.०० | २४.४८ | ०.५२ |
| | **एकुण** | **२६०२.००** | **१९९०.४१** | **६११.५९** |

बांधकाम विभागाकडील वरील भिन्न लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या एकूण तरतुद रु. २६०२.०० लाखापैकी रु. १९९०.४१ लाख खर्च करण्यात आली व उर्वरीत रु. ६११.५९ लाख शिल्लक रक्कम खर्च न झाल्याने व्यपगत झाली.

विभागाने आर्थिक वर्षाअखेर होणाऱ्या संभावित खर्चाचे अंदाज अचुक बांधणे आवश्यक होते. सदर रक्कम वर्षाअखेर अखर्चित राहणार असल्याचा अंदाज घेतला असता तर पुनर्विनियोजनाद्वारे किंवा सुधारित अंदाजपत्रकात ही शिल्लक तरतुद तातडीच्या व महत्त्वाच्या विकास कामांकडे वर्ग करणे शक्य झाले असते. अचुक अंदाजा अभावी रक्कम अखर्चित राहिली असल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले आहे. सबब खर्चाचे अचुक अंदाज बांधण्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

**आक्षेप क्र. ८.२ :- अभिलेख सादर न करण्याबाबत......**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात रस्ते देखभाल दुरूस्ती, इंडस्ट्रीयल रस्ते / गटारे सुधारणा, तलाव / विहिरी दुरूस्तीबाबत, गटारे दुरूस्ती / झाकणे बसविणे, प्रभाग समिती निधी, आमदार / खासदार निधीबाबत करण्यात आलेली तरतुद व खर्च खालीलप्रमाणे आहे.

**(रक्कम लाखात)**

| **बाब** | **तरतुद** | **खर्च** | **शिल्लक** |
|---|---|---|---|
| रस्ते देखभाल दुरूस्ती | १७७५ | १७५८.१२ | १२.८८ |
| इंडस्ट्रीयल रस्ते / गटारे सुधारणा | २२० | १६०.७८ | ५९.२२ |
| तलाव / विहिरी दुरूस्तीबाबत | ६ | - | ६ |
| गटारे दुरूस्ती / झाकणे बसविणे | २५० | २४३.५९ | ६.४१ |
| प्रभाग समिती निधी | १३८५ | ६२९.८४ | ७५५.१६ |
| आमदार / खासदार निधीबाबत | ४०३६ | २८९.६५ | ३७४६.३५ |

वरील बाबींकरिता करण्यात आलेली तरतुदीच्या खर्चाबाबत लेखापरिक्षणास मोजमाप पुस्तके, मालमत्ता नोंदवह्या, ज्या प्रभागामध्ये किंवा इंडस्ट्रीयल भागामध्ये खर्च करण्यात आली त्याचा तपशिल, विहिरी / तलाव दुरूस्तीचा तपशिल, गटारे दुरूस्ती व झाकणांचा तपशिल, सदर कामे या अगोदर कधी करण्यात आली होती? कामांची शास्वती (Defect Liability Period) किती वर्षाची? व त्याबाबतचे करारनामे असे अभिलेख लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाहीत. त्यामुळे सदर खर्चाच्या फलनिष्पत्तीबाबत लेखापरिक्षण करता आले नाही.

**आक्षेप क्र. ८.८ :- स्वामित्व धनाचा (Royalty) भरणा शासन करणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील बांधकाम विभागामार्फत B.S.U.P. योजना, नवीन रस्ते बनविणे, नवीन गटारे बनविणे इ. यासारखे विविध विकास प्रकल्प राबविण्यात येतात. सदर प्रकल्पांच्या अंदाजपत्रकात गौण खनिजांच्या उत्खननाबाबत कंत्राटदाराने राज्य शासनास प्रदान करावयाच्या स्वामित्व धनाचा (Royalty) चा अंतर्भाव असतो. महसुल व वन विभागाकडील परिपत्रक क्र.गौणखनिज-१०/२००६/प्र.क्र.३७/ख (१) दि.१५/१२/२००६ अन्वये गौण खनिजांचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

सन २०१२-१३ मधे बांधकाम विभागामार्फत राबविण्यात योणाऱ्या विविध प्रकल्पांमध्ये गौण खनिजांच्या स्वामित्व धनापोटी कंत्राटदाराने शासनास भरणा करण्यात आलेल्या रकमांचा तपशिल व त्याचे पृष्ठ्यर्थ त्याने सादर केलेले अभिलेख यांचा तपशिल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही. गौण खनिजांच्या स्वामित्व धनापोटी कंत्राटदाराकडे शासनाचे लाखो रूपये थकल्याची लेखापरिक्षणाची धारणा आहे. सदर धारणा पक्की करण्यासाठी विभागाने आवश्यक अभिलेख व चलने लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. ८.९ :- रु. १० लाखावरील करारनाम्याबाबत...**

Bombay Stamp Act १९५८ मधील Article ६३ व ५४(ii) read with Article (b) of schedule नुसार रु. १० लाखापर्यंत करारनाम्याकरिता रु. १००/- व रु.१०,००,०००/- वरील प्रत्येक लाख रुपयापर्यंतच्या करारनाम्याकरिता प्रत्येकी १००/- या प्रमाणे जास्तीत जास्त ५ लाख रुपये मुद्रांक शुल्क आकारणी करणे क्रमप्राप्त आहे. महानगरपालिकेतील बांधकाम विभागमार्फत सन २०१२-१३ मधे कंत्राटदारांशी व पुरवठादाराशी करण्यात आलेले रू. १० लाखावरील करारनामे लेखापरिक्षणास सादर केले नाहीत. त्यामुळे मुद्रांक शुल्कापोटी कंत्राटदाराकडे गुंतलेल्या शासनाच्या रक्कमेबाबत निष्कर्ष काढता आले नाहीत.

सबब रू. १० लाखावरील करारनामे लेखापरिक्षणास सादर करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. ८.१० :- BSUP योजने अंतर्गत कंत्राटदारांना प्रदान करण्यात आलेला Mobolization Advance व त्यावरील व्याज वसुल करण्याबाबत अनियमितता....**

केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय पुनरूत्थान अभियाना अंतर्गत शहरी गरीबांना सुविधा पुरवणे (BSUP) या उपक्रमाद्वारे महानगरपालिकेतील जनतानगर व काशीचर्च या भागात झोपडपट्टी वासीयांकरिता घरे बांधावयाचे काम मंजुर करण्यात आले आहे.

सदर योजनेकरिता काढण्यात आलेल्या निविदेतील Volume 1 – General Requirements मधील Sr. No. – 4 Additional Instruction to bidders मधील Sr. No. – 56 मधील तरतुदी नुसार निविदेच्या मुल्याच्या ५% Mobolization Advance स्टेट बँक ऑफ इंडीयाचा व्याजदर +०.५% प्रती वर्ष या दराने निविदाधारकांना प्रदान करण्याबाबत व तो समान चार हफ्त्यांमध्ये प्रथम ते चतुर्थ चालू देयकांतुन (RA Bill) वसुल करण्याबाबत तरतुद आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने

महानगरपालिकेने BSUP योजनेतील कंत्राटदारांना वाटप करण्यात आलेल्या Mobolization Advance चा सद्यस्थितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | पॅकेज | निविदेची रक्कम | प्रदान करण्यात आलेला Mobolization Advance | वसुल करण्यात आलेला Mobolization Advance | Mobolization Advance ची थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे. शायनो टोस्कॅनो (जेव्ही) | J १ | १,०६,६३,३०,५३०/- | १,०६,००,०००/- | १,०६,००,०००/- + ५,००,०००/- (व्याज रक्कम) | |
| २. | मे. डीवीनिटी (जेव्ही) | J २ | ९३,३०,५६,१६२/- | ३,१७,००,०००/- | | ३,१७,००,०००/- |
| ३. | मे. श्रीजी बिटकॉन (जेव्ही) | J ३ | ९३,२८,३७,५६९/- | १,५०,००,०००/- | १,५०,००,०००/- + १०,००,०००/- (व्याज रक्कम) | |
| ४. | मे. डी.एस.के. (जेव्ही) | काशी चर्च | ३७,२४,२०,०९०/- | -- | -- | -- |
| | | | **३,३०,४६,४४,३५१/-** | **५,७३,००,०००/-** | **२,७१,००,०००/-** | **३,१७,००,०००/-** |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, J १ पॅकेजचे कंत्राटदार मे. शायनो टोस्कॅनो व J ३ पॅकेजचे कंत्राटदार मे. श्रीजी बिटकॉन यांचे देयकातुन Mobolization Advance व त्यावरील व्याजाची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही विभागाने केली आहे. परंतु, J २ पॅकेजचे कंत्राटदार मे. डीविनीटी यांच्याकडून रू. ३,१७,००,०००/- व त्यावरील व्याजाची वसुली लेखापरिक्षण समयी करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले. Mobolization Advance पोटी रू. ३,१७,००,०००/- महापालिकेची रक्कम कंत्राटदाराकडे गुंतलेली आहे. सदर बाब आर्थिक दृष्ट्या व नियमांच्या अनुषंगाने गंभीर आहे. सबब सदर रक्कम तात्काळ वसुल करणे आवश्यक आहे. सबब रू. ३,१७,००,०००/- व त्यावरील व्याज आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. ८.११ :- Mobolization Advance वरील व्याज माफ केल्याने झालेल्या वित्तहानीबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पूर्व) जेसलपार्क येथे सबवे बांधणेकरिता स्थायी समिती सभा दि. १४.१२.२०१० ठराव क्र. ८२ अन्वये मे. घई कंन्स्ट्रक्शन कं. यांना रू.४३,९२,००,०००/- रक्कमेची निविदा मुंजुर करण्यात आली. संबंधित कंत्राटदारास जा.क्र. मनपा/सा.बां./कार्या/०११/११-१२ दि.२५.०५.२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आला.

निविदेतील अटी व शर्ती नुसार कंत्राटदारास Mobolization Advance देण्याची तरतुद होती त्याप्रमाणे कंत्राटदारास Mobolization Advance पोटी रू. ४,३९,२०,०००/- रक्कम प्रदान करण्यात

आली. प्रचलीत नियमांनुसार सदर रक्कमेवर व्याज आकारणे बंधनकारक होते. परंतु, निविदा पुर्व बैठकीत (Pre-bid meeting) मध्ये सदर व्याज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. सव्याज Mobolization Advance न दिल्यामुळे साधारणतः रू.४५,००,०००/- महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याची लेखापरिक्षणाची धारणा आहे.

Mobolization Advance वरील व्याज माफ करण्याबाबत संबंधित विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे. सबब रू. ४५,००,०००/- रक्कम आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. ८.१२ :- वाल्मीकी योजना करारनाम्याबद्दल.**

वाल्मीकी योजनेकरिता कंत्राटदाराशी करण्यात आलेला करारनामा रू. १०० चे मुद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. Bombay Stamp Act १९५८ मधील Article ६३व५४(ii) read with Article (b) of schedule नुसार रु. १० लाखापर्यंत करारनाम्याकरिता रु. १००/- व रु.१०,००,०००/- वरील प्रत्येक लाख रुपयापर्यंतच्या करारनाम्याकरिता प्रत्येकी १००/- या प्रमाणे जास्तीत जास्त ५ लाख रुपये मुद्रांक शुल्क आकारणी करणे क्रमप्राप्त आहे. सदर काम रू. ६० लाखाचे झाले असल्याने रू.५०००/- चे शासनाचे मुद्रांक शुल्क बुडाले आहे. सदर रक्कम संबंधित कंत्राटदारांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

मुद्रांक शुल्कापोटी रककम वसुल होईपर्यंत रू. ५०००/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र. ८.१३ :- अनुदानांच्या विनियोग प्रमाणपत्रांबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस वेगवेगळया प्रकल्पांसाठी राज्य व केंद्रशासनाकडुन जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियान B.S.U.P, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान, दलित वस्ती अनुदान, निर्मल भारत अभियान अशा योजनांतर्गत अनुदान प्राप्त होत आहे. सदर अनुदान विहीत कालावधीत खर्च करणे व त्याची उपयोगिता/विनियोग प्रमाणपत्रे शासनास सादर करणे अभिप्रेत आहे. विनियोग प्रमाणपत्रा अभावी शासनाकडुन अनुदानाचे पुढील हफ्ते वितरीत होत नाहीत.

उपरोक्त विविध योजनांतर्गत महानगरपालिकेस प्राप्त अनुदानाच्या विनियोग प्रमाणपत्रांचा तपशिल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही त्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडील अनुदानांच्या विनियोगाबाबत निष्कर्ष काढता आले नाहीत.

**आक्षेप क्र. ८.१४ :- महानगरपालिका स्थावर / जंगम मालमत्तेबाबत..**

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम १५५ नुसार महापालिकेच्या स्थावर मालमत्तेच्या नोंदी (जमिन सोडून) नमुना नं.१२८ मधील नोंदवहीत होणे आवश्यक आहे. तसेच महापालिकेने इतर प्रकारात खरेदी केलेल्या किंवा शासनाकडुन हस्तांतरीत झालेल्या जमिनीबाबत नोंदी नमुना क्र.१२९ मध्ये घेणे आवश्यक आहे. तसेच नियम क्र. ४४४ प्रमाणे मालमत्ता नोंद नमुना नं.४४४ मध्ये ठेवणे आवश्यक आहे. अशा ठेवलेल्या नोंदी नियम क्र.१५६ प्रमाणे सक्षम अधिका-यांनी वर्षाअखेर तपासणी करुन वरिष्ठांना अहवाल सादर करणे आवश्यक आहे. सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणाकरिता स्थावर मालमत्ता नोंदवही उपलब्ध करण्यात आली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

**आक्षेप क्र. ८.१५ :- महानगरपालिकेची मालमत्ता भाडयाने देणेबाबत....**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम १२० अन्वये महानगरपालिकेची मालमत्ता भाडयाने देण्यासंबंधीचे नमुना क्र. ८९ प्रमाणे असलेले पुस्तक ठेवण्यात आले पाहिजे. मालमत्तेच्या भाडयाची रक्कम, त्यासह वस्तुंचा तपशील व कोणास भाडयाने दिली याच्या नोंदी व्यक्तीच्या अर्जावरुन व सक्षम अधिका-याने दिलेल्या आदेशावरुन नोंदण्यात याव्यात दिलेली वस्तु परत येताच, त्याचा दिनांक पुस्तकांत नोंदण्यात यावा. वर्षअखेर शुल्क / भाडयाची थकबाकी राहिल्यास ती पुढील वर्षात अग्रेषीत केली पाहिजे. परंतु विभागाने नमुना क्र.८९ प्रमाणे पुस्तक ठेवले आहे किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

**आक्षेप क्र. ८.१६ :- कामाच्या परिपूर्तीच्या अहवालाबाबत...**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र. १७६ अन्वये जेव्हा बांधकाम पूर्ण करण्यात येईल तेव्हा महानगरपालिका अभियंता यांनी नमुना क्र. १३२ प्रमाणे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रतिवृत / अहवालाची नोंद करणे आवश्यक आहे. तसेच नमुना क्र. १३३ मधे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. बांधकाम विभागाने नमुना क्र. १३२ प्रमाणे प्रतिवृत्त / अहवालाची नोंद व नमुना

क्र. १३३ प्रमाणे नोंदवही ठेवल्याबाबतचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिलेले नाहीत. तसेच जेव्हा अंदाजापेक्षा अधिक रक्कम खर्च झाली तेव्हा परिमाण दर व केलेल्या बांधकामावरचा खर्च व तसेच त्या संबंधातील अंदाज, यांची तुलना करुन सर्व तफावतीबाबत स्पष्टीकरण केलेले नाही.

**आक्षेप क्र. ८.१७ :- विकास आराखडा अंमलबजावणी खर्चाबाबत...**

सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पात विकास आराखडा अंमलबजावणी लेखाशिर्षाखाली करण्यात आलेली तरतुद व झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र | लेखाशिर्ष | तरतुद | खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १. | विकास आराखडा अंमलबजावणी | १०० | ३४.११ | ६५.८९ |
| २. | भाईंदर पुर्व/पश्चिम चौपाटी | ५.०० | १.७४ | ३.२६ |
| ३. | मुख्य कार्यालय फर्निचर/इमारत बांधकाम (नाटयगृह) | २५ | २१.१९ | ३.८१ |
| ४. | नगर भुमापन | १०० | १७.६९ | ८२.३१ |
| ५. | आरक्षित जागा विकसित करणे | १०० | २८.६६ | ७१.३४ |
| ६. | विकास आराखडा संगणकीकरण | २५ | ११.५८ | १३.४२ |
| ७. | कम्युनिटी सेंटर-४ | १७ | ३.७२ | १३.२८ |
| | **एकूण** | **३७२** | **११८.६९** | **२५३.३१** |

विकास आराखडा अंमलबजावणी करिता एकूण रु. ३७२ लाखाची तरतुद करण्यात आली होती यापैकी रु. ११८.६९ लाख खर्च करण्यात आले व रु. २५३.३१ लाख एवढा निधी अखर्चित राहिला. विकास आराखडा अंमलबजावणी करिता मंजुर करण्यात आलेल्या तरतुदीपैकी फक्त रु.३१.९१ % तरतुदीचा निनियोग करण्यात आला आहे. उर्वरित ६८.०९ % रक्कम खर्च न होण्या मागच्या कारणांचा खुलासा विभागामार्फत होणे आवश्यक आहे.

# जनसंपर्क विभाग

**आक्षेप क्र. ९.१ :- जाहिरात वितरणाबाबत...**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.पीयुबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दि.१ मे २००१अन्वये वृत्तपत्र व नियतकालिकांना देण्यात येणाऱ्या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातीच्या वितरणाबाबत धोरण निश्चित करण्यात आले आहे. तद्नंतर शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. जाहिरात २००९/प्र.क्र.१३७/का-३४ दि. ३१ ऑगस्ट २००९ अन्वये जाहिरात वितरण धोरणात सुधारणा करण्यात आल्या.

सदर धोरणास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या सर्व जाहिरातीचे वितरण.....

अ. शासनमान्य दराने

ब. चक्रीय पध्दतीने (रोटेशन)

क. समान चौ.से.मी.वाटपाच्या तत्वास अनुसरुन

ड. वर्गीकृत वर्तमानपत्रात करणे आवश्यक आहे.

जनसंपर्क विभागाकडील अभिलेखांचे लेखापरिक्षण केले असता उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार जाहिरातीचे वितरण होत नसल्याचे निदर्शनास आले. चक्रीय पध्दत, समान चौ.से.मी वाटपाचे तत्व, वर्गीकृत वर्तमानपत्रांच्या बाबतीत विभागाकडुन नियमांचे अनुपालन झालेले नाही.

सबब सदर विभागामार्फत जाहिरात वितरण धोरणात सुसुत्रता आणणे अत्यावश्यक आहे.

याबाबत जनसंपर्क विभागास धोरण निश्चित करून दिले आहे व तसेच सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणात गंभीर आक्षेप घेण्यात आले असतांना देखील याबाबत विभागाने कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. ९.२ :- जाहिरातींच्या मुल्य मर्यादांबाबत...**

शासन निर्णय क्र.जाहिरात २००९/प्र.क्र.१३७/का-३४ दि.३१ ऑगस्ट २००९ अन्वये शासन निर्णय क्र.पीयुबी १०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दि.१ मे २००१ चे जोडपत्र-अ मधील नियम क्र.५-इ मधे सुधारणा करण्यात आल्या त्यानुसार वृत्तपत्रनिहाय प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातींची मुल्य मर्यादा खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आली.

| अ.क्र | एका कामाचे मुल्य | जाहिरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र |
|---|---|---|
| १. | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये २० लाखापर्यंत आहे. अशी जाहिरात | एक ‘क’ वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| २. | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु.२० लाखापेक्षा जास्त व रु.५५ लाखापर्यंत आहे अशी जाहिरात | एक ‘ब ’ वर्ग दैनिक व साप्ताहिक |
| ३. | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु.५५ लाखापेक्षा जास्त आहे अशी जाहिरात | संबंधित विभागातील ‘अ’ वर्ग दैनिकास व त्या विभागातील ‘ब ’ व ज्या जिल्हाचे काम असेल त्या जिल्हातील एका ‘क’ वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी. चे प्रमाण लक्षात घेवुन वितरण करण्यात येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील जनसंपर्क विभागामार्फत जाहिरातींचे वितरण करतांना नियम क्र.५.इ मधे नमुद मुल्य मर्यांदांचे पालन होत नसल्याचे लेखापरिक्षाणाच्या निदर्शनास आले.

जनसंपर्क विभागामार्फत वृत्तपत्रनिहाय प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीच्या मुल्य मर्यांदांचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे.

सदर बाब वारंवार विभागाच्या निदर्शनास आणून देखील शासन धोरणाचे जनसंपर्क विभागामार्फत अनुपालन होत नाही.

**आक्षेप क्र. ९.३ :- विभागीय कामकाजाबाबत....**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत जनसंपर्क विभाग महत्वाचा विभाग आहे सदर विभागात जनसंपर्क अधिकारी व कर्मचारी वर्ग हे अनुक्रमे पात्रताधारक व पुरेसे उपलब्ध नसल्याने विभागातील कामकाज नियमित होत नाही.

विभागात ठेवण्यात आलेले अभिलेख विशेषतः आवक-जावक नोंदवही, तरतुद नोंदवही इ. अद्यायावत ठेवण्यात येत नाहीत. तसेच नोंदी वेळोवेळी घेण्यात आलेल्या नाहीत. वृत्तपत्रांच्या जाहिरात देयकांचे प्रदान करातांना दुबार प्रदान न होण्याबाबत विभागाने उपाययोजना आखल्याचे निदर्शनास आले नाही याकरिता दुबार देयक नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

जनसंपर्क विभाग अधिकाधिक कार्यक्षम करण्याकरिता उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. ९.४ :- वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीची माहिती लेखापरिक्षणास मिळणेबाबत.**

सन २०१२-१३ या वर्षाची अंतर्गत लेखापरिक्षण करिता जनसंपर्क विभागाकडील पॅनलवरील दैनिके व साप्ताहिकामध्ये वितरीत करण्यात आलेल्या जाहिरातीची माहिती खालील प्रपत्रामध्ये सादर करणेबाबत कळविण्यांत आले होते.

प्रपत्र

| अ.क्र. | वर्तमान पत्राचे नाव | सन २०१२-१३ मधे दिलेल्या जाहिरातींची संख्या | शासनमान्य दर | आकारमान | प्रदान केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|

जनसंपर्क विभागाकडून जाहिराती बाबतची माहिती वरील प्रपत्रात अद्यापपर्यंत लेखापरिक्षणास सादर केलेली नाही. सदर माहिती अभावी शासनमान्य समान चौ. सेमी./कॉ. सेमी. धोरणानुसार जाहिरातीच्या करावयाच्या वितरणाबाबत लेखापरिक्षण करता आले नाही.

विभागाने वरील प्रपत्रात लेखापरिक्षणास माहिती सादर करणे आवश्यक आहे.

# अंध व अपंग कल्याण विभाग

**आक्षेप क्र. १०.१ :- अंध व अपंग योजने अंतर्गत उपाय योजनांवरील तरतुद व खर्च...**

अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार अपंगाच्या सोयी, सुविधा व विविध योजनांकरिता ३% वार्षिक तरतुद अर्थसंकल्पात करणे आवश्यक आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात अंध व अपंग कल्याण योजनेकरिता केलेल्या तरतुदीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**सन २०१२-१३**

**(रक्कम लाखात)**

| अ.क्र | लेखाशिर्ष | मंजुर अनुदान | झालेला खर्च | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| १. | अंध व अपंग यांच्या उपाय योजनेकरिता खर्च | ७६.०० | ८.२१ | ६७.७९ |
| २. | अंध व अपंग साहित्य पुरवठा खरेदी | २०.०० | -- | २०.०० |
| | **एकुण** | **९६.००** | **८.२१** | **८७.७९** |

शासकीय धोरणास अनुसरुन अपंग कल्याणासाठी योजनांकरीता जो ३% निधी अर्थसंकल्पात राखून ठेवण्यात आला होता तो निधी त्या त्या अर्थसंकल्पीय वर्षात खर्च होणे अपेक्षित होते परंतु मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात राखून ठेवलेल्या निधीचा पूर्णतः विनीयोग केल्याचे दिसुन येत नाही. असा निधी शासकीय धोरणास अनुसरुन महानगरपालिकेने स्विकृत केलेल्या अंध व अपंग कल्याण धोरणातील व शासनाकडील इतर योजनांवर खर्च होणे अभिप्रेत आहे.

# नगररचना विभाग

**आक्षेप क्र. ११.१ :- लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध करून देणेबाबत....**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील नगररचना विभागाने लेखापरिक्षणास तपासणी करिता खालील अभिलेख उपलब्ध करून दिलेले नाहीत.

१. बीओटी तत्त्वावर असलेल्या जागा व त्याची यादी.
२. किती आरक्षित जागा भाडे तत्त्वावर दिलेल्या आहेत याचा तपशिल.
३. सन २०१२-१३ ह्या वित्तीय वर्षात नगररचना विभागामार्फत मनपा क्षेत्रातील किती इमारतीना भोगवटा दाखला देणेत आलेला आहे त्याचा तपशिल.
४. सन २०१२-१३ हया वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार विकास आकार, बाल्कनी बंदिस्त फी, दंडनिय शुल्क व इतर वसुली/खर्चाचे विवरणपत्र व मूळ संचिका.
५. सन २०१२-१३ हया वित्तीय वर्षात टी.डी.आर ने भरणा केलेली रक्कम व त्याची यादीसह मूळ संचिका.
६. मनपाने शहराच्या आरक्षित जगांचा कंटुर सर्व्हे केला आहे काय याचा तपशिल.
७. जंगम मालमत्ता नोंदवही (नमुना नं.११४)
८. मुद्रांक नोंदवही / टपाल नोंदवही.

उपरोक्त अभिलेख व माहिती नगररचना विभागाने लेखापरिक्षणा करिता उपलब्ध करुन दिलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. ११.२ :- माहिती व अभिलेख उपलब्ध न करण्याबाबत...**

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणाकरिता नगररचना विभागाकडे खालील बाबींची माहिती मागविण्यात आली होती.

१. मंजुर केलेले टि.डी.आर. चे कागदपत्रानुसार असलेले संपूर्ण क्षेत्र व प्रत्यक्षात जागेवर असलेले क्षेत्र.
२. टि.डी.आर. मंजुर केलेली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात मिळाली असल्याचे अभिलेख.
३. मुळ जागा मालकासोबत झालेला नोंदणीकृत करारनामा.
४. कुळमुख़त्यार धारक यांचे मार्फत टि.डी.आर. दिला असल्यास कुळ मुख्त्यार व मुळ जागा मालकासोबत झालेला नोंदणीकृत करारनामा. तसेच महापालिका व कुळमुख्त्यार सोबत नोंदणीकृत झालेला करारनामा.
५. टि.डी.आर. मंजुर झालेल्या जागेवर संरक्षण भिंत माती भराव व अनधिकृत असलेल्या बांधकामाबाबतची माहिती.
६. सात बारा वर बोजा कमी केल्याची प्रत.

वरील माहिती संकलीत स्वरूपात लेखापरिक्षणास सादर केल्याने त्याबाबत निष्कर्ष काढता आले नाहीत.

उपरोक्त अभिलेख व माहिती नगररचना विभागाने लेखापरिक्षणा करिता उपलब्ध करुन दिलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. ११.३ :- विकास आराखडयाची अंमलबजावणी आरक्षित जागा संपादनाबाबत...**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार विकास आराखडयातील आरक्षित जागांचे संपादक करण्याचे दायित्व महानगरपालिकेचे आहे. विकास योजनेतील आरक्षित जागांचे भुसंपादन करुन आरक्षणांचा विकास करणे महत्त्वाची बाब आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखडयात विविध प्रयोजनांसाठी विकसीत करावयाच्या ३८६ जागा (क्षेत्रफळ ५२६.६३ हेक्टर) समाविष्ट आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र** | **प्रकार** | **जागांची संख्या** | **क्षेत्रफळ (हेक्टरमधे)** |
|---|---|---|---|
| १. | शासकीय निमशासकीय | २८ | २०१.३३ |
| २. | खाजगी जागा | ३५८ | ३२५.३० |
| | **एकुण** | **३८६** | **५२६.६३** |

मंजूर विकास योजनेनुसार एकूण आरक्षणांची संख्या ३८६ याप्रमाणे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये एकूण १९ महसूली गावांचा समावेश आहे. सदर पैकी मौजे उत्तन, तारोडी, पाली, चौक, डोंगरी या पाच गावांकरिता सन २००७ पासून "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून मुंबई महानगर प्रवेश विकास प्राधिकरण (M.M.R.D.A) यांची नियुक्ती झालेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम १२७ मधील तरतुदीनुसार १० वर्षाच्या कालावधीत विहीत कार्यपध्दतीने जमीन संपादित न केल्यास आरक्षण व्यपगत होवु शकते. याकरिता शासनाने शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. टिपीबी-४३०५/१९०५/नवि-११ दि. ४ मे २००६ अन्वये नियोजन प्राधिकरणांना भुसंपदनाकरिता अर्थसंकल्पात खर्च करावयाच्या रक्कमेच्या किमान २०% अथवा विकास योजनेच्या अंमलबजावणी कार्यक्रमाप्रमाणे जागा संपादनाकरिता आवश्यक रक्कमेची तरतुद करण्याबाबत निर्देश दिले आहेत. पंरतु सन २०१२-१३ मधे जमीन संपादनाकरिता महानगरपालिका अर्थसंकल्पात केवळ रु.१०० लाख तरतुद करण्यात आली होती जी सन २०१२-१३ अखेर ३४.११ इतका खर्च झाला. सदर खर्चाबाबत विभागाने लेखापरिक्षणास तपासणी करीता अभिलेख सादर केला नाही.

**आक्षेप क्र. ११.४ :- भोगवटा दाखला - अनामत रक्कमेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर विकास योजनेतील विकास प्रस्तावांना मिरा भाईंदर शहरासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार परवानगी देण्यात येते. बांधकाम परवानगीमधील सर्व अटींची पूर्तता केल्यानंतर व इमारत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार

बांधकाम केलेले असेल तर, त्यास भोगवटा दाखला देण्यात येतो. परंतू बांधकाम परवानगी मधील अटींची पूर्तता विकासक करत नाहीत.

त्यामुळे अटीची पूर्तता केलेली नसल्यामुळे भोगवटा दाखला देता येत नाही. व जागेवरील इमारत विनापरवानगी रहिवाशी व्याप्त करीत असतात. कर विभागाकडून भोगवटा दाखला घेतलेला नसल्यामुळे इमारतीस कर व शास्तीची रक्कम रहिवाश्यांकडून वसूल करण्यात येते. त्यामुळे त्याचा आर्थिक भुर्दंड स्थानिक नागरिकांना सोसावा लागत असल्यामुळे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील आदेश जा.क्र./मनपा/नर/३४/२०११-१२ दि.०७/०४/२०११ अन्वये मिरा भाईंदर शहरातील विकासकांस बांधकाम परवागनी देतेवेळी विकासकांकडून कर विभागाकडून आकारण्यात येणारी वार्षिक कराची रक्कम रु.२१०/- प्रति.चौ.मी. प्रति तीन वर्षासाठी अनामत रक्कम म्हणून जमा करुन घ्यावी. विकासकाने इमारतीचे बांधकामास मंजूर नकाशाप्रमाणे केलेले असेल व बांधकाम परवानगी मधील सर्व अटींची पुर्तता करुन भोगवटा दाखला घेतल्यानंतर सदरची जमा केलेली मुळ अनामत रक्कम विकासकास परत करावी. अन्यथा भोगवटा दाखला न घेता रहिवास वापर चालू केल्यास सदरची अनामत रक्कम कराच्या स्वरुपात मिरा भाईंदर महानगरपालिकेत जमा करुन घ्यावी. सदरची रक्कम ही लेखाविभागाने स्वतंत्रपणे खाते निर्माण करुन स्वतंत्र रक्कम जमा करुन घ्यावी. जमा रक्कमेचा तपशील नगररचना व लेखा विभागाने स्वंतत्र नोंदवहीद्वारे वेळोवेळी अद्यावत करुन ठेवण्यात यावी असे निश्चित करण्यात आले.

सन २०१२-१३ अखेर आकारण्यात आलेल्या सुरक्षा अनामत रक्कमांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(रक्कम रूपयात)

| **वर्ष** | **प्राप्त रक्कम** |
|---|---|
| २०१२-१३ | ३,८९,९३,७४३/- |

उपरोक्त आदेशास अनुसरुन सन २०१२-१३ अखेर विकासकाकडुन जमा झालेल्या अनामत रक्कमेचा तपशिल विभागाने उपलब्ध करून दिला, परंतू खाते नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. सबब विभागाने खाते नोंदवही विहित नमुन्यात ठेवलेली आहे किंवा कसे ते स्पष्ट होत नाही.

**आक्षेप क्र. ११.५ :- दंडनीय शुल्काबाबत...**

विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर भोगवटा दाखला घेणे आवश्यक असून भोगवटा दाखल्याशिवाय इमारतीत वास्तव्य करता येत नाही. बरेचसे विकास/वास्तुविशारद भोगवटा दाखला घेत नाहीत व दाखल्यापुर्वीच इमारती रहिवास व्याप्त करतात. अश बाबतीत स्थायी समिती सभा ठराव क्रमांक २२३ दि.०१/०३/२००६ नुसार आर्थिक दंड म्हणून विकास आकाराप्रमाणे रहिवास वापर रु.६०/-, वाणिज्य वापर रु.१२०/- व औद्योगिक वापर रु.९०/- प्रति चौ.दराप्रमाणे दंडाची रक्कम वसुल करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

तद्नंतर मंजुर विकास योजना व विकास नियंत्रण नियमावलीच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध वापराकरिता मंजुरी देण्यात आलेल्या इमारतीच्या बांधकामामध्ये विनापरवानगी केलेले वाढीव बांधकाम तसेच अनधिकृत बांधकाम नियमाकुल करणेच्या दृष्टीने लावण्यात येणाऱ्या दंडनिय शुल्काबाबत यापूर्वी कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आयुक्त/४०५९/ २०११-१२ दि.२१/०३/२०१२ व कार्यालयीन आदेश क्र. मनपा/आयुक्त/४१०५/२०११-१२, दि.२८/०३/२०१२ अन्वये आदेश निर्गमित करणेत आलेले आहेत. तथापी सदर आदेशांमध्ये वाढीव बांधकामे, अनधिकृत तथा विनापरवानगी बांधकामे व त्यांस लागू करणेत आलेल्या दंडनिय शुल्काबाबत संभ्रम निर्माण होत असल्याने मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील आदेश जा.क्र. मनपा/आयुक्त/नर/ १३६३/२०१२-१३ दि.१९/०६/२०१२ अन्वये दि.२१/०३/२०१२ पासुन पुर्वलक्षीप्रभावाने खालील तक्त्याप्रमाणे दंडनीय शुल्क आकारणी करण्याचे निश्चित करण्यात आले.

| अ. क्र. | बांधकामाचे स्वरूप | दंडनिय शुल्काची रक्कम प्रती चौ.मी. | | |
|---|---|---|---|---|
| | | रहिवास वापर | वाणिज्य वापर | औद्योगिक वापर |
| १. | बांधकाम नकाशे मंजुर आहेत. बांधकाम प्रारंभपत्र आहे. तथापी जोत्याचे प्रमाणपत्र न घेता बांधकाम केले आहे. | रू. २००/- | रू. ४००/- | रू. ६००/- |
| २. | बांधकाम नकाशे मंजुर आहेत. बांधकाम प्रारंभपत्र आहे. जोत्याचे प्रमाणपत्र घेतले आहे. भोगवटा दाखला / वापर परवाना न घेता ईमारतीचा वापर केला आहे. | रू. २००/- | रू. ४००/- | रू. ६००/- |
| ३. | बांधकाम नकाशे मंजुर आहेत. तथापी बांधकाम प्रारंभपत्र न घेता मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम केलेले आहे. | रू. ६००/- | रू. १,२००/- | रू. ९००/- |
| ४. | बांधकाम नकाशे मंजुर आहेत. बांधकाम प्रारंभपत्र आहे. तथापी प्रथम परवानगी न घेता वाढीव बांधकाम केलेले | रू. ६००/- | रू. १,२००/- | रू. ९००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आहे. वाढीव बांधकाम अनुज्ञेय क्षेत्राच्या मर्यादेत असल्यास व नियमाकूल होत असल्यास | | | |
| ५. | बांधकाम नकाशे मंजुर नाहीत. प्रारंभपत्र नाही. तथापी नियमाकुल होवू शकणारे वाढीव बांधकाम अनुज्ञेय चटईक्षेत्राचे मर्यादेत असल्यास | रू. ६००/- | रू. १,२००/- | रू. ९००/- |
| ६. | मंजुर बांधकाम नकाशात वापरात बदल मंजुर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे अनुज्ञेय होत असल्यास | रू. ६००/- | रू. १,२००/- | रू. ९००/- |

भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या विकासकाकडून दंड रक्कम वसुली केल्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रक्कम रूपयात)

| वर्ष | प्राप्त रक्कम |
|---|---|
| सन २०१२-१३ | रू. ५८,७९,४११/- |

तथापि आयुक्तांकडील आदेशान्वये किती प्रकरणांमध्ये दंडनीय शुल्क आकारण्यात आले त्याचा सविस्तर तपशिल व त्याच्याशी सबंधीत नोंदवह्या लेखा परिक्षणास सादर केलेल्या नाहीत.

**आक्षेप क्र. ११.६ :- विकास निधी बाबत...**

महाराष्ट प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ जे अन्वये स्वतंत्र विकासनिधी स्थापन करण्याची व तो अर्थसंकल्पात स्वतंत्र दर्शविण्याची तरतुद आहे.

महानगरपालिकेस विकास आकार म्हणुन मिळालेले सर्व पैसे त्यावरील कोणतेही व्याज असेल तर व्याजासह विकासनिधी मधे जमा करावयाचे आहेत. विकासनिधी मधे जमा करण्यात आलेल्या निधीचा वापर केवळ महानगरपालिकेच्या अधिकारितेखालील क्षेत्रामधे सार्वजनिक सुविधा पुरविणे, क्षेत्राचे परिरक्षण व सुधारणा या प्रयोजनार्थ करणे आवश्यक आहे.

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणाकरिता विकास निधी स्थापनेचा व त्यातुन करण्यात आलेल्या खर्चाचा तपशिल उपलब्ध करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र. ११.७ :- जमीन सपाटीकरण व कुंपणभिंतीबाबत ....**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजुर विकास योजनेमधील विकास योजनेने बाधीत क्षेत्रासाठी विकास हक्क प्रमाणपत्र देतांना विषयांकित जागेमधे जमिन सपाटीपर्यंत भरणी करुन कुंपन भितींचे बांधकाम करण्याबाबत सन २००६ मधे निर्णय झाला. त्यास अनुसरुन सन २०१२-१३

या आर्थिक वर्षात जमीन सपाटीकरण व कुंपनभिंती बांधकाम शुल्कापोटी आकारण्यात आलेल्या रक्कमांबाबत तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध झालेला नाही.

**आक्षेप क्र. ११.८ :- सन २०१२-१३ मध्ये दिलेल्या भोगवटा दाखल्याच्या प्रकरणाबाबत....**

सन २०१२-१३ मध्ये नगररचना विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील किती इमारतींना बांधकाम प्रारंभपत्र देण्यात आलेले आहे. त्यापैकी किती इमारतींचे बांधकाम पुर्ण झालेले आहे. बांधकाम पूर्ण होउन किती ईमारतींना भोगवटा दाखला (वापर परवाना) देण्यात आला याबाबत विभागाने लेखापरिक्षणास अभिलेख तपासणी करिता उपलब्ध करून दिले नाहीत याबाबत अनुपालन अहवाल सादर करावा.

# अग्निशमन विभाग

**आक्षेप क्र. १२.१ :- अभिलेख उपलब्ध करणेबाबत...**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षणाकरिता अग्निशमन विभागातील खालील अभिलेख उपलब्ध झालेले नाही

१. वाहनांचा संपूर्ण तपशिल(दुरुस्त/नादुरुस्त) लॉक बुक नोंद रजिस्टर

२. कॅपिटेशन फी वसुली बाबतचा तपशिल (संपूर्ण नस्तीसह) नोंद रजिस्टर

३. अग्निशमन सेवा कर फी, सेवाकर भाडे, वसुली नोंद वही

४. नमुना क्र.१६६

५. नमुना क्र.१२७ (मोटार वाहकांचे लेखे)

६. निविदा नस्ती (सन २०१२-१३)

७. अग्निशमन परवाना फी, मार्गस्थ फी, (सुपूर्ण नस्तीसह) वसुली नोंद वही.

इत्यादी अभिलेख लेखापरिक्षण शाखेस उपलब्ध न झाल्यामुळे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे अग्निशमन विभागाचे लेखापरिक्षण करता आले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. १२.२ :- अग्निशमन दलाकडील विविध महसुली उत्पन्नाबाबत...**

मा.महासभा दि.१८/०२/२०११ ठराव क्र.११४ अन्वये अग्निशमन दलाकडील विविध महसुली उत्पन्नाची साधने जसे...

१. कॅपीटेशन फी

२. विविध दाखला फी

३. दाखला नुतनीकरण फी इ.

करिता सुधारित दराचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधे सुचविलेल्या दरात सुधारणांसह हा ठराव मंजुर

करण्यात आला. सदर ठरावान्वये विविध प्रकारच्या इमारतीवर त्यांच्या उंची व क्षेत्रफळानुसार आकारण्यात येणारे दर निश्चित करण्यात आले.

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणास सदर ठरावानुसार विविध प्रकारच्या इमारतींवर किती महसुल आकारण्यात आला याचा सविस्तर तपशिल उपलब्ध करण्यात आलेला नाही.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १२.३ :- आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपायायोजनाशी संबंधित नोटीस देणे....**

आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ कलम ५ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी जागेची किंवा इमारतीची किंवा तिच्या भागाची तपासणी पूर्ण केल्यानंतर, आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपायोजनांच्या संबंधातील आवश्यकतांना फाटा दिल्याबद्दल किंवा त्यांची पुर्तता न केल्याबद्दल अथवा इमारतीच्या उंचीच्या संदर्भात अथवा अशा जागेमध्ये किंवा इमारतीमध्ये किंवा तिच्या भागामध्ये पार पाडल्या जाणाऱ्या कामांच्या स्वरुपाच्या संदर्भात, त्या ठिकाणी पुरविण्यात आलेल्या किंवा पुरवावयाच्या अशा संरक्षक उपाययाजेनाची उपर्याप्तता किंवा त्या न पुरवल्याबाबतची आपली मते नोंदवील आणि अशा इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या मालकाला किंवा भोगवटादाराला एक नोटीस पाठवील, व नोटीशीमध्ये विहित करण्यात येईल अशा कालावधीत अशा उपाययोजना करण्यास त्यास निदेश देईल.

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणाकरिता इमारतीच्या मालकांना/भोगवटादारांना बजावलेल्या नोटीशींचा तपशिल सादर करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र. १२.४ :- नोटीशीची पालन न केल्यास त्याबाबतीत उपाययोजना करणे....**

आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ६ अन्वये पाठविलेल्या नोटिशीची पालन न केल्याच्या अपराधाबाबतच्या खटल्याला बाध न आणता, मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याला, अशा कोणत्याही नोटिशीचे पालन करण्यात आले नसेल त्या बाबतीत, त्या नोटिशाच्या अनुपालनासाठी कलम ८ अन्वये ती जागा, इमारत किंवा तिचा कोणताही भाग सीलबंद करण्यासहीत आवश्यक असतील अशा उपायोजना करता येतील. अशी तरतुद आहे.

कलम ८ अन्वये मुख्य अग्निशम अधिकारी यांनी केलेल्या उपाय योजनांचा तपशिल सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

**आक्षेक क्र. १२.५:- विशेष निधी स्थापन करणेबाबत...**

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम २५ अन्वये आग सुरक्षा निधी स्थापन करण्याबाबत व या अधिनियमान्वये बसवण्यात व गोळा करण्यात आलेली फी त्यामध्ये जमा करण्यात येईल. अशी तरतुद करण्यात आली आहे.

आग सुरक्षा निधी मधुन सर्वसाधारणः अग्निशामक पथकसेवा चालविण्यासाठी (ज्यात अग्निशमन अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि इतर आनुषंगिक खर्च यांचा समावेश असेल) आणि विशेषतः महानगरपालिकेच्या हद्दीतील अथवा हद्दी बाहेरील कोणत्याही जमिनीवर किंवा कोणत्याही इमारतीत आगीस प्रतिबंध करण्याच्या किंवा आग विझविण्याच्या प्रयोजनार्थ, अत्याधुनिक साधनसामग्री व उपकरणे पुरविण्यासाठी, या निधीतील रक्कम वापरण्यात येईल, वरील अधिनियमामध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणार नाही. अशी तरतुद आहे. अग्निशमन विभागाने आग सुरक्षा निधी स्थापन केल्याचा व त्यातील रक्कमांच्या विनियोगाचा तपशिल लेखापरिक्षणास उपलब्ध करून दिलेला नाही.

# आस्थापना विभाग

**आक्षेप क्र. १३.१ :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेबाबत....**

शासनपरिपत्रक क्र. सका/नि-२००७/प्र.क्र.१७६/२००७/नवि-६ मंत्रालय मुंबई दि.२२/१०/२००८ नुसार राज्यातील नगरपालिकेतील / महानगरपालिकेतील सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेवून ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवा निवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्याच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्याबाबत शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

सेवा निवृत्तीनंतर सफाई कामगारांना मालकी तत्वावर मोफत द्यावयाच्या सदनिका संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेतर्फे बांधून उपलब्ध करून देण्यासाठी तसेच सफाई कामगारासाठी सेवा निवासस्थाने बांधण्यासाठी ज्या नगरपालिका / महानगरपालिकेकडे भूखंड उपलब्ध नाही अशा नगरपालिका / महानगरपालिकांनी नागरी जमिन कमाल धारणा अधिनियमाअंतर्गत अतिरिक्त ठरलेली आणि शासनाच्या ताब्यात असलेली जमिन व इतर शासकिय जमीन महसूल व वन विभागाने प्राधान्याने नाममात्र किंमतीने उपलब्ध करुन द्यावी.

महानगरपालिका अर्थसंकल्पात दुर्बल घटक योजने अंतर्गत ५ % निधीतुन सेवानिवृत्तीनंतर सफाई कामगारांना मोफत द्यावयाच्या सदनिका बांधणेसाठी पुरेशी तरतुद करावी असे शासनाने निर्देश असून विभागाने कोणती कारवाई केली याबाबत अनुपालन अहवाल सादर करावा.

**आक्षेप क्र. १३.२ :- भविष्य निर्वाह निधी लेख्यांबाबत...**

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणाकरिता भविष्य निर्वाह निधी लेखे उपलब्ध न झाल्याने खालील बाबींबाबत निष्कर्ष काढता आले नाहीत...

१. भविष्य निर्वाह नोंदवही नमुना क्र.९८ नियम १३४ (३) व (५) नुसार अद्यायावत ठेवण्यात आली आहे काय?

२. भविष्य निर्वाह नोंदवहीत किती पृष्ठे आहेत याची नोंद घेण्यात आली आहे काय? व सदर नोंद खातेप्रमुखाने प्रमाणीत केली आहे काय?

३. भविष्य निर्वाह नोंदवहीतील नोंदी पुर्ण आहेत काय?

४. भविष्य निर्वाह निधी खातेदारोन भरलेली मुद्दल व त्यावरील व्याजाची परिगणना

५. बृहतपत्रकाचा ताळमेळ

६. सेवा निवृत्त झालेल्या खातेदारांची परिगणना व अंतीम प्रदान

७. आर्थिक वर्ष समाप्तीनंतर खातेप्रमुखाने नोंदवहीतील नोंदी तपासुन प्रमाणीत केल्या आहेत काय?

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची ‘ड’ प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. १३.३ :- सेवापुस्तक ठेवणे व त्याच्या दुय्यम प्रतीबाबत...**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियम ३६ अन्वये सेवा अभिलेख/ सेवापुस्तक (Service Book) अद्यायावत ठेवण्यात यावे व त्याची दुसरी प्रत कर्मचाऱ्यास द्यावी अशी तरतुद आहे.

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षण समयी महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे सेवा अभिलेख अद्यायावत नसल्याचे व सेवा पुस्तकाची दुसरी प्रत कर्मचाऱ्यास दिली नसल्याचे निदर्शनास आले. आस्थापना विभागाने सेवा पुस्तकातील नोंदी वेळीच घेतल्या नसुन त्या प्रमाणीत देखील केलेल्या नाहीत.

मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम ५२ खालील परिशिष्ट १७ नुसार सेवापुस्तक हे प्रदीर्घ कालावधीपर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सेवापुस्तकाची दुय्यम प्रत देणे मुळ सेवा पुस्तकातील नोंदी वेळीच करणे व त्यानुसार दुय्यम सेवापुस्तकातील नोंदी अद्यायावत करणे याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ चे नियम २५ ते ४९ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १३.४ :- सेवापुस्तकांच्या वार्षिक पडताळणीबाबत...**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ नियम ४५ अन्वये सेवापुस्तके व सेवापट यांची प्रत्येक कार्यालयात दरवर्षी मे महिन्यात कार्यालय प्रमुखाकडुन पडताळणी करण्यात यावी. सेवापुस्तक व सेवापट यांच्यातील नोंदी अचुक आहेत याबाबत कार्यालय प्रमुखाचे समाधान झाले तर असा अधिकारी **'गेल्या वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत सेवेची पडताळणी वेतन देयकांवरुन व अभिलेखांवरुन केली आहे'**, या आशयाचे प्रमाणपत्र स्वतःचे सहीने नोंदवेल अशी तरतुद आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत नियम ४५ अन्वये सेवापुस्तके व सेवापट यांची वार्षिक पडताळणी होत नसल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले आहे.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १३.५ :- नामनिर्देशन पत्रांबाबत..**

महानगरपालिका स्थायी कर्मचाऱ्यांकडुन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे कलम १५१(१) नुसार मृत्यु निसेवा उपदान नमुना क्र.१ मध्ये नामनिर्देशन पत्रे भरुन घेणे बाबत तरतुद आहे.

उक्त नियमातील तरतुदीनुसार आस्थापना विभागाने मनपा स्थायी कर्मचाऱ्यांकडून नामनिर्देशन पत्रे भरुन घेतलेली नाहीत. नामनिर्देशक पत्रे भरुन घेतलेली नसल्याने कर्मचाऱ्यांच्या अकस्मात मृत्यूप्रकरणी त्यांच्या पश्चात वारसांना देणी देतांना अडचणी उद्‌भवतात व वारसांना लाभ मिळण्यास उशीर होतो

सबब विभागप्रमुखांनी सर्व कर्मचाऱ्याकडून मृत्यू नि सेवा उपदान व भविष्य निर्वाह निधीची नामनिर्देशन पत्रे भरुन सेवा पुस्तकामध्ये चिकटविणेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. १३.६ :- नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबत...**

शासन निर्णय वित्त विभाग क्रं.अंनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१/१०/२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी "नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना" अंमलात आणली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेची अंमलबजावणी केलेली आहे. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो १००७/१८/सेवा-४ दि.७ जुलै २००७ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रं. ८ ते २३ पर्यंत दिलेल्या तरतुदीनुसार आस्थापना विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल लेखापरिणास उपलब्ध करण्यात आला नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. १३.७ :- विभागीय कामकाजाबाबत...**

सन २०१२-१३ ह्या वित्तीय वर्षातील लेखापरिक्षणाच्या अनुषंगाने आस्थापना विभागाकडे कर्मचाऱ्यांना कामकाजाबाबत खालील प्रमाणे माहिती मागविणेंत आलेली होती.

१. महानगरपालिकेमध्ये स्थायी /अस्थायी कर्मचारी किती आहेत? त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या वर्गवारीप्रमाणे विवरण.
२. महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागात किती कर्मचारी काम करतात?
३. आस्थापना विभागातील प्रत्येक लिपीक शासन निर्देशाप्रमाणे दररोज किती फाईलचा निपटारा करतात.
४. कोणत्या विभागात मंजुर पदापेक्षा किती कर्मचारी जास्त आहेत.
५. महानगरपालिकेचा स्थायी सफाई कामगार कोणत्या विभागात काम करतात?

वरीलप्रमाणे माहिती आस्थापना विभागाकडून प्राप्त झाली नाही.

**आक्षेप क्र. १३.८ :- गैरहजेरी विवरणपत्रा बाबत...**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र. १२७ अन्वये मासिक वेतन देयकासोबत आधारभूत असणाऱ्या नमुना क्रमांक ९४ प्रमाणे गैरहजेरी विवरणपत्र ठेवणे आवश्यक आहे. आस्थापना विभागाने सदर विवरणपत्र ठेवले नसल्याचे निदर्शनास आले. तसेच गैरहजर अधिकारी अथवा सेवक रजेवर अथवा प्रतिनियुक्तीवर वा निलंबित असेल तर तसे वेतन देयकांत स्पष्टपणे दर्शविले पाहिजे व केलेली स्थानापन्न व्यवस्था नमूद केली पाहिजे. अशा प्रकारचे गैरहजेरी विवरणपत्रे देयकासोबत सादर केले जात नाहीत.

**आक्षेप क्र. १३.९ :- वेतनवाढ प्रमाणपत्रा बाबत....**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक १२८ अन्वये ज्या पहिल्या वेतन देयकांत महानगरपालिकेच्या सेवकास नियतकालिक वाढ देण्यात आली असेल त्यासोबत नमुना क्रमांक ९७ प्रमाणे प्रमाणपत्र जोडले पाहिजे, परंतु अशा प्रकारचे प्रमाणपत्र देयकासोबत जोडले जात नाही. तसेच नियम क्रमांक १३० अन्वये वेतन देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. याबाबत कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले.

# भांडार विभाग

**आक्षेप क्र. १४.१ :- सन २०१२-१३ च्या साठा रजिस्टरबाबत..**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामधील भांडार विभागातील साठा नोंदवहीची तपासणी केली असता. विभागाने साठा नोंदवहीत मालाच्या खरेदी केलेल्या नोंदी आहेत. परंतू विभाग प्रमुखाने सदर नोंदी प्रमाणीत केलेल्या नाहीत. तरी सदर नोंदी वेळच्या वेळी अद्यावत करणे आवश्यक आहे.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

# शिक्षण विभाग

**आक्षेप क्र. १५.१ :- माहिती उपलब्ध न करणेबाबत.**

सन २०१२-१३ चे वित्तीय वर्षातील अंतर्गत लेखा परिक्षणाकरिता वरील संदर्भिय पत्रान्वये आपल्या विभागाकडून माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे माहिती विभागाकडून प्राप्त झालेली नाही.

१. शाळेतील रॅम्प व्यवस्था

२. संगीत वाद्य व्यवस्था

३. शाळेतील शौचालय व्यवस्था

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. १५.२ :- थकीत शाळागृह भाडयाबाबत...**

शासन परिपत्रक क्र.प्राशाभा मंत्रालय दि.२१ जानेवारी २००१ नुसार मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील नियम १५ (अ) (३) अन्वये नगरपालिका शिक्षण मंडळाने प्राथमिक शिक्षणासाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीचे भाडे अनुज्ञेय आहे व सदर भाडे स्थानिक स्वराज्य संस्थांना देय आहे.

जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडील आदेश क्र.ठाजिप/शिक्षण/प्रा.अ.१ दि.२२/०२/१९९४ अन्वये २८ प्राथमिक शाळा इमारती व सहा भाडयाच्या इमारती तत्कालीन नगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. हस्तांतरीत २८ शाळां इमारतपैकी १७ इमारती फार जुन्या होत्या या जुन्या इमारतींची महानगरपालिकेने पुर्नबांधनी केली व त्या प्राथमिक शाळांकरिता शिक्षण मंडळास वापरण्याकरिता भाडेतत्त्वावर दिल्या.

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाने शाळा इमारत भाडयाकरिता शासनाकडे मागणीबाबत वेळोवेळी प्रस्ताव सादर केले. त्यानुसार शासनाने सन १९९३-९४ ते सन २००३-०४ या कालावधीकरिता ५०% प्रमाणे रु.१,९३,४१,३६/- शाळागृह भाडे दोन हफ्त्यात महानगरपालिकेस प्रदान केले. परंतु सन १९९३-९४ ते दि.२८/०२/२००२ पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिका

तत्कालीन "ब" वर्ग नगरपालिका असल्याने मंजुर शाळा इमारत गृह भाडयाच्या ९०% प्रमाणे इमारत गृहभाडे अनुज्ञेय होते. सन १९९३-९४ ते दि.२८/०२/२००२ या कालावधीकरिता ४०% प्रमाणे फरकाची रक्कम रु.१,२५,४२,३७०/- येते. सदर रक्कम महानगरपालिकेस येणे बाकी आहे.

सन २००४-०५ ते सन २०११-१२ पर्यंत ७ वर्षाकरिता शाळा इमारत भाडयापोटी शासनाकडुन रु.१,२३,०७,९३२/- महानगरपालिकेस देय ठरतात. सदर रक्कम शासनाने महानगरपालिकेस अद्यापपर्यंत प्रदान केलेली नाही. सन १९९३-९४ ते दि.२८/०२/२००२ पर्यंत ४०% फरकापोटी येणारी रक्कम रु.१,२५,४२,३७०/- व सन २००४-०५ ते २०११-१२ पर्यंतचे थकीत भाडे रु.१,२३,०७,९३२/- असे एकूण रु.२,४८,५०,३०२/- शासनाकडुन येणे प्रलंबित आहे.

सदर आक्षेप सन २०११-१२ च्या लेखापरिक्षणात समाविष्ट करण्यात आला होता. या आक्षेपाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १५.३ :- सेवापुस्तक ठेवणे व त्याच्या दुय्यम प्रतीबाबत....**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ च्या नियम ३६ अन्वये सेवा अभिलेख/ सेवापुस्तक (Service Book) अद्यायावत ठेवण्यात यावे व त्याची दुसरी प्रत कर्मचाऱ्यास द्यावी अशी तरतुद आहे.

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षण समयी महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे सेवा अभिलेख अद्यायावत नसल्याचे व सेवा पुस्तकाची दुसरी प्रत कर्मचाऱ्यास दिली नसल्याचे निदर्शनास आले.

आस्थापना विभागाने सेवा पुस्तकातील नोंदी वेळीच घेतल्या नसुन त्या प्रमाणीत देखील केलेल्या नाहीत.

मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम ५२ खालील परिशिष्ट १७ नुसार सेवापुस्तक हे प्रदीर्घ कालावधीपर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. महानगरपालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सेवापुस्तकाची दुय्यम प्रत देणे मुळ सेवा पुस्तकातील नोंदी वेळीच करणे व त्यानुसार दुय्यम सेवापुस्तकातील नोंदी अद्यायावत करणे याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ चे नियम २५ ते ४९ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १५.४ :- सेवापुस्तकांच्या वार्षिक पडताळणीबाबत...**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ नियम ४५ अन्वये सेवापुस्तके व सेवापट यांची प्रत्येक कार्यालयात दरवर्षी मे महिन्यात कार्यालय प्रमुखाकडुन पडताळणी करण्यात यावी. सेवापुस्तक व सेवापट यांच्यातील नोंदी अचुक आहेत. याबाबत कार्यालय प्रमुखाचे समाधानझाले तर असा अधिकारी 'गेल्या वित्तीय वर्षाच्या अखेरपर्यंत सेवेची पडताळणी वेतन देयकांवरुन व अभिलेखांवरुन केली आहे', या आशयाचे प्रमाणपत्र स्वतःचे सहीने नोंदवेल अशी तरतुद आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत नियम ४५ अन्वये सेवापुस्तके व सेवापट यांची वार्षिक पडताळणी होत नसल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले आहे.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १५.५ :- भविष्य निर्वाह निधी लेख्यांबाबत...**

सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणा करिता भविष्य निर्वाह निधी लेखे उपलब्ध न झाल्याने खालील बाबींबाबत निष्कर्ष काढता आले नाहीत...

१. भविष्य निर्वाह नोंदवही नमुना क्र.९८ नियम १३४ (३) व (५) नुसार अद्यायावत ठेवण्यात आली आहे काय?

१. भविष्य निर्वाह नोंदवहीत किती पृष्ठे आहेत याची नोंद घेण्यात आली आहे काय? व सदर नोंद खातेप्रमुखाने प्रमाणीत केली आहे काय?

२. भविष्य निर्वाह नोंदवहीतील नोंदी पुर्ण आहेत काय?

३. भविष्य निर्वाह निधी खातेदारोन भरलेली मुद्दल व त्यावरील व्याजाची परिगणना

४. बृहतपत्रकाचा ताळमेळ

५. सेवा निवृत्त झालेल्या खातेदारांची परिगणना व अंतीम प्रदान

६. आर्थिक वर्ष समाप्तीनंतर खातेप्रमुखाने नोंदवहीतील नोंदी तपासुन प्रमाणीत केल्या आहेत काय?

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

# सामान्य प्रशासन विभाग

**आक्षेप क्र. १६.१ :- प्राथमिक विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्याबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शाळामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्याकरिता मा.महासभा दि.१८/०४/२००६ ठराव क्र.०५ अन्वये मान्यता देण्यात आली व त्यानुसार मे.पॅन्सी टेक्नॉलॉजीस यांचेशी १० वर्षाकरिता करारनामा करण्यात आला. सदर करारनाम्यातील अट क्र. ४ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका शाळांमधील हजेरीपट नोंदणीनुसार असणाऱ्या विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण घेणे बंधनकारक असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती ग्राहय धरली जाणार नाही. हजेरीपटावरील विद्यार्थी संख्येनुसार दरमाह (वर्षाचे १२ महिने) संगणक शुल्क ठरल्याप्रमाणे प्रति विद्यार्थ्यांमागे रु.३५/- याप्रमाणे महानगरपालिकने मे.पेन्सी टेक्नॉलॉजीस यांना प्रदान करावयाचे आहेत. प्रत्येक बिलाकरिता जुलै महिन्याअखेर हजेरीपटावरील विद्यार्थ्यांची नोंदणी विचारात घेण्यात येईल.

संगणक प्रशिक्षणाकरिता देण्यात येणाऱ्या प्रदानांकरिता विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती ग्राहय न धरणे व तसेच सुट्टीचा कालावधी न वगळता सरसकट १२ महिन्यांचे देयक प्रदान करणे हे वित्तीय औचित्याशी विसंगत आहे सबब महानगरपालिकेने या करारनाम्याचे पुनर्विलोकन करणे अत्यावश्यक आहे अशी लेखापरिक्षणाची शिफारस आहे.

# आरोग्य विभाग (पशुसंवर्धन विभाग)

## आक्षेप क्र. १७.१ :- अनुज्ञाप्ती परवानापत्र नोंद पुस्तकाबाबत...

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ प्रकरण ७ नियम क्र. १०२ अन्वये महानगरपालिका नगरपरिषदेने नियत केलेल्या दराने आकारणी योग्य परवाना शुल्क आगाऊ वसुल केले पाहिजे. शुल्क दिल्यावर नमुना क्र. ७५ प्रमाणे अनुज्ञप्ती / परवानापत्र देण्यात आले पाहिजे व अशा आलेल्या रकमेची नमुना क्र. ७६ प्रमाणे असलेल्या अनुज्ञाप्ती पुस्तकांत नोंद घेतली पाहिजे. मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागा अंतर्गत शहरात मांस विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांना पशुसंवर्धन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या अनुज्ञाप्ती/परवानापत्रा बाबत विहीत नमुन्यात नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

## आक्षेप क्र. १७.२. :- अनुज्ञाप्ती व संकलन पुस्तकांबाबत...

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ प्रकरण ७ नियम १०३ (२) नुसार नमुना क्रं. ७७ प्रमाणे लेखी परवानगीचे पत्र व नमुना क्रं.७८ प्रमाणे वर्षासाठी संकीर्ण / किरकोळ जमेचे संकलन नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे प्रकरण ७ नियम क्रं. १०३ (३) व (४) नुसार नमुद केलेली कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक आहे. विभागाने या प्रमाणे कार्यवाही न केल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले आहे.

## आक्षेप क्र. १७.३ :- पशुधन पुस्तकांबाबत...

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रं. १४८ अन्वये नमुना क्र.१२१ प्रमाणे पशुधन पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. प्रतिवर्षी या पुस्तकांत वार्षिक नोंदी करण्यात येवुन नवी खरेदी वा निर्लेखन नमूद करण्यात येते. विभागाने पशुधन पुस्तक सन २०१२-१३ चे लेखा परिक्षणास सादर केलेले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र. १७.४ :- चारा /वैरणीचा हिशेबाबाबत...**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र. १४९ अन्वये नमुना क्र.१२२ प्रमाणे चारा / वैरण लेखा ठेवुन त्यात चाऱ्यांची / वैरणीची (कडबा, हिरवे गवत, पेंड इत्यादीची) आवक व जावक नोंदविण्यात येते. तसेच प्रत्येक महिन्याच्या महिन्याला ही लेखा बंद / पूर्ण करण्यात येवुन असलेली शिल्लक तीन महिन्यातून एकदा तरी प्राधिकृत आधिकाऱ्याने तपासून प्रमाणित करण्यात येते विभागाने याबाबत कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

# वाहन विभाग

**आक्षेप क्र. १८.१. :- घसारा नोंदवही न ठेवले बाबत.**

सन २०१२-१३ या वित्तिय वर्षात 'अ' अंदाजपत्रक खर्च बाजू मधे विशेष निधी, घसारा निधी या लेखाशिर्षातर्गत रक्कम रु. ५० लाख ची तरतुद केलेली असून आर्थिक वर्षाअखेर खर्च निरंक आहे. याचा अर्थ असा की मनपाच्या वाहनांचा घसारा काढणेत आलेला नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्रं. १५६ मधील तरतुदीनुसार मनपाच्या वाहनांची वार्षिक पडताळणी करुन तसे केल्याचे प्रमाणित करणे आवश्यक असते व घसारा नोंदवही ठेवून मालमत्तेची वर्षाअखरेची किंमत काढणे आवश्यक असते. परंतू अशी कार्यवाही विभागाकडून झालेली नाही.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १८.२ :- इतिहास पुस्तकातील नोंदीच्या अनियमितेबाबत.**

महानगरपालिकेच्या वाहनाकरिता करण्यांत आलेली दुरुस्ती व सुटे भाग खरेदीच्या नोंदी वाहननिहाय "इतिहास पुस्तक" घेण्यात येतात. सदर पुस्तकामध्ये वाहनांचा तपशील व वर्षनिहाय सुटे भाग खरेदी व दुरुस्तीकरिता किती खर्च आलेला आहे. याबाबतच्या एकूण खर्चाच्या रक्कमेच्या नोंदी घेणे आवश्यक आहे.

सन २०१२-१३ या वित्तिय वर्षातील सुटे भाग खरेदी व वाहन दुरुस्तीसाठीच्या खर्चाचे देयकासंबधी दप्तर तपासणी केली असता वाहननिहाय ठेवलेल्या इतिहास पुस्तकमधे वर नमुद केल्याप्रमाणे वाहनाच्या तपशिलाच्या (उदा. इंजिन, चेसीस नंबर, मेक, खरेदीचे वर्ष, रक्कम) इ. नोंदीसह कार्यादेश चलन क्रमांक व दिनांक यासह एकूण खर्चाच्या वर्षनिहाय नोंदी घेतलेल्या आढळून येत नाहीत. तसेच वाहन विभागाने निर्लेखित केलेली वाहने व वाहनांचे सुटे भाग याबाबत तपशिल त्याच्याशी संबंधीत नोंदी लेखापरिक्षणास सादर केल्या नाहीत.

वाहनाच्या इतिहास पुस्तकामध्ये वाहनाचा तपशिल व वर्षनिहाय एकूण झालेल्या खर्चाच्या रक्कमांच्या नोंदी परिपुर्ण करुन विभागप्रमुखांना अनुपालन दर्शविण्याबाबत सुचित करण्यात आले होते. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १८.३ :- पेट्रोलच्या हिशेबाबाबत...**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र.१५३ अन्वये नमुना क्र. १२६ मधे पेट्रोलचा हिशेब ठेवला पाहिजे. नियंत्रण अधिका-यास, पेट्रोल वापरावर होणा-या खर्चाचे परिनिरीक्षण करता यावे म्हणून नमुना क्रमांक १२७ प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवले पाहिजे सन २०१२-१३ चे लेखापरिक्षण समयी सदर अभिलेख ठेवले नसल्याचे आढळुन आले. तसेच मोटारींची उपसाधने, सुटया भागांची खरेदी इत्यादीचा निराळा हिशेब ठेवण्यात आलेला नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नमुना क्रमांक ११६ प्रमाणे प्रत्येक मोटारवाहनासाठी विभागाने वरील बाबी वेगळया लेखांकित केल्या पाहिजेत.

# परिवहन विभाग

**आक्षेप क्र. १९.१ :- अभिलेख व माहिती उपलब्ध न करणेबाबत...**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील लेखापरिक्षणास खालीलप्रमाणे माहिती व अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत लेखापरिक्षण विभागाकडून कळविण्यात आले आहे.

१. सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील जमा / खर्च विविरण पत्र व बँकमेळ पत्रक सादर करावे.
२. निविदा / दरपत्रकांच्या मुळ नस्ती फाईल्स.
३. परिवहन उपक्रमास दिलेल्या अनुदानाची नोंद वही
४. सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील रोकडवही, जमा / खर्च वर्गीकरण रजिस्टर्स सादर करावीत.
५. जंगम मालमत्ता (नमुना नं.११४) रजिस्टर
६. साठा रजिस्टर (नमुना नं.११६)
७. परिवहन उपक्रमाबाबत विभागातुन झालेले ठेकेदारांसोबत सर्व करारनामे प्रत.
८. परिवहन विभागात झालेले सर्व करारनामे
९. किरकोळ पावती पुस्तके, पोटकिर्द व चलन फाईल.
१०. बँक स्टेटमेट(पासबुक इत्यादी) बँकेत भरणा केल्याबाबत सविस्तर माहिती
११. परिवहन विभागातुन दिलेले कार्यादेश व सविस्तर माहिती.
१२. सन २०१२-१३ पर्यंत किती स्वामित्व धनाचा भरणा केला त्याचा तपशिल.
१३. परिवहन उपक्रमासाठी नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांच्या पी.एफ. व ई.एस.आय.सी. बाबतचा तपशिल.
१४. सर्विस टॅक्स (सेवा कर) चा भरणा केल्याचा तपशिल.
१५. ट्रीप कार्ड व दैनंदिनी कि.मी. नोंदवही (लॉग बुक).

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही.

# सार्व.आरोग्य विभाग

**आक्षेप क्र. २०.१ :- अभिलेख व माहिती उपलब्ध न केलेबाबत.**

सन २०१२-१३ चे लेखापरिक्षण करणेसाठी खालीलप्रमाणे दप्तर उपलब्ध करुन देण्याबाबत लेखापरिक्षण विभागाकडून कळविण्यात आले आहे.

१. जंगम मालमत्ता नोंदवही.

२. सन २०१२-१३ चे साठा रजिस्टर.

३. सन २०१२-१३ चे वित्तीय वर्षातील मंजुर केलेल्या निविदा फाईल, दरपत्रके फाईल.

४. किरकोळ पावती पुस्तके, पोटकिर्द व चलन फाईल.

५. विभागावर घनकचरा शुल्क आकारणी पावती पुस्तके, पोटकिर्द व चलन फाईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

**आक्षेप क्र. २०.२ :- किटकनाशके / एकात्मीक डास निर्मुलन योजना...**

सन २०१२-१३ या वर्षात आरोग्य (सार्व.) विभागास किटकनाशके / एकात्मीक डास निर्मुलन योजने करिता रू. १८० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली होती. विभागाने रू. १६३ लक्ष औषधे खरेदी केलेली आहेत. परंतु, कोणती औषधे खरेदी केली व कोणत्या ठिकाणी फवारणी केली व एकात्मीक डास निर्मुलन योजनेकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या याबाबत अभिलेख तपासणी करिता उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

# संगणक विभाग

**आक्षेप क्र. २१.१ :- संगणक विभागातील निविदा व दरपत्रकाच्या मुळ नस्तीबाबत....**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १०५ (१) नुसार लेखापरिक्षण करणेकरिता विभागाने दप्तर उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील मंजुर केलेल्या निविदा व दरपत्रके संचिका लेखा परिक्षणास तपासणी करीता उपलब्ध करून दिलेले नाहीत. याबाबत विभागाने अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

**आक्षेप क्र. २१.२ :- सन २०१२-१३ च्या साठा नोंदवही बाबत..**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामधील संगणक विभागातील साठा नोंदवहीची तपासणी केली असता. सदर विभागाने साठा नोंदवहीत मालाच्या खरेदी केलेल्या नोंदी आहेत. परंतू विभाग प्रमुखाने सदर नोंदी प्रमाणीत केलेल्या नाहीत. तरी सदर नोंदी वेळच्या वेळी अद्यावत करणे आवश्यक आहे.

याबाबत विभागाचे अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. २१.३ :- संगणक देखभाल दुरुस्ती बाबत.**

सन २०१२-१३ या वर्षात संगणक देखभाल दुरूस्ती साठी रू. ५०.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली होती. विभागाने रू. २४.८७ लक्ष इतकी रक्कम खर्च केला आहे. संगणकाची देखभाल दुरूस्ती केल्यानंतर ना दुरूस्त असलेले साहित्य शिल्लक आहे किंवा कसे याबाबत साठा नोंदवही व ना दुरूस्त साहित्य लेखापरिक्षण विभागास तपासणी करिता सादर केलेले नाही याबाबत विभागाने अनुपालन सादर करावे.

# वृक्षप्राधिकरण विभाग

**आक्षेप क्र. २२.१ :- अभिलेख व माहिती उपलब्ध न करणेबाबत....**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील लेखापरिक्षणाच्या अनुषांगाने खालील मुदयांची माहिती व अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत लेखापरिक्षण विभागाकडून कळविण्यात आले आहे.

१. नमुना नं. ११६ साठा नोंदवही.
२. निविदा व दरपत्रके हयांच्या मुळ नस्ती
३. सन २०१२-१३ ह्या वित्तीय वर्षात किती व कोणती झाडे लावली त्याचा सविस्तर तपशिल
४. सन २०१२-१३ ह्या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार जमा/खर्चाचे विवरण पत्र.
५. जंगम मालमत्ता नोंदवही (नमुना नं. ११४)
६. मजुर पुरवठा केले बाबतचे हजेरीपत्रके
७. सन २०१२-१३ मध्ये किती बाधीत वृक्षतोड फी वसुल करण्यात आली.
८. सन २०१२-१३ मध्ये किती रोपे विक्री केली.
९. सन २०१२-१३ मध्ये महानगरपालिका हद्दीत कोणकोणत्या ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात आली.
१०. वृक्ष लागवडीसाठी झालेला खर्च
११. बाधीत वृक्षतोड करीता आलेला खर्च
१२. बाधीत वृक्षतोड केल्याची ठिकाणे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. विभागाने सदर माहिती उपलब्ध केलेली नाही.

# वैद्यकिय आरोग्य विभाग

**आक्षेप क्र. २३.१ :- अभिलेख व माहिती उपलब्ध न करणेबाबत....**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, सन २०१२-१३ चे लेखापरिक्षण करणेसाठी खालील प्रमाणे दप्तर उपलब्ध करुन देणेत यावेत.

१. जंगम मालमत्ता नोंदवही

२. सन २०१२-१३ चे साठा रजिस्टर

३. सन २०१२-१३ चे वित्तीय वर्षातील मंजुर केलेल्या निविदा फाईल, दरपत्रके फाईल

४. किरकोळ पावती पुस्तके, पोटकिर्द व चलन फाईल

५. मुंबई नर्सिंग ॲक्ट १९४९ नुसार महानगरपालिकेतील रूग्णालयाच्या नोंदणी

६. RCH शासन प्राप्त अनुदान व खर्च व त्या संबंधिचे अभिलेख

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरिक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

**आक्षेप क्र. २३.२ :- पेणकरपाडा आरोग्य केंद्राबाबत**

१. पोटकिर्द तयार करणारे व निरिक्षक यांचा सही शिक्का नाही.

२. किरकोळ पावती पुस्तके क्र. ३९५,४३१,३१४,३४९,३५०,३९०९,६१७९,५९७,३४७,३४८,३४६ एकूण पुस्तके ११, किरकोळ सर्वसाधारण पुस्तके वापरण्यात आलेली आहेत.

३. दि. २९/०१/२०१३ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ६००/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ५९०/- म्हणजेच रू. १०/- कमी भरणा केला आहे.

४. दि. १४/०५/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ३८०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ३७५/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

५. दि. २६/०७/२०१३ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ४८५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ४८०/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

६. दि. ०१/०८/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ४३५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ४३०/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

७. दि. ०२/०८/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. १५५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. १५०/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

८. दि. ३१/०८/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ३९५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ३९०/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

९. दि. ०१/०९/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ४५०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ४४०/- म्हणजेच रू. १०/- कमी भरणा केला आहे.

१०. दि. ०६/०९/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ३८०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ३७५/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

११. दि. २४/०९/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ४१०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ४०५/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

१२. दि. २५/०९/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ३९०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ३८५/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

१३. दि. ३१/१०/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ४९०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ४८५/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

१४. दि. २१/११/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ४८०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ४७५/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

१५. दि. २२/११/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ३७०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ३६५/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

१६. दि. ०१/०२/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. २५५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. २५०/- म्हणजेच रू. ५/- कमी भरणा केला आहे.

१७. दि. ०५/१२/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. २४५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. २३५/- म्हणजेच रू. १०/- कमी भरणा केला आहे.

१८. सदर आरोग्य केंद्राने एकूण रक्कम रू. ९०/- कमी भरणा केला आहे.

**आक्षेप क्र. २३.३ :- बंदरवाडी आरोग्य केंद्राबाबत**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले बरोबर आहेत.

२. किरकोळ पावती पुस्तके क्र. ३२६,३२७,३२८,३२९,३३०,३३१,३३२,३३३,३३४,३३५,३९६, ३९७,३९८,३९९,४००,६०७५,५९६०,५९५९,६१३१ एकूण पुस्तके २०, किरकोळ सर्वसाधारण पुस्तके वापरण्यात आलेली आहेत.

३. दि.०१/०४/२०१२, दि.०१/०५/२०१२ व दि.०१/०६/२०१२ पोटकिर्द नसल्यामुळे तपासणीस उपलब्ध झाली नाही.

४. पोटकिर्द तयार करणारे व निरिक्षक यांचा सही शिक्का नाही.

५. दि. १८/१२/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ८५५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ८२०/- म्हणजेच रू. ३५/- कमी भरणा केला आहे.

६. दि. ११/०७/२०१३ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ७०५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ६४०/- म्हणजेच रू. ६५/- कमी भरणा केला आहे.

७. दि. १७/०८/२०१२, दि. ०१/१०/२०१२, दि. २६/१२/२०१२ रोजीचे चलन तपासणीस उपलब्ध झाले नाही.

८. दि. २५/०८/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. १०/- आहे. परंतु, पोटकिर्दमध्ये सदर चलनाची नोंद नाही. पा.पु. ३२८, पा.क्र. ३२७२४.

९. दि. १३/१०/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ५२५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ५१५/- म्हणजेच रू. १०/- कमी भरणा केला आहे.

१०. दि. ०५/१०/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. १०/- आहे. परंतु, पोटकिर्दमध्ये सदर चलनाची नोंद नाही. पा.पु. ३२९, पा.क्र. १८.

११. दि. ०५/१०/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. १०/- आहे. परंतु, पोटकिर्दमध्ये सदर चलनाची नोंद नाही. पा.पु. ३२९, पा.क्र. १९.

१२. दि. १९/१०/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ५०/- कमी भरणा केला आहे व सदर चलन उपलब्ध नाही.

१३. दि. १६/११/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ९६०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ९५०/- म्हणजेच रू. १०/- कमी भरणा केला आहे.

१४. दि. १९/११/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ५२५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ५००/- म्हणजेच रू. २५/- कमी भरणा केला आहे.

१५. दि. ११/०२/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ८३०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ८००/- म्हणजेच रू. ३०/- कमी भरणा केला आहे.

१६. दि. १३/०२/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ५३०/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ५१५/- म्हणजेच रू. १५/- कमी भरणा केला आहे.

१७. दि. २६/०३/२०१३ रोजीचे चलन उपलब्ध नाही.

१८. श्वान दंशचे रू. ५०/- च्या पावती क्रमांकाची पोटकिर्दमध्ये नोंद नाही व श्वान दंशची पूर्ण रक्कम रू. २४०/- कमी भरणा केला आहे.

**आक्षेप क्र. २३.४ :- काशिगाव आरोग्य केंद्राबाबत....**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले आहेत.

२. काही पावती पुस्तकावर सही नाहीत

३. एकूण पुस्तके वापरण्यात आलेली १४ आहेत :- ५९७७,६०३७,६०४८,६१२५,६१२९,३६१, ३६२,३६३,३६४,३६५,४०९,४१०,४१६,४१७ सर्व काम व्यवस्थीत केले आहे.

**आक्षेप क्र. २३.५ :- जय अंबे नगर आरोग्य केंद्राबाबत....**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले आहेत.

२. किरकोळ पावती पुस्तके क्र. ५८३२,६०८३,३२५,३८५,४२० एकूण पूस्तके ५, किरकोळ सर्व साधारण पुस्तके काम व्यवस्थीत केले आहे.

३. दि.१७/०५/२०१२ रोजीच्या चलनामध्ये रू. ५/- कमी भरणा दिसून येतो.

**आक्षेप क्र. २३.६ :- मुख्यालयाबाबत.....**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले आहेत.

२. किरकोळ पावती पुस्तके क्र. ६१४४,६०३३,५९९८,५९९७,६०५०,६१९१,६२००,६२६६, ६१७५,६३०७,६३०५,६३०१,६२६७,६३०८,६३०६,६३१२,६३१३,६३११,६३०९,६३१० एकूण पुस्तके २०, किरकोळ सर्वसाधारण पुस्तके वापरण्यात आलेली आहेत.

३. दि.०७/०८/२०१२ पुस्तक क्र. ६३०५ च्या पावती क्र. ६३४९१९ यांचे चलनामध्ये रू.२००/- चा कमी भरणा दिसुन येतो. (श्री. थॉमस गोन्सालवीस)

४. दि.०३/०१/२०१३ च्या चलनामध्ये रू. २२/- कमी भरणा दिसुन येतो.

**आक्षेप क्र. २३.७ :- टेंबा आरोग्य केंद्राबाबत**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले आहेत.

२. काही पावत्यांवर सह्या नाही.

३. किरकोळ पावती पुस्तके क्र. ३११,३१२,३१३,३१४,३१५,३९०,३९१,४०६,५९७९,६०३९,६१२२,६१२७ एकूण पूस्तके १२, किरकोळ सर्व साधारण पुस्तके वापरण्यात आलेली आहेत.

४. दि.१६/०६/२०१२ रोजीच्या चलनामध्ये रू. ५०/- कमी भरणा दिसून येतो. (पा.पु.क्र. ७६, पा.पु.क्र.६१२२)

**आक्षेप क्र. २३.८ :- भाईंदर (प.) आरोग्य केंद्राबाबत....**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले आहेत.

२. पोटकिर्द तयार करणारे व निरिक्षक यांचा सही शिक्का आहे.

३. किरकोळ पावती पुस्तके क्र. ३०६,३८९,३७४,३०८,३७३,४३०,३७५,३१०,३७८,३८१,३८३,४०४,३८२,३७७,३०९,३०७,४०१,४०२,४०३,४०५,४२९,३८४,६०८४,६०४६,६०६५ एकूण पूस्तके २५, किरकोळ सर्व साधारण पुस्तके वापरण्यात आलेली आहेत.

४. दि.१०/०४/२०१२ रोजीच्या चलनामध्ये रू. ५/- कमी भरणा दिसून येतो.

५. दि. २६/०४/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. ५३५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ५२५/- म्हणजेच रू. १०/- कमी भरणा केला आहे.

६. दि. ३१/०७/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. १०५५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. ९८०/- म्हणजेच रू. ७५/- कमी भरणा केला आहे.

७. दि. ०७/०८/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रू. १०७५/- आहे. परंतु, सदर दिवशीच्या पोटकिर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रू. १०२५/- म्हणजेच रू. ५०/- कमी भरणा केला आहे.

८. दि.१६/०८/२०१२ रोजीच्या चलनामध्ये रू. ५/- कमी भरणा दिसून येतो.

९. दि.०७/०९/२०१२ रोजीचे चलन तपासणीत उपलब्ध झाले नाही.

१०.सदर आरोग्य केंद्राने एकूण रक्कम रू. १४५/- कमी भरणा केला आहे.

**आक्षेप क्र. २३.९ :- मुर्धा उपकेंद्राबाबत....**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले बरोबर आहे.

२. किरकोळ पावती पुस्तके क्र.५५७५,३६९,३७६ एकूण पुस्तके ३, किरकोळ सर्वसाधारण पुस्तके वापरण्यात आलेली आहेत.

३. दि. ०१/०६/२०१२ रोजीच्या पोटकीर्दमध्ये रु. ५/- कमी भरणा दिसून येतो.

४. दि. ०७/१२/२०१२ रोजीच्या पोटकीर्दमध्ये रु. १०/- कमी भरणा दिसून येतो.

५. दि. २२/०२/२०१३ रोजीच्या पोटकीर्दमध्ये रु. ५/- कमी भरणा दिसून येतो.

६. दि. ०१/०३/२०१३ रोजीच्या पोटकीर्दमध्ये रु. १५/- कमी भरणा दिसून येतो.

**आक्षेप क्र. २३.१० :- मिरारोड आरोग्य केंद्राबाबत....**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले बरोबर नाही.

२. एकूण किरकोळ पावती पुस्तके १८, त्यापैकी १० तपासली गेली आहेत.
तपासलेली पावती पुस्तके क्र. ३५४, ३५३, ३५२, ३५१, ३५५, ३५८, ३५६, ३६०, ३५९, ३५७

३. गहाळ झालेली पावती पुस्तके क्र. ५९९८, ६०३७, ६०७२, ६१९२, ६१९३, ३५००, ३५१, ३५२

४. दि. ०१/०४/२०१२, दि. ०१/०५/२०१२ व दि. ०१/०६/२०१२ पोटकीर्द नसल्यामुळे तपासणीस उपलब्ध झाली नाही.

५. काही पुस्तकांवर सहया नाहीत.

६. दि. २२/०६/२०१२ रोजीचे चलन रु. ५/- कमी भरणा केला आहे.

७. दि. ०३/०५/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रु. ४५०/- आहे. परंतु सदर दिवशीच्या पोटकीर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रु. ४४०/- म्हणजेच रु. १०/- कमी भरणा केला आहे.

८. दि. ०४/०५/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रु. ५००/- आहे. परंतु सदर दिवशीच्या पोटकीर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रु. ४९५/- म्हणजेच रु. ५/- कमी भरणा केला आहे.
९. दि. ०८/०५/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रु. ७२०/- आहे. परंतु सदर दिवशीच्या पोटकीर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रु. ६८०/- म्हणजेच रु. ४०/- कमी भरणा केला आहे.
१०. दि. १५/०५/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रु. ६०५/- आहे. परंतु सदर दिवशीच्या पोटकीर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रु. ५६०/- म्हणजेच रु. ४५/- कमी भरणा केला आहे.
११. दि. २५/०८/२०१२ रोजीचे चलन एकूण रक्कम रु. ७८५/- आहे. परंतु सदर दिवशीच्या पोटकीर्दमध्ये सदर आरोग्य केंद्राने रु. ६८५/- म्हणजेच रु. १००/- कमी भरणा केला आहे.
१२. पावती पुस्तक क्र. ३५५, दि. २४/११/२०१२ ते दि. २२/१२/२०१२ याची नोंद पोटकीर्दमध्ये नाही. पावती पुस्तक क्र. ०३५४२२ ते ०३५५००
१३. दि. ०१/०१/२०१३ रोजीचे रु. ४५५/- चलन उपलब्ध नाही.
१४. दि. १४/०१/२०१३ रोजीचे रु. ८२५/- चलन उपलब्ध नाही.
१५. दि. ३०/०३/२०१३ रोजीचे चलन उपलब्ध नाही.
१६. सन २०१२-१३ ची सर्व चलने झेरॉक्स कॉपीमध्ये आहेत.

**आक्षेप क्र. २३.११ :- उत्तन आरोग्य केंद्राबाबत....**

१. चलनावर पुस्तक क्र. व पावती क्र. पासून ते पर्यंत लिहिलेले बरोबर नाही.
२. किरकोळ पावती पुस्तके क्र. ५९७४०१, ५९९९०१, ६०४८०१, ६०७३०१, ६१४४०१, ०३०००१, ०३०१०१, ०३०२०१, ०३०३०१, ०३०४०१, ०३६९०१, ०३७००१, ०३७१०१, ०३७८०१, ०३७९०१, ०३८६०१, ०३९२०१, ०४१२०१, ०४१३०१, ०४१४०१ एकूण पुस्तके २०, किरकोळ सर्वसाधारण पुस्तके वापरण्यात आलेली आहेत.

**आक्षेप क्र. २३.१२ :- आरोग्य विषयक कार्यक्रम हाती घेणेबाबत...**

सन २०१२-१३ या वर्षात वैद्यकिय आरोग्य विभागाने आरोग्य विषयक कार्यक्रम हाती घेण्याकरिता रू. १० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली होती. विभागाने कोणकोणत्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित केले व कोणकोणते कार्यक्रम आयोजित केले त्याकरिता लागणारे साहित्य, स्टेशनरी छपाई याबाबत लेखापरिक्षण विभागास तपासणी करिता अभिलेख उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. याबाबत विभागाने अनुपालन सादर करावे.

**आक्षेप क्र. २३.१३ :- औषधे खरेदीबाबत.**

सन २०१२-१३ या वर्षात वैद्यकिय आरोग्य विभागास औषधे खरेदी करिता रू. १००.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली होती. विभागाकडे पुर्वी शिल्लक असलेल्या औषधाबाबत अभिलेख तपासणी करिता सादर केलेले नाहीत. औषध खरेदीबाबत साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे तपासणीस सादर केलेले नाहीत. रू. ४०.९१ लक्ष इतक्या रक्कमेची औषधे खरेदी केल्याचे दिसुन येते. याबाबत विभागाने अनुपालन अहवाल सादर करावा.

**आक्षेप क्र. २३.१४ :- पल्स पोलिओ कार्यक्रम प्रचाराबाबत....**

सन २०१२-१३ या वर्षात वैद्यकिय आरोग्य विभाग पल्स पोलिओ कार्यक्रम प्रचारासाठी रू.६०.०० लक्ष इतकी तरतुद करण्यात आली होती. त्यापैकी विभागाने रू. ३९.०२ लक्ष इतका खर्च केल्याचे दिसुन येते. सदर खर्चाबाबत कोणकोणते कार्यक्रम व प्रचारासाठी केलेली उपाययोजना याबाबत विभागाने लेखापरिक्षण विभागास तपासणी करिता अभिलेख सादर केलेले नाहीत. केलेल्या खर्चाबाबत अनुपालन अहवाल सादर करावा.

# +xÉÖGò¨ÉÊhÉEòÉ

| अ.क्र. | विभाग | आक्षेपाची संख्या | {ÉÖ¹`ö Gò¨ÉÉÆEò |
|---|---|---|---|
| | जमा आणि खर्च | - | १ ते २ |
| १ | मालमत्ता कर विभाग | २२ | ३ ते २२ |
| २ | पाणीपुरवठा विभाग | १५ | २३ ते ३२ |
| ३ | लेखा विभाग | ५ | ३३ ते ४० |
| ४ | स्थानिक संस्था कर विभाग | ७ | ४१ ते ४५ |
| ५ | परवाना विभाग | ६ | ४६ ते ४९ |
| ६ | जाहिरात विभाग | २ | ५० |
| ७ | अतिक्रमण विभाग | ८ | ५१ ते ५५ |
| ८ | बांधकाम विभाग | १७ | ५६ ते ६२ |
| ९ | जनसंपर्क विभाग | ४ | ६३ ते ६५ |
| १० | अंध व अपंग कल्याण विभाग | १ | ६६ |
| ११ | नगररचना विभाग | ८ | ६७ ते ७२ |
| १२ | अग्निशमन विभाग | ५ | ७३ ते ७५ |
| १३ | आस्थापना विभाग | ९ | ७६ ते ८० |
| १४ | भांडार विभाग | १ | ८१ |
| १५ | शिक्षण विभाग | ५ | ८२ ते ८४ |
| १६ | सामान्य प्रशासन विभाग | १ | ८५ |
| १७ | आरोग्य विभाग(पशुसंवर्धन विभाग) | ४ | ८६ ते ८७ |
| १८ | वाहन विभाग | ३ | ८८ ते ८९ |
| १९ | परिवहन विभाग | १ | ९० |
| २० | सार्व. आरोग्य विभाग | २ | ९१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | संगणक विभाग | ३ | ९२ |
| २२ | वृक्षप्राधिकरण विभाग | १ | ९३ |
| २३ | वैदयकिय आरोग्य विभाग | १४ | ९४-१०२ |

Ê¨É®úÉ ¦ÉÉ<ÇÆnù®ú ¨É½þÉxÉMÉ®ú{ÉÉÊ±ÉEòÉ

±ÉäJÉÉ{ÉÊ®úIÉhÉ +½´ÉÉ±É

ºÉxÉ 2012-13